|| जय माता जी ||



|| माता बारोंडादेवी प्रसन्न ||


गुन्हेगारीचा कर्दनकाळ

# क्राईम संध्या

Tread Mark

संपादक : लक्ष्मणराव पाटोळे

वर्ष : ११ | अंक : ४ | सोमवार दि. १६ जानेवारी २०२३ ते रविवार दि. २२ जानेवारी २०२३ | पाने : ८ | किंमत : ५/- रुपये

www.crimesandhya.com | महाराष्ट्रातील १४ जिल्ह्यांत वितरीत होणारे साप्ताहीक | crimesandhyavasai@gmail.com

ठाणे ■ पालघर ■ मुंबई ■ जळगाव ■ नाशिक ■ धुळे ■ बिड ■ परभणी ■ पुणे ■ औरंगाबाद ■ लातूर ■ उस्मानाबाद ■ सोलापूर ■ नांदेड


## पैसे दिले नाहीत म्हणून सोयाबीन जाळले रागाच्या भरात मुलांनी बापाला ठार मारले

बुलढाणा/क्राईम रिपोर्टर





दारुडा माणूस हा कुटुंबातील लोकांच्या डोक्याला ताप असतो. कारण तो रोज दारू पिऊन कुटुंबातील लोकांना शिवीगाळ करीत असतो. घरात तमाशा करीत असतो. मात्र रक्ताच्या नात्यामुळे कुटुंबातील लोक सहन करीत असतात. पण शेवटी ...पान २ वर

## लाखो करोडोंच्या घोषणा पण कर्मचाऱ्यांना नाही पगार आंधळल्या जनतेला फसवी शिंदे-फडणवीसांचे सरकार

मुंबई/सोनू जाधव



'दुनिया झुकती है लेकीन झुकानेवाला चाहिए' अशी एक म्हण आहे आणि राजकारण्यांना १०० टक्के लागू आहे. याचे कारण जनतेला खुश करण्यासाठी मोठमोठ्या घोषणा करायच्या आणि निवडणुका जिंकायच्या. पण ज्या घोषणा केलेल्या असतात त्याची पूर्तता मात्र होत नाही. कारण सरकारची तिजोरी रिकामी असते आणि नेमकी हीच गोष्ट लोकांना कळत नाही. आज महाराष्ट्रावर ५ लाख कोटींचे कर्ज आहे. सरकारी कर्मचाऱ्यांचा पगार देण्यासाठी सरकारकडे पैसे नसल्याने बँकांकडून ओव्हर ड्राफ्ट घेण्याची पाळी येतेय. एसटी कामगारांच्या संपाच्यावेळी १० तारखेच्या आत एसटी कामगारांचे पगार दिले जातील असे सरकारने सांगितले होते. पण जानेवारीची १२ तारीख उजाडली तरी एसटी कामगारांच्या पगारापोटी ३०० कोटींची तरतूदही सरकार करू शकले नाही. असे असताना शिंदे-फडणवीस सरकारने २३ हजार पोलिसांच्या भरतीचा निर्णय घेतला. तसेच विविध खात्यांतर्गत ४० हजार पदांसाठी नोकर भारती करण्याचा निर्णय घेतला आहे.

ज्यांच्याकडे एसटी कामगारांचा पगार द्यायला पैसा नाही, ज्यांच्याकडे सरकारी कर्मचाऱ्यांचे वेतन द्यायला पैसा नाही ते नवीन भरती करून त्या कामगारांना पगार कुठून देणार? लोकांनी याच गोष्टीचा शांतपणे विचार करायला हवा. जर लोकांनी या गोष्टीचा विचार केला तर राजकारणी आणि खास करून सत्ताधारी आपल्याला कसे फसवत आहेत हे सहजपणे कळू शकेल. घोषणा करायला काय जातंय, उद्या हे लोक जनतेसाठी आकाशातील चंद्र-सूर्य आणून देण्याचीही घोषणा करतील. पण त्यांच्या या फसव्या घोषणांवर विश्वास ठेवण्याएवढी जर अक्कल आपल्याला नसेल तर आपल्यात आणि मेंढरांमध्ये काय फरक? राजकीय नेते ज्या दिशेने हाकतील त्या दिशेने खाली मान घालून जायचे एवढ्यासाठीच लोकांनी जगायचे का? अरे महाराष्ट्राच्या तिजोरीत शिंदेना दाढी करण्यासाठी ब्लेड घेण्या इतकाही पैसा नाही आणि लाखो करोडोंच्या घोषणा केल्या जातायत. कुठून आणणार इतका पैसा. सरकारकडे जर खरोखरच इतका पैसा असेल तर कर्मचाऱ्यांच्या पगारासाठी बँकांकडे हात का पसरताय. ५ लाख कोटींचे कर्ज डोक्यावर घेऊन का बसला आहात? पैसे असतील तर कर्ज फेडून टाका ना! असे आता लोकं म्हणत आहेत.

शिंदे-फडणवीस सरकार सत्तेमध्ये आल्यापासून घोषणांचा पाऊस पडतोय. १०० दिवसात ७०० हून अधिक निर्णय घेण्यात आले. यात २३ हजार पोलीस भारती, ४० हजार विविध खात्यातील नोकर भरती, मुंबई मेट्रो मार्ग-३ साठी १० हजार कोटी, नागपूर मेट्रो सुधारित प्रकल्पासाठी ९२७९ कोटी, मुंबईला खड्डेमुक्त करण्यासाठी ५ हजार कोटी, राज्यातील १५ मेडिकल कॉलेजसाठी ३६० कोटी, जळगावातील वाकुर प्रकल्पासाठी २८८ कोटी, रत्नागिरी जिल्ह्यातील विविध प्रकल्पांसाठी ७०० कोटी, म्हैसाळ विस्तारित जलयोजनेसाठी २ हजार कोटी, ब्रह्मगव्हाण उपसा योजनेसाठी ८९० कोटी अशा करोडो नव्हे तर अब्जावधी रुपयांच्या घोषणा करण्यात आल्यात. शिवाय येत्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात अर्थसंकल्पात केल्या जाणाऱ्या घोषणा वेगळ्याच असतील. सरकारकडे एवढा पैसा आहे का? आणि असेल तर जी एसटीच्या थकबाकीसाठी सतरा वेळा केंद्राकडे का हात पसरताय? हे काही जागरूक नागरिकांच्या मनातील प्रश्न आहेत जे जाती धर्माच्या गुंगीत आहेत त्यांना या प्रश्नांशी काही घेणेदेणे नाही, जे अंधभक्त आहेत त्यांना हे प्रश्न महत्वाचे वाटत नाहीत. पण जे जागरूक नागरिक आहेत ज्यांना महाराष्ट्राच्या आर्थिक हलाकीची कल्पना आहे, त्यांना मात्र या प्रश्नांची उत्तरे हवी आहेत. कारण सरकारी घोषणांची पूर्तता करण्या इतके महसुली उत्पन्न राज्याला मिळत नाही. त्यातच कोरोना काळात उद्योगधंदे बंद राहिल्याने प्रचंड महसुली नुकसान ...पान २ वर

## सतत मोबाईलवर बोलणे तिला घातक ठरले पतीनेच आपल्या पत्नी व मुलाला ठार मारले

औरंगाबाद/क्राईम रिपोर्टर

संशयाचा किडा एकदा का माणसाच्या डोक्यात वळवळायला लागला कि मग त्याचे कशातच लक्ष लागत नाही, तो सतत त्या एकाच गोष्टीचा विचार करीत असतो. परिणामी मानसिक स्थिती बिघडून जाते. ज्याच्यावर त्याचा संशय असतो त्याच्याविषयी त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण होते आणि एकदा का त्याच्या मनात सुडाची भावना निर्माण झाली कि मग तो नात्यागोत्याचा कशाचाही विचार करीत नाही. औरंगाबादच्या कांचनवाडीत राहणाऱ्या समीरची बायको सतत फोनवर बोलायची. याचा तिच्या सासूला संशय आला. त्यमुळे तिने आपल्या मुलाचे कान भरले. त्यानंतर समीर त्याच्या पत्नीवर संशय घेऊन तिचा छळ करू लागला आणि एके रात्री त्याने पत्नी व मुलाचा खून केला. या प्रकरणी पोलिसांनी समीरला अटक केली आहे.



औरंगाबाद शहरातील कांचनवाडी परिसरात समीर मस्के हा पत्नी आरती, मुलगा निशांत आणि आपल्या आईसमवेत राहयला आहे. त्याच्या लग्नाला पाच वर्ष झाली. तो एमआडीसीमध्ये एका कारखान्यात कामाला जात होता. त्याची पत्नी आरती ही दिसायला देखणी आणि सुंदर होती. तो सकाळी कामाला गेला की रात्री उशिराच घरी परतत होता. आपले काम भले आणि आपर भले असे तो वागत होता. मुलगा निशांत हा आता अडीच वर्षाचा झाला होता. संसार सगळा व्यवस्थीत आणि गुण्या गोविंदाने सुरू असताना त्याच्या संसारात वादळ निर्माण झाले. त्याची पत्नी तास न तास आपल्या मोबाईलवरून कोणाशी तरी बोलत असायची ही गोष्ट समीर याच्या आईला खटकत होती. घरची कामे तर काही फारसे नव्हते. सकाळी काम आटोपले की संध्याकाळ पर्यत आरती तशी रिकामीच असायची. त्यामुळे ती आपल्या फावल्या वेळेत मोबाईलवरून आपल्या मैत्रीणीशी बोलत असायची. याचा वेगळाच अर्थ तिच्या सासूने काढला होता. आपली सून आपल्या मुलग्याच्या माघारी वेगळ्या वळणावर चालली आहे. तिचे कुणाशी तरी बाहेर लफडे आहे असा समज तिने करून घेतला होता. अलिकडे आरतीच्या वागण्यात आणि राहणीमानात ही बदल झालेला होता. तिचा हा बदल समीरच्या ही लक्षात आलेला होता. त्याच्या ही मनात आरतीच्या चारित्र्याचा संशय निर्माण व्हायला वेळ लागला नाही त्यातच सासू आरतीबरोबर ...पान २ वर

## प्रियकराची ब्लॅकमेलिंग प्राणावर बेतली मुलीसह विवाहितेने विहिरीत उडी घेतली

जळगाव/क्राईम रिपोर्ट

जेंव्हा एखाद्या महिलेचा पती व्यसनी असतो आणि तो तिच्याकडे लक्ष देत नाही तेंव्हा ती दुसऱ्याच्या जाळ्यात अडकते आणि संसारात दुखी असलेल्या अशाच महिलांची काही लंपट पुरुष शिकार करतात आणि नंतर त्यांना ब्लॅकमेल करतात. अशावेळी प्रियकराच्या ब्लॅकमेलींगला कंटाळलेल्या स्त्रिया समाजाच्या आणि कुटुंबाच्या भीतीने आत्महत्या करून आपले जीवन संपवतात. अमळनेर तालुक्यातील एका गावात अशाच एका घटनेत अशोक कोळी नावाच्या इसमाने एका दारुड्याच्या पत्नीला पटवले. तिच्या सोबत फोटो काढले आणि नंतर तिला ब्लॅकमेल करू लागला. अखेर त्याच्या याच ब्लॅकमेलींगला कंटाळून तिने आपल्या लहान मुलीसह विहिरीत उडी टाकून आत्महत्या केली. या प्रकरणी पोलिसांनी आरोपीला अटक केली आहे.





बदमाश लोकांची या जगात कमतरता नाही. एखाद्याची कमतरता आणि त्याचा सरळमार्गी स्वभाव शोधून त्याला आपल्या जाळ्यात फसवणारे लोक जागोजागी असतात. भिती दाखवणे, गोड बोलणे, धमकी देणे अशा विविध प्रकारचे सापळे बदमाशांकडून रचले जातात. प्रसंगाला अनुसरुन या सापळ्यांचा उपयोग बदमाश करत असतात. एकदा का सरळमार्गी मनुष्य या जाळ्यात फसला म्हणजे बदमाश आपले इप्सीत साध्य केल्याशिवाय रहात नाही. अमळनेर तालुक्यातील एका विवाहीतेने तिन महिन्यापुर्वी आपल्या सात वर्षाच्या चिमुकल्या मुलीसह विहीरीत उडी घेत आत्महत्या केली. या घटनेप्रकरणी अमळनेर तालुक्यातील मारवड पोलिस स्टेशनला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी एका जणाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. नेमका काय प्रकार होता हे जाणून घेऊया. जळगाव जिल्ह्याच्या अमळनेर तालुक्यातील एका लहानशा गावात मोलमजुरी करणारी एक विवाहीता रहात होती. पती, एक मुलगा आणि एक मुलगी अशी तिच्या संसाराची दुनिया होती. हम दो हमारे दो असा तिचा सुखी संसार सुरु होता. या विवाहितेच्या पतीला ...पान २ वर

## अनैतिक संबंधात त्याचा अडथळा आला प्रियकराच्या मदतीने पतीचा खून केला

अकोला/क्राईम रिपोर्टर



मयत बंडू डाखोरे

एकाच म्यानात दोन तलवारी राहू शकत नाहीत. अनैतिक संबंधाचे सुद्धा तसेच असते. एखादी विवाहिता परपुरुषाच्या प्रेमात पडली कि मग त्यांच्या अनैतिक संबंधात पती अडथला ठरतो. अशावेळी त्याचा काटा काढण्याशिवाय पर्याय नसतो. सावरगाव येथील मीरा आणि गजाननच्या बाबतीत असेच घडले. ४ मुलांची आई असलेली ३५ वर्षाची मीरा २० वर्षाच्या गजाननच्या प्रेमात पडली. मात्र हि गोष्ट तिच्या पतीला समजताच त्याने विरोध करायला सुरुवात केली. अखेर मीराने तिचा प्रियकर गजानन याच्या साथीने पतीची हत्या करून त्याचा मृतदेह विहिरीत फेकला व त्याने आत्महत्या केल्याचे भासवले. पण पोलिसांनी त्यांचा हा बनाव हाणून पाडला आणि त्यांना अटक केली.





अनैतिक संबंधाचा शेवट हा वाईट असतो हे अनेक घटनांमधून उघड झाले आहे. अनैतिक संबंधात अडकलेले प्रेमी युगल आपल्या वाटेत अडसर ठरणाऱ्या व्यक्तीची हत्या करण्यास मागेपुढे बघत नाहीत. अर्धा संसार झाल्यानंतर देखील पर पुरुषाच्या नादी लागून आपल्या संसाराचे वाटोळे करणाऱ्या महिलांची या जगात कमतरता नाही. अशीच एक घटना अकोला जिल्ह्यात काही दिवसांपुर्वी उघडकीस आली. अकोला जिल्ह्याच्या पातुर तालुक्यातील सावरगाव येथे शाम खुडे नावाचे शेतकरी राहतात. शाम खुडे यांच्या शेताची बंडू डाखोरे आणी मीरा डाखोरे हे दाम्पत्य रखवालदारी करत होते. शेताची रखवालदारी





आरोपी मीरा आणि गजानन

करण्यासाठी डाखोरे दाम्पत्य दिवसरात्र शेतातच मुक्कामी रहात होते. बंडू आणि मीरा डाखोरे या दाम्पत्याला दोन मुली, दोन मुले अशी एकुण चार अपत्य आहेत. ...पान ६ वर

## दारुड्या मजुरांनी प्राणघातक हल्ला केला शुल्लक वादातून टेक्निशियनचा जीव गेला



गोवा/क्राईम रिपोर्टर

दारुड्याच्या नादाला चांगल्या माणसांनी लागू नये. कारण दारूच्या नशेत दारूड्याकडून काय होईल हे सांगता येत नाही. कारण दारूची नशा डोक्यात भिनल्यावर माणसाला शुद्ध राहत नाही. गोव्यातील एका बांधकाम साईटवर काम करणाऱ्या ५ बिहारी मजुरांनी शुल्लक कारणावरून दोन एसी तंत्रज्ञांवर हल्ला केला. यात एकाचा मृत्यू झाला, तर एक बचावला. या प्रकरणी पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली आहे.

मुंबई वडाळा पूर्व येथील सोहेल शेख आणि वशिम शेख हे दोघजण एसी टेक्नीशियन म्हणून काम करतात. त्याचे काम चांगले असल्याने एसीच्या कामासाठी त्यांना परराज्यातून ही बोलाविणे येत असते. गेल्या काही दिवसापूर्वी त्यांना गोव्यातील आसगाव येथील एका बांधकाम साईटवर त्यांना एसी टेक्निशियनचे काम मिळाले होते. ते काम त्याचे व्यवस्थीत चालू होते.दोन तीन महिने त्याचे ते काम चालू राहणार असल्याने ते दोघे तेथेच राहत होते.रात्र आणि दिवस त्याचे ते काम चालू होते. आठवडयातून पंधरा दिवसातून ते एकदा मुंबईला आपल्या घराकडे जात येत होते. आसगाव येथील बांधकाम साईट मोठी ...पान ६ वर

## शेअर बाजारात नशिबाने दिली नाही साथ आर्थिक नुकसानीमुळे कुटुंबाचा केला घात



पुणे/क्राईम रिपोर्टर

**शेअर मार्केटमध्ये नेहमीच चढउतार असतो. त्यामुळे गुंतवणुकदाराने सांभाळून गुंतवणूक करायची असते. पण सुरुवातीला भरपूर पैसा मिळाला कि माणसाला पैशाची हाव लागते आणि पैशाच्या याच हावेपोटी एका तरुणाने स्वतः आपले संपूर्ण कुटूंब संपवल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली आहे.**

इंजिनीअर तरुणाने आपल्या शिक्षणासोबत शेअर मार्केटमध्ये पैसा गुंतवला. सुरुवातीला बक्कळ नफा कमवला. अनेकांना प्रेरित करून त्यांच्यांकडून पैसेही घेतले. मात्र, बाजारात सातत्याने मंदी येत गेल्याने तो निराशेत गेला आणि त्याने टोकाचं पाऊल उचललं. आई-वडील आणि बहिणीसह स्वतःच्याही जेवणात ...पान २ वर

## रुबिनाच्या आत्महत्येने कुटुंब बरबाद कौटुंबिक वाद कि लव्ह जिहाद?

मुंबई/एस.कुमार



मयत रुबिना

मध्य प्रदेशातून पळवून आणलेल्या हिंदू मुलीचे मुस्लीम तरुणाशी लग्न झाले. त्यांना दोन मुलेही झाली. पण अचानक त्या मुलीने गळफास लावून आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. मात्र हि आत्महत्या नसून हत्या असल्याचा आरोप मुलीच्या आई-वडिलांनी केला असून या प्रकरणाला आता लव्ह जिहादचे स्वरूप दिले जात आहे. मात्र खरोखरच हा लव्ह जिहादचा प्रकार आहे कि आणखी काय आहे याचा आता पोलीस शोध घेत आहेत.



वपोनि कांदळगावकर

लव्ह जिहाद सध्या देशभर गाजतो आहे. मागील काही दिवसांपासून मुंबईत ही लव्ह जिहाद विषयी चर्चेला उत आला आहे. लव्ह 'जिहाद' हा एक अनधिकृत शब्द आहे जो कट्टर हिंदू गटाकडून वापरला जातो जो मुस्लिम पुरुषांनी प्रेमाच्या जाळ्यात फसवून हिंदू मुलींचे धर्मांतर करण्याच्या कटाला लव्ह जिहाद म्हणतात. लव्ह जिहाद दोन शब्दांनी बनला आहे. इंग्रजी भाषेतील लव या शब्दाचा अर्थ प्रेम आणि अरबी भाषेतील शब्द जिहाद असा होतो. याचा अर्थ एखादे उद्दिष्ट पूर्ण करण्यासाठी आपली पूर्ण शक्ती लावणे. म्हणजे जेव्हा एका विशिष्ट धर्माचे अनुयायी दुसऱ्या धर्मातील मुलींना अडकवून त्यांचे धर्मांतर करतात, तेव्हा या संपूर्ण प्रक्रियेला ...पान ६ वर

16 To 22 JANUARY 2023 - Page 2 (CRIME SANDHYA):Layout 1 1/14/2023 8:34 PM Page 1



पान १ वरून....

## लाखो करोडोंच्या घोषणा पण ...

झाले आहे. असे असताना सरकारने घोषणांचा पाऊस पाडून एवढ्या घोषणा केल्यात पण त्यासाठी लागणारा पैसा कुठून आणणार? तेही सरकारने जाहीर करायला हवे. लग्न करायला निघालेला माणूस हा शारीरिक दृष्ट्या सक्षम नसेल तर त्याला पोर कशी होणार? या प्रश्नाप्रमाणेच सरकारकडे पैसा नसेल तर विकासकामाच्या योजना कशा पूर्ण होतील? हा प्रश्नही बुद्धीजीवी लोकांना पडलेला आहे आणि या प्रश्नांची उत्तरे सरकारला द्यावीच लागतील.

## पैसे दिले नाहीत म्हणून सोयाबीन ...

माणसाच्या सहनशीलतेलाही मर्यादा असते. अशावेळी सहनशीलता संपली कि मग नात्यागोत्याचा जराही विचार न करता आपलीच माणसे त्याचा शेवट करतात. बुलढाणा येथील एकनाथ फोलाने हा सुद्धा असाच दारुडा होता आणि कुटुंबाला त्रास द्यायचा. मात्र सोयाबीनचे पैसे दिले नाहीत म्हणून त्यांनी सोयाबीन जाळून टाकले. त्यामुळे त्याची पत्नी व मुले भयंकर चिडली आणि दोन्ही मुले व पत्नीनेच त्याला ठार मारले आणि नैसर्गिकरीत्या मेला असे दाखवले. पण पोस्टमार्टेम अहवालात पोलखोल झाली आणि पोलिसांनी सर्व आरोपींना अटक केली. सोमवार दि. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी रायपूर पोलीस स्टेशनचे गोपनीय विभागाचे अमोल गवई एका राजकीय कार्यक्रमाच्या बंदोबस्तात गेले होते. त्यावेळी त्यांच्या मोबाईलवर एक कॉल आला. कॉल केलेल्या व्यक्तीने आपले नाव सांगून कोळीवाडा परिसरातील एकनाथ फोलाने या ५५ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू झाला असून तो संशयास्पद असल्याचे सांगितले, एकनाथ फोलाने या व्यक्तीच्या शेतातील सोयाबीन सुडी कुणीतरी पेटवल्याचे देखील फोनवर बोलणाऱ्या व्यक्तीने पलीकडून सांगितले. त्यावेळी सकाळचे ११ वाजले असावेत. अमोल गवई यांनी ही बाब त्वरीत ठाणेदार आठवले यांच्या कानावर टाकून ठाणेदारांची संमती घेऊन कोळीवाडा गाठले.

मयत एकनाथ फोलाने यांच्या घरात दोन मुले आणि पत्नी यांचा आक्रोश सुरु होता तर बाहेर अंत्यसंस्कारसाठी पाहुणे जमले होते. अंत्यसंस्कार करण्याची तयारी सुरू झाली होती. अमोल गवई यांनी पोलीस पथकासह मृतकाच्या पत्नीस एकनाथ फोलाने यांच्या मृत्यूचे कारण विचारले, तेंव्हा त्यांनी सांगितले की, आपले पती एकनाथ हे रात्री ११ वाजता घरी आले. त्यांनी पिण्यास पाणी मागितले आणि झोपी गेले. सकाळी त्यांना झोपेतून उठवण्याचा प्रयत्न केला असता ते मृतावस्थेत असल्याचे आढळले. नंतर पोलिसांनी मृतदेहाची बारकाईने पाहणी केली असता काही बाबी संशयास्पद दिसल्या. त्यामुळे मृतदेह पोलिसांनी पोस्टमार्टमसाठी सामान्य रुग्णालयात रवाना केला. उत्तरीय तपासणीनंतर मृतदेह नातेवाईकच्या ताब्यात देण्यात आला. त्यानंतर अंत्यसंस्कार करण्यात आले. दरम्यान पोलिसांना वेगवेगळी माहिती मिळत असली तरी प्रतिक्षा होती ती पोस्टमार्टम रिपोर्टची. दि. ५ नोव्हेंबर रोजी एकनाथ फोलाने यांचा पोस्टमार्टम रिपोर्ट रायपूर पोलिसांना मिळाला. त्यामध्ये मृतकास मारहाण करुन बरगड्या तुटल्याने त्याचा मृत्यू झाल्याचे नमूद केले होते. हा अहवाल वाचताच ठाणेदार राजवंत आठवले यांनी त्वरित तपासाची गती वाढवली. एकनाथ याच्या मृत्यूबाबत त्याची मुले राजू उर्फ गणेश उर्फ विजय, पत्नी सुभद्रा यांच्याकडे सखोल विचारणा केली. मात्र ते एकनाथ यांचा मृत्यू कसा झाला याबाबत माहिती नसल्याचे पोलिसांना सांगत होते. त्यानंतर पोलिसानी तिघांनाही वेगवेगळे घेऊन परत विचारणा केली. तेव्हा तिघांच्याही जबाबात तफावत असल्याने ठाणेदार आठवले यांनी विश्वासात घेऊन एकनाथच्या मोठ्या मुलास विचारणा केली. तेव्हा राजू उर्फ शांतीराम याने आपणच बापाच्या नेहमीच्या त्रासाला कंटाळून त्याला संपवल्याचे पोलिसांना सांगितले आणि खूनाचा गुन्हा उघडकीस आला. बुलढाणा जिल्ह्यातील रायपूर येथे एकनाथ अर्जुन फोलाने (वय ५५) हे कुटुंबासह रहायचे. पत्नी, ३ मुली, २ मुले असा त्यांचा परिवार होता. मुली विवाहित असून दोन्ही मुले अविवाहित आहेत. या परिवाराची ११ एकर शेती असून त्यातून मिळणाऱ्या उत्पन्नावर त्यांचा चरितार्थ चालत होता. एकनाथ यांना दारू पिण्याचे व्यसन लागले होते. त्यामुळे त्यांचा दारू पिऊन घरात धिंगाणा घालण्याचा प्रकार वाढला. त्याचा या नेहमीच्या प्रकारास घरातील सर्व लोक कंटाळले होते. घरात नेहमीची कटकट, वादविवाद होत होते.

त्यातच त्यांचे दारू पिण्याचे प्रमाण वाढल्याने घरातून दारू पिण्यास त्यांना विरोध होत होता. तर एकनाथ यांना दारूशिवाय काही सुचत नव्हते. त्यामुळे एकनाथ यांनी घरच सोडण्याचा निर्णय घेतला. त्यांनी ११ एकरपैकी ६ एकर शेती पत्नी सुभद्रा मुलगा शांतीराम, विजय यांच्या नावावर केली आणि ५ एकर शेती आपल्या नावावर ठेवली. ३ वर्षापूर्वी ते घराबाहेर पडले. घर सोडून गावातील अहिर यांच्या शेतात देखरेखीचे काम पत्करले. स्वतःच करायचे आणि खायचे असा प्रकार सुरू होता. काम करायचे मस्त दारू प्यायची असा त्याचा दिनक्रम होता. परिवाराला टेन्शन द्यायचे नाही असे त्यांनी जणू ठरवूनच टाकले होते. त्यांच्या नावावर असलेली शेतीही त्यांची मुलेच करायची आणि उत्पन्न घ्यायची. यावर्षी एकनाथ यांच्या नावावर असलेले सोयाबीन चांगले आले होते. दिवाळी अगोदर सोयाबीन सुडी शेतात लावली होती. सोयाबीनच्या पिकावर अंगावर असलेले कर्ज फेडणार व उर्वरित रक्कम वर्षभरासाठी कुटुंब चालवायला उपयोगी येईल असा विचार एकनाथ यांची मुले करत होती. दिवाळीनंतर भाऊबीजसाठी एकनाथ हे आपल्या बहीणीच्या घरी गेले होते. तिथे ४ दिवस राहिल्यावर ते दि. ३१ ऑक्टोबर २०२२ रोजी घरी आले. ते दारू पिऊन घरी आले. घरात येताच त्यांनी बायको आणि मुलांबरोबर वाद घालण्यास सुरूवात केली. माझ्या ५ एकरात काढलेल्या सोयाबीनच्या पिकातील काही पैसे मला लागतील अशी अट टाकू लागले. त्या कारणातून मुलांशी त्यांचा वादही झाला. शेवटी रागात ते सरळ शेतात निघून गेले. रागाच्या भरात ५ एकरातील सोयाबीनची सुडी रात्री ११ वाजता पेटवून दिली. सोयाबीनसोबत त्यांनी मुलांची सर्व स्वप्नही पेटवली होती. सोयाबीन सुडी पेटवून तो सरळ रहात असलेल्या शेतात निघून गेला. शेतातील सोयाबीन सुडी पेटवल्याचे मुलांना समजताच ते हादरले. घरात रडारड सुरू झाली. शांतीराम यास बापाचा खूप राग आला. त्याने दुचाकी घेऊन पहिल्यांदा शेत गाठले आणि पेटलेली सोयाबीन सुडी पाहून त्याचा क्रोध अनावर झाला. या सुडी पेटवण्याचा सूड घेण्यासाठी त्याने बाप रहात असलेले शेत गाठले. तिथे जाऊन बापास सुडी का पेटवली? याबाबत जाब विचारला. तेंव्हा तू मला विचारणारा कोण, ते माझे शेत आहे. मी काहीही करेल असे उलट उत्तर एकनाथ यांनी मुलास दिले. हे ऐकून शांतीराम भडकला. त्याने बापास शिवीगाळ करून काठीने मारहाण केली. त्यांना जबरदस्तीने दुचाकीवर बसवून घरी आणले. आई व लहान भाऊ गणेश यांच्यासमोर बापास परत सोयाबीन सुडी का पेटवली याविषयी विचारणा केली. तेव्हा एकनाथ सर्वांना शिवीगाळ करू लागले. आधीच शांतीराम चिडला होता, त्यातच घरातही शिवीगाळ सुरू केल्याने त्याचा संयमच संपला. त्याने बापास लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्याची एक लाथ बरगडीवर बसताच अंगाने कृश असलेला एकनाथ जमिनीवर कोसळला तो न उठण्यासाठीच.

एकनाथ निपचित पडल्यानंतर कुटुंबीय घाबरले. त्यांना उठवण्याचा प्रयत्न करू लागले पण ते काही उठत नव्हते. कारण त्यांचा केव्हाच मृत्यू झाला होता. बापाचा मारहाणीत मृत्यू झाल्याचे लक्षात आल्यावर आई आणि दोन्ही मुले घाबरली. त्यांनी हा मृत्यू नैसर्गिक दाखवण्यासाठी एकनाथ यांच्या अंगावर चादर टाकून सकाळी ६ वाजता आरडाओरड सुरू केली. एकनाथ यांचा झोपेत मृत्यू झाल्याची अफवा पसरवून आक्रोश सुरू केला. रडतांना एकनाथ यांची पत्नी ते रात्री ११.३० ला घरी आले, खोकला येत आहे म्हणून त्यांना प्यायला पाणी दिले. त्यानंतर ते झोपी गेले, मात्र सकाळी ते उठत नसल्याने त्यांचा मृत्यू झाल्याचे समजले असे सांगू लागली. शेजारीपाजारी आणि गावकरी जमले. नातेवाईकांना कळवण्यात आले. अंत्यसंस्कार करण्याची तयारी करण्यात आली, मात्र रात्री सोयाबीन सुडी पेटणे आणि सकाळी एकनाथ यांचा मृत्यू होणे ही बाब संशयास्पद वाटत होती. तसेच भाऊबीजेला एकनाथ बहीणीच्या घरी गेल्यावर मला मुले शिवीगाळ, मारहाण करतात असे सांगत होता. ही माहिती समजल्याने उपस्थितांना शंका आली. कोणीतरी याबाबत रायपुर पोलिसांना कळवले आणि या खूनाचा उलगडा झाला. या प्रकरणी रायपूर पोलिसांनी एकनाथ अर्जुन फोलाने यांच्या खून प्रकरणी संशयित आरोपी मुलगा राजू उर्फ शांतीराम एकनाथ फोलाने (वय २८), पत्नी सुभद्रा एकनाथ फोलाने (वय ४७), लहान मुलगा गणेश उर्फ विजय एकनाथ फोलाने (वय १९) यांच्याविरुद्ध अप. नं. २५२/२०२२ कलम ३०२, २०१, २०२, २०३ अन्वये गुन्हा दाखल केला. शनिवार दि. ५ नोव्हेंबर २०२२ रोजी तिघा माय- लेकांना अटक करण्यात आली. यातील मृतकची पत्नी आणि लहान मुलगा यांना सर्व घटना माहित असून त्यांनी सर्व प्रकार दडपण्याचा प्रकार केला म्हणून गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा तपास रायपूर पोलीस ठाण्याचे ठाणेदार सहाय्यक पोलीस निरीक्षक राजवंत आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गजानन बाष्टेवाड, पोलीस हेडकॉन्स्टेबल शांताराम जाधव, पोलीस नाईक अमोल गवई, श्रीकांत चिटवार, देविदास दळवी करत आहेत

## सतत मोबाईलवर बोलणे तिला...

घरातील किरकोळ कारणातून वाद घालून भांडण काढत होती. त्या भांडणात ती तिला तुझे कोणाबरोबर लफडे आहे आणि तु काय गुण उधळीत आहेस ते मला माहित आहे असे म्हणत होती. सासूने आपल्या चारित्र्यावर शितोंडे उडविल्यावर आरतीला ही तिचा राग येत होता. त्यातु सासूने मुलगा समीर याला आरती विषयी भलते सलते सांगून त्याचे कान भरले होते.त्याच्या ही डोक्यात पत्नीच्या चारित्र्याचा किडा वळवळत असल्याने आपली आई सांगते ते खरेच आहे आरतीच बाहेरख्यालीपणाने वागून संसारात विष कालवत आहे असा त्याने ही गैरसमज निर्माण करून घेतला. तो आता दररोज दारू पिऊन येवून आरतीला मारहाण करीत शिव्या घालून तिच्या माहेरच्या लोकांचा उध्दार करीत होता. या भांडणातून आरती ही मुलगा निशांत याला घेऊन आपल्या माहेरी सारखी जात होती. तिने माहेरी आपल्या आई वडिलांना भावांना सासू आणि नवरा आपल्या चारित्र्यावर संशय घेऊन मारहाण करीत असल्याचे सांगितले होते. त्यामुळे तिच्या माहेरच्या लोकांनी ही कांचनवाडीला येवून समीर आणि त्याच्या आईला आरतीला त्रास देवू नका आपली मुलगी वाईट वागणार नाही तुम्ही उगाच तिला त्रास देवून मारहाण करू नका असे सांगून चार शहाणपणाच्या गोष्टी समीरला सांगितल्या होत्या. त्याचे सांगणे ही पालथ्या घडवरचे पाणी ठरले होते याची प्रचिती आरतीच्या माहेरच्या लोकांना लवकरच आली होती. तो परत परत आरतीच्या चारित्र्यावर संशय घेऊन तिला मारहाण करीत होता.त्याचा असा समज झाला होता की आरतीचे लग्नाच्या अगोदरपासून कुणाबरोबर तरी प्रेमसंबंध होते आणि ते अजून ही चालूच आहेत. आपल्याला झालेला मुलगा हा आपला नसून तो दुसऱ्या कोणाचा तरी आहे या विचारापर्यंत तो आला होता. अलिकडे तो मुलग्याला ही हिडीस फिडीस करीत होता. यावर आरती त्याला म्हणायची तुम्हाला काय मारहाण करायची काय संशय घ्यायचा तो माझ्यावर घ्या उगाच त्या मुलावर संशय घेऊन डोक्याचा भुंगा करून घेवू नका. भांडणात तिने त्याला किती तरी वेळा सांगितले की आपले बाहेर कुणाबरोबर कसले ही संबंध नाहीत, हा मुलगा तुमचाच आहे तरी त्याचा तिच्या सांगण्यावर विश्वास बसत नव्हता.याला ती तरी काय करणार होती.त्याचा संशय काही कमी होत नव्हता. संशयाने संसाराची राख रांगोळी होते हे ही तिने त्याला सांगितले होते. पण त्याच्या डोक्यात नेहमीच तिच्या चारित्र्याचा संशय घोळत असल्याने तो तिला त्याच नजरेने पाहत होता. कामावरून येताना दारू पिऊन यायचे आणि आरतीला मारहाण करायची असा त्याचा नित्यक्रम होता. त्यातच त्यांच्या भांडणात त्याची आई तेल ओतण्याचेच काम करीत होते. त्यामुळे आगीत भडका उडायला वेळ लागला नाही. रविवार त्याला सुट्टी असल्याने तो कामावर गेला नव्हता. दिवसभर तो घरात बसूनच होता. रात्री ८च्या सुमारास तो घरातून बाहेर गेला.

दिवसभर त्याच्या आईची आणि आरतीची भांडणे चालू होती. म्हणून तो वैतागलेला होता. त्यातच तो रात्री फुल्ल दारू पिऊन घराकडे आला. त्यावेळी त्याने आरतीबरोबर भांडण काढून तिला जबर मारहाण केली.तो आपल्या आईची बाजू घेऊन तिच्या चारित्र्यावर परत परत संशय घेऊन तू बाहेरख्यालीपणाने वागायला लागली आहेस तुझे बाहेर लफडे चालू आहे तुघे घरात लक्ष नाही असे म्हणत त्याने तिला मारहाण केली होती. त्या रागात आरती ही मुलगा निशांत याला घेऊन उपाशी पोटी तशीच झोपली होती. इकडे समीरने फुल्ल दारू पिली असल्याने त्याला नीट उभे ही राहता येत नव्हते. तो ही तसाच झोपला होता. त्याचा राग अजून गेला नव्हता. तो झोपेतच आरतीकडे दात ओठ खात बघत होता. त्याला मुलगा आपला नाहीच असे वाटत असल्याने तो त्याच्याकडे ही तुच्छ नजरने बघत होता. पहाटे एक दीडच्या सुमारास तो झोपेतून आरतीजवळ गेला.त्याचा राग अजून गेला नसल्याने तो तिच्याकडे रागाने पाहत त्याने तिच्या गळ्याभोवती दोरी टाकली आणि तिचा गळा आवळयला सुरूवात केली.ती झोपतून जागी झाली तरी समोर पती समीर हैवान होऊन तिचा दोरीने गळा आवळत होता. ती त्याचा प्रतिकार करीत गळ्यातून आपली दोरी काढत असताना समीरने पुन्हा मोबाईल चार्जरच्या वायरीने तिचा गळा जोरात आवळून धरला. त्याने तिला ओरडण्याची ही संधी दिली नाही मोबाईल चार्जरची वायर तिच्या गळ्याभोवती घट्ट आवळली गेल्याने तिचा श्वास कोंडला गेला. काही क्षणातच ती हातपाय हालवत शेजारीच झोपलेल्या आपल्या मुलाकडे पाहत तिने जीव सोडला. तिचा आपल्या हातून खून झालाच आहे आपण तिला मारून टाकले आहे आता मुलग्याला तरी का सोडयाचे? म्हणून त्याने झोपलेल्या मुलगा निशांत याचा गळा ही आवळून धरला. तो लहानगा त्याचा काहीच प्रतिकार करू शकत नव्हता. तो गळा दाबत असताना जोर जोरात रडत होता. काही क्षणातच तो ही थंड पडला. त्याचा ही खून केल्यानंतर तो शांत झाला. काही वेळ तो बायकोच्या मुलग्याच्या मृतदेहाशेजारीच बसून राहिला. त्या नंतर त्याने या घटनेची माहिती ११२ क्रमांक या टोल फ्री क्रमांकावर फोन करून पोलीसांना सांगितली. सातारा पोलीसांना या घटनेची माहिती मिळताच ते तातडीने घटनास्थळी दाखल झाले.या दुहेरी हत्याकांडची माहिती त्यांनी वरिष्ट पोलीस अधिकाऱ्यांना दिली.ते ही तातडीने घटनास्थळी दाखल झाले. पोलीसांनी घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेह औरंगाबाद येथील घाटी रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवून दिले. घटनास्थळी बघ्यांची गर्दी झाली होती. या घटनेची माहिती पोलीसांनी मयत आरतीच्या माहेरच्या लोकांना दिल्यावर ते ही सकाळ पर्यत कांचनवाडी येथे आले. ते आल्यावर त्यांनी समीरला आणि त्याच्या आईला मारहाण करायला सुरूवात केली. पोलीसांनी वेळीच हस्तक्षेप करून त्यांना आवरते घेतले. घटनास्थळी संशयीत आरोपी समीर मस्के हा बसून होता. पोलीसांनी त्याला ताब्यात घेऊन सातारा पोलीस स्टेशनला आणून त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली.त्याने पोलीसांना माहिती देवून सांगितले की पत्नी आरती हिचे वागणे बरोबर नव्हते. ती बाहेर ख्यालीपणाने वागत असल्याने आपला तिच्या चारित्र्यावर संशय होता. त्यातच आपल्याला झालेला मुलगा ही आपला नसल्याचे आपल्याला वाटत होते त्यामुळे रविवार रात्री भांडणात तिचा व मुलग्याचा गळा आवळून खून केला. अशी कबुली त्याने पोलीसांना दिली. मयत आरती हिच्या माहेरच्या लोकांनी दिलेल्या फिर्यादीवरून पोलीसांनी आरती समीर मस्के (वय २८) व निशांत मस्के (वय अडीच वर्ष) याच्या खून प्रकरणी समीर विष्णु मस्के (वय ३०) याच्या विरोधात भा.दं.वी.कलम ३०२,३४ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्याला औरंगाबाद येथील मा.कोर्टासमोर हजर केले असता मा.कोर्टाने त्याला तीन दिवसाची पोलीस कोठडी सुनावली होती. पोलीस कोठडी दरम्यान पोलीसांनी त्याचेकडून गुन्हयात वापरलेली दोरी आणि मोबाईल चार्जर जप्त केले.या गुन्हयात समीरची आई हिच्यावर ही पोलीसांनी गुन्हा दाखल केला. तिचा या घटनेत काय सहभाग आहे का? याचा तपास ही पोलीस करीत आहेत. या घटनेचा पुढील तपास सातारा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक प्रशांत पोतदार हे करीत आहेत. संशयाने मन नाहीत तर संसार ही पोखरला जातो हेच या घटनेवरून दिसून येते. केवळ पत्नीच्या वागण्या बोलण्यात फरक पडला म्हणून संशय घेऊन तिला मारहाण करणे आणि त्यातून अशा प्रकारची दुहेरी खूनाची घटना घडणे म्हणजे साप साप म्हणून काठी बडवल्यासारखेच आहे.

## प्रियकराची ब्लॅकमेलिंग प्राणावर...

काही दिवसांनी दारु पिण्याचे व्यसन लागले. दारुच्या आहारी गेल्यानंतर या विवाहीतेचा पती आपल्या वेगळ्याच दुनियेत दंग रहात होता. आपल्या परिवाराचा त्याला विसर पडत असे. त्याच्या दारुच्या व्यसनाला त्याची पत्नी पार वैतागली होती. या विवाहितेचा पती दारुच्या आहारी जात असल्याची नामी संधी साधून गावातील अशोक गटलु कोळी याने त्या विवाहीतेवर प्रेमाचे जाळे फेकण्यास सुरुवात केली. त्याने त्या विवाहितेच्या दुखा:वर हळूच फुंकर मारण्यास सुरुवात केली. अशोकच्या बोलण्यात भोळीभाबडी विवाहीता फसली. तिला भुलथापा देण्याचे काम अशोकने सुरु केले. तिशीतील विवाहितेला प्रेमाच्या जाळ्यात अडकवण्यात तो चांगल्याप्रकारे यशस्वी झाला. अशोकच्या भुलथापांना बळी पडलेली विवाहीता त्याच्या प्रेमात पुरेपुर फसली. ती विवाहीता आपल्या प्रेमात अडकल्याचे लक्षात आल्यानंतर हळूच गोड बोलून त्याने तिच्यासोबत फोटोसेशन करुन घेतले. भुलथापा देणाऱ्या अशोकसोबत त्या विवाहीतेने फोटो काढले. तिच्यासोबत होत असलेले संभाषण देखील अशोकने लबाडीने रेकॉर्ड करुन घेतले. अशा प्रकारे गोड बोलून त्याने त्या विवाहितेसोबत फोटो काढून घेत तिच्यासोबत होणारे संभाषण देखील रेकॉर्ड करुन घेतले. आता या फोटो आणि ऑडीओ क्लिपच्या बळावर तिला सतावण्याचा प्लान त्याने आखला.

नवरा दारुच्या आहारी गेला असतांना ती विवाहीता अशोकच्या आहारी गेली. तिचा पती दारुड्या असल्याचा अशोकने पुरेपुर गैरफायदा घेतला. काही दिवसांनी गोड बोलून त्याने तिच्या कानातील सोन्याचे दागिने देखील मागून घेतले. अशोकच्या प्रेमात पडलेल्या विवाहितेने आपल्या कानातील पाच ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने अशोकला देवून टाकले. आपली पत्नी आणि गावातील अशोक कोळी यांच्यातील प्रेमसंबंधाची समाधान यास काहीच खबरबात नव्हती. तो त्याच्या मद्याच्या नशेत धुंद रहात होता. मद्याच्या नशेत राहणारा पतीला ती विवाहीता दचकून रहात असे. त्यामुळे या दागिन्यांबद्दल तिने त्याला काहीच सांगितले नाही. दरम्यान तिच्या कानातील पाच ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने दिसत नसल्याचे बघून तिच्या सासूने तिला विचारणा केली. त्यावेळी तीने खरा खरा प्रकार सासूकडे कथन केला. आपले अशोकसोबत प्रेमसंबंध सुरु असून त्यानेच माझ्या कानातील सोन्याचे दागिने घेतल्याचे तीने कबुल केले. ती विवाहीता त्याला तिचे कानातील दागीने मागत होती. मात्र तो तिला देत नव्हता.

त्यामुळे त्या विवाहीतेच्या सासूसह तिच्या लहान दिराने अशोककडे त्याला तिच्या दागिन्यांची मागणी केली. मात्र अशोकने तीचे कानातील पाच ग्रॅम वजनाचे दागिने देण्यास स्पष्ट नकार दिला. तुम्ही जर तिच्या कानातील दागिने माझ्याकडे मागीतले तर मी तीच्यासोबत काढलेले फोटो आणि तिच्यासोबतच्या संभाषणाची ऑडीओ क्लिप सर्व गावात व्हायरल करेन, तिची बदनामी होईल अशी त्याने दोघांना उघड उघड धमकीच दिली. त्या विवाहीतेचे अशोकसोबत असलेले प्रेमसंबंध, फोटो आणि ऑडीओ क्लिप गावातील लोकांपर्यत गेल्यास आपली बदनामी होईल याचा अंदाज तिच्या सासू आणि दिराला आला. त्यामुळे सुरुवातीला दोघांनी त्याला नम्रतापुर्वक तो फोटो आणि ऑडीओ क्लिप डिलीट करण्यास सांगितले. त्यानंतर ते दागिने परत देण्याची देखील विनवणी केली. मात्र अशोक त्याच्या नकारावर ठाम होता. तो दोघांना ब्लॅकमेल करु लागला. अशोकचा नकार आणि ब्लॅकमेलींग बघून वादाला सुरुवात झाली. त्या विवाहीतेच्या सासू आणि दिराने अशोकसोबत वाद घालण्यास सुरुवात केली. आपल्या आई आणि भावाचा अशोकसोबत वाद झाल्याचे त्या विवाहितेच्या पतीच्या कानावर आले. अशोकसोबत तुम्हा दोघांचा वाद का झाला? अशी त्या विवाहितेच्या मद्यपी पतीने त्याच्या लहान भावाला विचारणा केली. आपल्या पत्नीचे गावातील अशोकसोबत प्रेमसंबंध असल्याची माहिती त्याला भावाकडून समजली. एवढेच नव्हे तर तिने कानातील दागिने अशोकला दिल्याचे देखील त्याला समजले. हे दागीने मागितल्यास आपल्या पत्नीसोबत काढलेले फोटो आणि तिच्यासोबतच्या संभाषणाची ऑडीओ क्लिप व्हायरल करण्याची अशोक धमकी देत असल्याचे कटू सत्य त्या मद्यपी पतीला समजले. आपल्या पत्नीचे गावातील अशोकसोबत असलेले प्रेमसंबंध तिच्या आई आणि भावाला देखील माहित असल्याचे त्याला समजले. त्यानंतर तो घरी आला.

घरी आल्यानंतर त्याने पत्नीकडून सर्व प्रकार पुन्हा समजून घेतला. तुम्ही नेहमी मद्याच्या नशेत रहात असल्यामुळे भितीपोटी मी खरा प्रकार तुम्हाला सांगितला नाही असे त्या विवाहीतेने पतीजवळ कबुल केले. आता माझे कामात लक्ष लागत नसून मी माझ्या जीवाचे बरे वाईट करुन घेईन असे देखील तिने पतीला म्हटले. विषय नाजूक आणि संवेदनशील होता. अशोक हा आपल्याच समाजाचा असल्यामुळे त्याच्या विरुद्ध पोलिसात तक्रार दिल्यास गावात आपलीच बदनामी होईल अशी भिती त्याला सतावत होती. आपल्या पत्नीची बिघडलेली मानसिक अवस्था ओळखून तिच्या पतीने तिची समजूत घातली. आई घरी आल्यानंतर आपण अशोकची पोलिसात तक्रार देऊ असे सांगत त्याने पत्नीची समजूत घालत वेळ मारुन नेली. मात्र बदनामीच्या भितीने त्या विवाहीतेच्या मनाची घालमेल सुरुच होती. शिवाय कानातील दागिने गेल्याचे दुख: देखील तिला होते. ४ ऑक्टोबर २०२२ चा दिवस उजाडला. या दिवशी सकाळी आठ वाजेच्या सुमारास घरातील सर्व जण कामानिमित्त घराबाहेर गेले होते. ती विवाहीता आणि तिची सात वर्षाची मुलगी अशा दोघी मायलेकी घरी होत्या. घरी कुणी नसतांना तिने आपल्या सात वर्षाच्या मुलीला सोबत घेत गावाबाहेर असलेल्या शेतातील विहीर गाठली. मागचा पुढचा विचार न करता तीने चिमुकल्या मुलीसह विहीरीच्या पाण्यात उडी घेत आपली जीवनयात्रा संपवली. आपल्या पश्चात आपल्या मुलीकडे कोण लक्ष देणार असा विचार करत तीने तिच्या मुलीला देखील आपल्यासोबत देवाघरी नेले. सायंकाळी पावणेपाच वाजता त्या विवाहीतेचा पती घरी परत आला. आपल्या पत्नीने मुलीसह विहीरीत उडी घेत आत्महत्या केल्याचे त्याला समजले. त्याने नातेवाईकांसह घटनास्थळावरील विहीरीजवळ जावून पाहिले असता विहीरीत दोघा मायलेकींचे मृतदेह तरंगत असल्याचे सर्वांना दिसले. त्या विवाहितेचा मुलगा जळगावला मामाच्या घरी शिकण्यासाठी रहात असल्यामुळे त्याचा जीव वाचला. या घटनेची माहिती समजल्यानंतर मारवड पोलिसांचे पथक घटनास्थळावर आले. जमलेल्या लोकांच्या मदतीने दोघांचे मृतदेह बाहेर काढण्यात आले. त्यानंतर पुढील कायदेशीर कारवाई करण्यात आली. दोघा मायलेकींवर माहेरी जळगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यानंतर तिन महिन्यांचा कालावधी उलटला. तिन महिन्यानंतर त्या विवाहीतेचा परिवार दुखाःतून सावरला. दुखा:तून सावरल्यानंतर आत्महत्या करणाऱ्या विवाहीतेच्या पतीने मारवड पोलिस स्टेशन गाठले.

पोलिस निरीक्षक जयेश खलाणे यांची भेट घेत त्याने सर्व घटनाक्रम त्यांना कथन केला. अशोक गटलू कोळी याच्याविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला. भाग ५ गु.र.न. ३/२३ भा.द.वि. ३०६ नुसार दाखल गुन्ह्याचा पुढील तपास पोलिस उप निरीक्षक बाळकृष्ण शिंदे आणि त्यांचे सहकारी मुकेश साळुंखे यांच्याकडे देण्यात आला. या घटनेतील विवाहीतेच्या पतीचे दारुचे व्यसन आणि तिला लाभलेली अशोकची चुकीची संगत हे दोन घटक या घटनेला कारणीभुत असल्याचे म्हणता येईल. समाधान नेहमी दारुच्या नशेत रहात असल्यामुळे त्याचा गैरफायदा अशोक गटलु कोळी याने घेतला. अशोकने त्या विवाहीतेला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्यासोबत फोटो काढून तिच्यासोबतच्या संभाषणाची ऑडीओ क्लिप तयार केली. तिच्या कानातील दागिने देखील त्याने गोड बोलून काढून घेतले. त्यानंतर फोटो आणि ऑडीओ क्लिपच्या बळावर त्याने तिला ब्लॅकमेल करण्यासह दागिने परत करण्यास नकार दिला. या घटनेतील विवाहितेच्या बाबतीत बोलायचे झाले तर तिने चुकीच्या व्यक्तीसोबत संगत केली. बदमाश व्यक्तीची संगत कधीही धोकेदायक असते. अशोक गटलु कोळी सारख्या बदमाश व्यक्तीची संगत केल्यास मनुष्याचे भवितव्य धोक्यात येऊन तो परावलंबी होतो. अशोक कोळी सारखे बदमाश लोक या जगात पावलोपावली असून त्यांना ओळखण्याची आणि त्यांच्यापासून सावध राहण्याची प्रत्येकाला गरज आहे. गोड बोलून गळा कापणाऱ्या लोकांची या जगात कमतरता नाही.

## शेअर बाजारात नशिबाने दिली नाही ...

विष कालवून संपूर्ण कुटुंबच संपवलं. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातलं हे कुटुंब होतं. ही धक्कादायक घटना घडली पुण्यामध्ये. जिल्ह्यातील दर्यापूर शहरातील रविदास नगर येथील रहिवाशी दीपक थोटे यांच्या कुटुंबाची स्थिती अतिशय गरीबीची होती. त्यांच्याकडे कुठलीही शेती नव्हती. त्यांनी आपल्या मुलाचे शिक्षण दर्यापूर या ठिकाणी पूर्ण केले. व मुलाला इंजीनिअर बनवले. आणि एक मुलगी ही शिक्षण घेत होती. मुलगा ऋषिकेश थोटे हा इंजिनीअर झाल्यानंतर त्याने शेअर मार्केटमध्ये पैसा गुंतवला. त्यामध्ये त्याला आधी नफा मिळत गेला. त्या नफ्यातून ऋषिकेशने आपले घर हे दर्यापूर येथे बांधले आणि काही दिवसात ऋषिकेश हा शेतीसुद्धा घेणार होता. ऋषिकेशला वारंवार शेअर मार्केटमध्ये नफा दिसत होता. त्याने दर्यापूर शहरातील कित्येक लोकांपासून पैसा घेतला आणि तो पैसा शेअर मार्केटमध्ये गुंतवला. नंतर ऋषिकेश हा आपल्या कुटुंबाला घेऊन एक वर्षापूर्वी पुण्यात राहण्यासाठी गेला. पुण्यात तो एका खासगी कंपनीमध्ये कामही करत होता.

ऋषिकेशने शेअर मार्केटमध्ये लाखो रुपये गुंतवले होते, अशी माहिती समोर येत आहे. मात्र शेअर मार्केटमध्ये मंदी आल्याने ऋषिकेश थोटे हा पूर्णतः हवालदिन झाला होता. लोकांपासून लाखो रुपये घेतल्याने पैसा आता कसा परत करावा? या चिंतेत ऋषिकेश होता. पण या संकटातून बाहेर पडण्याऐवजी त्याने टोकाचं पाऊल उचललं. त्याने जेवणात विष कालवलं. आपल्या कुटुंबातील आई-वडील आणि लहान बहिणीच्या जेवणातही विष कालवलं. या घटनेत थोटे कुटुंबातील चारही सदस्यांचा धक्कादायक मृत्यू झाला. सदरच्या घटनेची माहिती दर्यापूर येथे कळली. त्यांचे जवळचे नातेवाई आणि कुटुंबात मोठा दुःखाचा डोंगर कोसळला. सर्वांवर पुण्यातच अंत्यसंस्कार करणार असल्याची माहिती त्यांच्या नातेवाईकांकडून देण्यात आली आहे.

# होटगी रोड विमानतळावरून लवकरच नागरी विमानसेवा सुरू करणार -मुख्यमंत्री एकनाथ शिंदे

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी सोलापूरकरांच्या तीव्र भावना गेल्या अनेक वर्षापासून सोलापूर विकास मंचच्या वतीने केंद्र, राज्य आणि स्थानिक पातळीवर अभ्यासपूर्ण आणि सातत्याने पाठपुरावा करुन सुरू आहे. सर्व सुविधांनी उत्कृष्ट विकसित एअरपोर्ट अथॉरिटी ऑफ इंडियाच्या देखरेखीखाली असलेल्या होटगी रोड विमानतळावरून भारत सरकारच्या अत्यंत महत्वाकांक्षी प्रकल्पां पैकी एक केंद्रीय नागरी उड्डयन मंत्रालयाच्या उडान योजने अंतर्गत सदर विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू करण्यासाठी दोन वेळा निवड होऊनही सामान्य सोलापूरकरांना नागरी विमानसेवा उपलब्ध होऊ न शकल्याने सोलापूरकरांच्या तीव्र भावना आमच्या पर्यत ईमेल, प्रशासनाच्या विविध विभागां अंतर्गत प्राप्त शेकडो पत्र आणि निवेदनाद्वारे आमच्या पर्यत पोहचत असलेल्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सोलापूर विकास मंचचे सदस्य रोहित मोरे यांना सांगितले. होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवेतील सर्व अडचणी आणि अडथळे दूर करुन महाराष्ट्र शासनाच्या वतीने लवकरच सर्व सोलापूरकरांसाठी आम्ही विमानसेवा सुरू करणारच आहोत, असे



ठोस आश्वासन सोलापूर विकास मंचचे सदस्य रोहित मोरे यांना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिला. सोलापूर विकास मंचच्या वतीने मागील वर्षीच्या नोव्हेंबर महिन्यात संपूर्ण महिनाभर आयोजित चक्री उपोषण आणि सोलापूर विकास मंचच्या वतीने डिसेंबर महिन्यात आयोजित भव्य मुक मोर्च्या विषयीची संपूर्ण माहितीपर वृत्तांत सोलापूर विकास मंचचे सदस्य रोहित मोरे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना दिला. सोलापूर विकास मंचच्या वतीने होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू होई पर्यत चक्री उपोषणाला समर्थन देण्यासाठी सोलापूर जिल्हयातील ४५ लाख लोकसंख्येवर प्रभाव असलेल्या सोलापूरातील तब्बल १९८ पेक्षा अधिक नामांकित संस्था आणि संघटनेच्या वतीने पाठिंबा प्राप्त झाला, ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने देश विदेशातुन तब्बल १२,५०० पेक्षा अधिक लोकांनी प्रत्यक्ष उपोषणस्थळी आणि ऑनलाईन पद्धतीने सह्यांच्या मोहिमेस सोलापूरकरांनी उत्स्फुर्तपणे प्रतिसाद दिला. ह्या सर्वाच्या जनभावनांचा आदर करुन होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवेस सर्व अडथळे तात्काळ दुर करुन नागरी विमानसेवा सुरू करावी अशी विनंती सोलापूर विकास मंचचे सदस्य रोहित मोरे यांनी महाराष्ट्रचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन देऊन केली. महाराष्ट्राचे महसूलमंत्री तथा सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचा ह्या आठवड्यात सोलापूरात नियोजित दौरा असून सोलापूर विकास मंचच्या सदस्यां समवेत झालेल्या मागील बैठक, मुंबई भेटी दरम्यान दिलेल्या आश्वासनांची पूर्तते विषयी पाठपुरावा करण्यात येणार आहे. सोलापूर महानगरपालिका आयुक्त यांच्या वतीने अनाधिकृत बेकायदेशीर बांधकामांवर कारवाई करण्याचे कलम ४७८ अंतर्गत राखून ठेवण्यात आलेल्या निर्णयाबद्दल सोलापूरकरांच्या तीव्र भावना पालकमंत्र्यांकडे पोहच करणार असल्याची माहिती सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी दिली. भारतीय संविधानाने सर्वसामान्य भारतीयांना दिलेल्या नैतिक अधिकारांची सोलापूरात पायमल्ली होत असल्याचे चित्र स्पष्ट दिसुन येत असुन, केंद्र, महाराष्ट्र राज्य शासन आणि स्थानिक प्रशासनाच्या वतीने जाणिवपुर्वक होणाऱ्या अन्याया विरोधात सोलापूरकरांचे विविध पद्धतीने वेगवेगळ्या स्तरावर तीव्र आंदोलन होतील. नागरी विमानसेवेस सर्व प्रमुख अडथळे आणि अडचणी दुर करुन सोलापूरकरांच्या जनभावनांचा आदर राखत तात्काळ महाराष्ट्र राज्य सरकार लवकरच होटगी रोड विमानतळावरून नागरी विमानसेवा सुरू करतील असा आशावाद सोलापूर विकास मंचच्या सदस्यांनी व्यक्त केला आहे.

# विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळाचे आयोजन!

**सोलापूर/प्रतिनिधी**

सालाबादा प्रमाणे अक्कलकोट येथे विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने शनिवार दि. १८.०३.२०२३ रोजी सर्वधर्मीय सामूदायिक विवाह सोहळा आयोजीत करण्यात आल्याची माहिती पत्रकार परिषदेत प्रतिष्ठानचे अध्यक्ष आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी दिली. लग्न हा भारतीय जीवन संस्कृतीचा कणा आहे. आजच्या महागाईच्या काळात सर्वसामान्यांना लग्नाचा खर्च व नियोजन करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते. यामुळेच समाज ऋण म्हणून विवेकानंद प्रतिष्ठान सर्वधर्मीय सामुदायिक विवाह सोहळ्यांचे आयोजन करीत असते. मागील ११ वर्षापासून सर्वधर्मीय सामुदायिक विवाहसोहळयाचे आयोजन अतिशय नीटनेटकेपणाने करून अनेक नववधुवरांचा संसारला गती दिली आहे. या विवाह सोहळ्यात नोंदणी केलेल्या नववधुवरांना असा आहेर, संसार उपयोगी साहित्य देण्यात येते. तरीच नवदापत्याना संसाराबद्दल योग्य समुपदेशन व वैदयकीय मार्गदर्शन केले जाते. मुखीसंसारातून पहिली मुलगी जन्मात आल्यास मुलीच्या नावाने २ हजार रुपयेचा ठेव पावती देण्यात येते. विवाह सोहळा शिस्तबध्द व रितीने पार पाडण्यासाठी विवेकानंद प्रतिष्ठानच्या सदस्यांचे वेगवेगळ्या समित्या गठित केल्या जातात. त्याप्रमाणे प्रतिष्ठानचे सर्व सदस्य कार्य करीत असतात. विवाह कार्यासाठी वरिष्ठ प्राथमिक शाळा प्रांगण व श्रीमंत निर्मलाराजे कन्या प्रशाला येथे सुमारे ५० हजार वेअर फुटाचे प्रांगण सजविण्यात येते. विवेकानंद प्रतिष्ठान सदस्य व समाजकार्याची



आवड असणारे अक्कलकोट मधील संस्था, पदाधिकारी व प्रतिष्ठीत नागरिक तन, मन, धनाने कार्यरत असतात. विवेकानंद प्रतिष्ठानच्या वतीने विवाह सोहळ्यात विवाहोत्सुक जोडप्यांनी जास्तीत जास्त नोंदणी करावे असे आवाहन करण्यात आले. विवाह सोहळ्याच्या माहितीसाठी लोकमंगल सुपर बार अक्कलकोट, स्वामी विवेकानंद पतगंधा व स्वामी विवेकानंद मल्टीस्टेट अक्कलकोट, हन्दूर, किसी, मेंदगी, सरवल च साइना (कर्नाटक) येथील शाखेत संपर्क साधावा. विवाह नोंदणी अंतिम तारीख १०.०३.२०२३ या पत्रकार परिषदेस प्रतिष्ठान सदस्य अशोक येणगुरे, मल्लिकार्जुन मसुती, विलास कोरे, नितीन पाटील, विक्रम शिंदे, मल्लिनाथ मजगे, अंकुश चौगुले, मल्लिकार्जुन आळगी, शशिकांत लिंबितोटे, शरणु कापसे, गुरुपादप्पा आळगी, राजकुमार झिंगाडे, परमेश्वर यादवाड, राहुल काळे, सिध्दाराम टाके, चंद्रकांत दसले, प्रकाश पाटील, कुमार पतंगे व पतसंस्था व मल्टीस्टेट कर्मचारी उपस्थित होते.

# महात्मा बसवेश्वर महाविद्यालयात समाजकार्य विद्यार्थ्यांच्या कॅम्पस मुलाखती संपन्न



**लातुर/प्रतिनिधी**

श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था लातूर द्वारा संचलित महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभाग आणि युवा परिवर्तन उपजीविका प्रशिक्षण केंद्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमानाने डेप्युटी एरिया मॅनेजर व फिल्ड कोऑर्डिनेटर या पदाकरिता दिनांक १४/०१/२३ रोजी १०:३० वाजता समाजकार्य विभागात कॅम्पस मुलाखत घेण्यात आली. समाजकार्याच्या विद्यार्थ्यांना शिक्षणा बरोबर विद्यार्थ्यांना चांगल्या क्षेत्रात नौकरी उपलब्ध करून देण्याची भुमिका संस्था महाविद्यालय व प्राचार्य याच्या भूमिकेतून आयोजित करण्यात आली. सदर मुलाखत ही महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मौने यांच्या मार्गदर्शनाखाली व उप प्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे यांच्या मार्गदर्शनात संपन्न झाली. मुलाखत घेण्यासाठी समाजकार्य विभागातील प्रा. काशिनाथ पवार व युवा परिवर्तन संस्थेच्या सीनियर एरिया मॅनेजर ,श्रीमती मधुमती कनशेट्टी, डेप्युटी मॅनेजर श्रीमती सुमन पवार ,एरिया मॅनेजर श्री दीपक जीवलगे व डेप्युटी मॅनेजर नेहा कनशेट्टी यांनी पुढाकार घेतला. समाजकार्य विभागात आयोजित करण्यात आलेल्या या कॅम्पस मुलाखतीसाठी महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील समाजकार्य विभागातील माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. व यात काही विद्यार्थ्यांची निवड ही करण्यात आली आहे. या कॅम्पस मुलाखतीच्या यशस्वीतेसाठी समाजकार्य विभागातील प्रा. के यु पवार, प्रा. आशिष स्वामी, प्रा.नागेश जाधव, बालाजी डावखरे, संतोष येचेंवाड, होनराव, कोळी यांनी परिश्रम घेतले.

# तलवारबाजी स्पर्धेत यशवंत विद्यालयाला सुवर्णपदक

**अहमदपूर/फिरोज शेख**

महाराष्ट्र शासन आणि महाराष्ट्र ऑलिंपिक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने औरंगाबादच्या विभागीय क्रीडा संकुल येथे ५ ते ८ जानेवारीच्या दरम्यान महाराष्ट्र राज्य ऑलिंपिक स्पर्धेत तलवारबाजी खेळात यशवंत विद्यालयाची वर्ग नववीत शिक्षण घेणारी कुमारी दिव्यांका संतोष कदम हिला इप्पी प्रकारात सुवर्ण पदक मिळविल्याने तिचे सर्वच क्षेत्रातून अभिनंदन आणि कौतुक करण्यात येत आहे.

आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक स्पर्धेत भारतातील गुणवंत खेळाडू शोधण्यासाठी केंद्र व राज्य सरकारच्या ही महत्वकांक्षी स्पर्धा असून त्यात विशेष म्हणजे ग्रामीण भागातून साधन सुविधेचा अभाव असताना अहमदपूरच्या मातीतील या खेळाडूने मोठे यश संपादन केले आहे. या पूर्वी दिव्यांका कदमने दोन राष्ट्रीय पदके, दहा राज्यस्तरीय



पदके हस्तगत केली आहेत. या क्रीडापटूंना शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते प्रा. दत्ता गलाले, संतोष कदम मोहसीन शेख, आकाश बनसोडे, वजरोद्दीन काजी, रोहित गलाले, दीपक हिंगणे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले होते. क्रीडा क्षेत्रातील नेत्रदिपक यशा बद्दल टागोर शिक्षण समितीचे अध्यक्ष डॉ. अशोकराव सांगवीकर, सचिव शिक्षणमहर्षी डि.बी. लोहारे गुरुजी प्राचार्य व्ही.व्ही.गंपले, उपमुख्याध्यापक रमाकांत कोंडलवाडे, पर्यवेक्षक उमाकांत नरडेले, दिलीप गुळवे, राम तत्तापुरे, प्रा.अनिल चवळे यांच्यासह शिक्षक शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# वाडा शहर शाखेच्या वतीने राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती संपन्न!



**वाडा/प्रतिनिधी**

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) वाडा शहर शाखेच्या वतीने गुरुवारी (दि.१२ जानेवारी) राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांची जयंती राष्ट्रीय युवक दिवस म्हणून उत्साहत साजरी करण्यात आली. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंतीचे औचित्य साधून शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) वाडा शहर शाखेच्या वतीने वाडा ग्रामीण रूग्णालयातील रुग्णांना फळे व बिस्कीट वाटप करण्यात आले. याप्रसंगी शिवसेना सहसंपर्कप्रमुख निलेश गंधे, तालुका समन्वयक प्रकाश केणे, उपतालुकाप्रमुख तुषार यादव, तालुका सचिव निलेश पाटील, शहरप्रमुख प्रमोद घोलप, शहरसंघटक चंद्रकात मलबारी, विलास गायकवाड, जेष्ठ शिवसैनिक रोहीदास पाटील, उपशहरप्रमुख कुंदन डेंगाणे, कृणाल पाटील, संतोष भोईर, भाऊ भानुशाली, शहर सहसचिव संदीप रोडगे, प्रभागप्रमुख तेजस गंधे, रविंद्र भोईर, युवा सेना शहर अधिकारी प्रसाद गंधे, युवा सेना उपतालुकाधिकारी पुष्कर पाटील, युवा सेना कार्यकर्ते प्रथमेश ठाकरे, माजी शहर सचिव अमोल सोपारकर, सामाजिक कार्यकर्ते रमेश थोरात आदि उपस्थित होते.

# प्रधानमंत्री ग्रामसडक योजना ३ अंतर्गत औसा व निलंगा तालुक्यासाठी १२ कोटी मंजूर - खासदार निंबाळकर

**औसा/शिवाजी मोरे**

लोकसभेच्या १० व्या सत्राच्या हिवाळी अधिवेशन दरम्यान शून्य प्रहरच्या माध्यमातून बोलताना धाराशिव लोकसभा मतदारसंघातील औसा व निलंगा तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजना - ३ या संदर्भामध्ये मतदार संघातील एकुण मंजूर असणाऱ्या रस्त्यांची लांबी व प्रत्यक्षात झालेली कामे यांची सरासरी टक्केवारी २.५४ इतकी नगन्य असल्याचे तसेच दि. २१/१२/२०२२ रोजी मा. श्रीमती साध्वी निरंजन ज्योतीजी, ग्रामविकास राज्यमंत्री भारत सरकार यांच्यासोबत झालेल्या बैठकीमध्ये औसा व निलंगा तालुक्यातील प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतील रस्त्यांची वास्तव परिस्थिती खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी निदर्शनास आणुन दिली तसेच सदर रस्ते हे जड वाहतुकीमुळे लवकर खराब होत असून या योजनेंतर्गत होणाऱ्या रस्त्यांचा डीपीआर (अंदाजपत्रक) बनवत असताना जड वाहणांची वाहतुक ग्राह्य धरुन डीपीआर (अंदाजपत्रक) बनविण्याबाबत विनंती केली होती तसेच जिल्ह्यातील रस्त्यांची कामे लवकरात लवकर मार्गी लावण्याकरीता प्रयत्न केले होते. या प्रयत्नांना यश येवून औसा तालुक्यातील रामा २४२ ते आलमला उंबडगा ते रा म मा ३६१ लांबी - ५.५० किमी किंमत - ४१०.०९ लक्ष तसेच निलंगा तालुक्यातील रामा २४० कासार शिरशी कोराळी वाडी कोराळी ते राज्य सरहद्द (घोटाळा) लांबी ७.०० किमी किंमत ८७९.९५ लक्ष इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

## वसई विरार शहर महानगरपालिका

**प्रभाग समिती 'जी' वालीव**

**वालीव नाका, वसई (पुर्व) दुरध्वनी क्र.: ९६६५००३८८७**

**जाहिर नोटीस**

वसई-विरार शहर महानगरपालिका सर्व नागरिकांना सुचित करण्यात येते की, खालील नमूद मिळकत धारकांनी मामलत्ता हस्तांतरण करणेकामी लेखी अर्ज तसेच कागदपत्रे सादर केली आहेत. फेरफार प्रकरणी कोणतीही हरकत/ तक्रार असल्यास त्यांनी कार्यालयात जाहीर नोटीस प्रसिध्द झालेल्या तारखेपासून ७ (सात) दिवसाच्या आत लेखी स्वरुपात हरकत/तक्रार कागदपत्रासह नोंदवावी. सदर बाबतीत कोणतीही हरकत/तक्रार न आल्यास कार्यालयामार्फत पुढील मालमत्ता हस्तांतरणाची कार्यवाही करण्यात येईल.

| अ. क्र. | विभाग | मालमत्ता क्र. | ज्याच्या नावे मालमत्ता आहे त्याचे म्हणजे मालमत्ता विकणाऱ्या किंवा करदात्याचे नाव | खरीददाराचे किंवा अभिहस्तांकन करदात्याचे नाव |
|---|---|---|---|---|
| १. | वालीव | व्ही.एल.०९/३२९८/१६ | शांताराम रामचंद्र लोटेकर | अशोक केशप्पा सुवर्णा |
| २. | वालीव | व्ही.एल.०६/३७०७/८ | कुंदन स्टॉप कंपनी डाय निखील कारखानिस | सिल्वेस्टर डॉमणिक नुसीस |
| ३. | वालीव | व्ही.एल.०५/६७०९/३४ | हुकुमसिंग लुधानी | मे.एलईडी स्टोर तर्फे प्रो.प्रा.शैलेन्द्र सिंह भुपेंद्र सिंह छाबडा |
| ४. | वालीव | व्ही.एल. ०३/१६१६ | सुरेश कुमार गोपालदास धिमान | नुरजहाँ इस्माईल सय्यद |
| ५. | वालीव | व्ही.एल.०४/३३१८/६४ | संगीता अनिल पदे व १ | सुर्यमौली लालजी चौबे |
| ६. | वालीव | व्ही.एल.०३/५८३२/१९३ | सेहरुनिसा अब्दुल हमीद शेख | इरशाद अहमद अब्दुल हई |
| ७. | वालीव | व्ही.एल.०४/७१२१/२५ | एम.एम. इंटरप्रायजेस | अनिता मारुती ढाळे |
| ८. | वालीव | व्ही.एल.०५/३०५५ | शिवकुमार हृदय नारायण सिंह | शारदा महेंद्र प्रजापती |
| ९. | वालीव | व्ही.एल.०४/६२५०/१८ | दिपक के. मोटवानी | शकीरा शाहीद लोरीया |
| १०. | वालीव | व्ही.एल.०४/५१५०/४४ | सुनिल सुरेश जाधव व १ | किशोर चंद्र सेना |
| ११. | वालीव | व्ही.एल.०१/५८८१/४६ | एस.पी. बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स | मुन्ना शंकर चौहान व १ |
| १२. | वालीव | व्ही.एल.०१/५८८१/८६ | राजेश विश्वनाथ कांबळे | इंद्रमणी ब्रिजभुषण तिवारी व सुनिता इंद्रमणी तिवारी |
| १३. | वालीव | व्ही.एल.०४/३२८०/३१ | केनेय सी. टाचलोर | आमीर रौफ अहमद खान |
| १४. | वालीव | व्ही.एल.०६/६३०९ | कमलेश जयंतीलाल दोषी | किरण जे. दोशी |
| १५. | वालीव | व्ही.एल.०३/८९९ | तुळशीराम चोखोबा मुंढे | पंचशीला तुळशीराम मुंडे |
| १६. | वालीव | व्ही.एल.०४/७१४६/४२ | युनिवर्स इंन्टरप्राईजेस | गुलाम अली खान |
| १७. | वालीव | व्ही.एल.०३/५८२७/१६ | सतीश विरचंद शहा | कमलेश श्रीराम सिंग |
| १८. | वालीव | व्ही.एल.१०/२२१४ | रामप्रवेश रामसुमझ शर्मा व इतर २ | रामप्रवेश रामसुमझ शर्मा व अशोक रामप्रवेश शर्मा व पवन रामप्रवेश शर्मा (विभक्त) |
| १९. | वालीव | व्ही.एल.०९/७१४१/२७ | स्काय हाईट्स होम्स | सुतोष तुकाराम उतेकर व सुप्रीया संतोष उतेकर |
| २०. | वालीव | व्ही.एल.०१/६८२४/२८ | मे.आर.जे.पी. डेव्हलपर्स | श्रवण कुमार सिंह |

जावक क्र. वविशम/२३२२/२०२२-२३
दिनांक : ०६/०१/२०२३

**सही/-**
**प्र. सहा.आयुक्त**
**प्रभाग समिती 'जी' वालीव**
**वसई-विरार शहर महानगरपालिका**

# सत्ताधाऱ्यांची सोयीची नैतिकता!

तसे पाहता सध्याच्या विज्ञान युगातील माणूस हा चंगळवादी असल्याने तो फारशी नैतिक अनैतिकता मानत नाही. त्याचा पुनर्जन्म या कल्पनेवर विश्वास नसल्याने जे काही करायचे आहे ते याच जन्मात करून घ्यायचे अशी त्याची धारणा आहे. आणि म्हणूनच समाजात मोठ्या प्रमाणावर अनैतिक गोष्टी घडतात आणि यापुढेही घडत राहतील. कारण आजकाल लोकांना प्रत्येक भौतिक सुखाचा आनंद घ्यायचा आहे. त्यामुळे लोक पाप-पुण्याचा विचारच करायला तयार नाहीत. समाजाचे पूर्णपणे अंधपतन झालेले आहे. अशावेळी काय नैतिक आणि अनैतिक याची राजकारण्यांनी चर्चा कारणे हा एक मोठा विनोदच म्हणावा लागेल. कारण सर्वात जास्त अनैतिकता राजकारणात आहे. आज कुठला राजकीय पुढारी नैतिकता जपतोय हे नैतिकतेच्या गप्पा मारणारे छातीठोकपणे सांगू शकतील का? आणि हे सर्व येवढ्यासाठी सांगायचे आहे की सध्या चित्रा वाघ आणि उर्फी जावेद यांच्या वादात नैतिकतेच्या गप्पा मारल्या जात आहेत. उर्फी जावेद हिने कमी कपडे घालून अंग प्रदर्शन केले म्हणून चित्रा वाघ तिच्यावर टीका करीत आहेत. ती मिळेल तिथे तिचे थोबाड फोडीन अशी भाषा करीत आहेत. चित्रा वाघ या सत्ताधारी पक्षाच्या नेत्या आहेत. त्यामुळे त्यांचे सरकार लोकशाही आणि संविधानावर चालते. लोकशाहीत कोणी काय घालायचे खाय खायचे? कसले उद्योग करायचे? हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. त्यामुळे उर्फिने तोकडे कपडे घातले काय किंवा नग्न राहिली काय तो तिचा प्रश्न आहे आणि तिने जर काय चुकीचे केले असेल तर पोलिस यंत्रणा आहे तिच्यावर कारवाई करायला. चित्रा वाघ उर्फीचे थोबाड फोडण्याची भाषा करणाऱ्या कोण? उर्फीच्या वागण्याबद्दल त्यांच्याच पक्षातील सर्वोच्च नेत्याच्या पत्नीने काय विधान केले आहे ते एकदा चित्रा वाघ यांनी तपासून बघावे आणि मग उर्फिबद्दल बोलावे. मुंबई सारख्या शहरात महिलांचे अंगप्रदर्शन हे काही नवीन नाही. आज हाय सोसायटी मधल्या मुली शॉर्ट स्कर्ट किंवा पँट आणि तसाच टी शर्ट घालून कुठेही फिरतात, पार्ट्यांना जातात, पुरुषांच्या सोबत पार्ट्यामध्ये वावरतात. ते चालते ५०व्या वर्षी मलायिका अरोरा बिकनी घालून फिरते ते चालते. मग उर्फिचे अंग प्रदर्शन का चालत नाही. आजही राजकारणातल्या अनेक साठी ओलांडलेल्या पुढाऱ्यांचे त्यांच्या मुलीच्या वयाच्या तरुणीच्या सोबत अनैतिक संबंध आहेत, त्यांच्या विरुद्ध का नाही आवाज उठवत? ऊर्फी अभिनेत्री आहे आणि अंगप्रदर्शन हा बॉलिवूडचा एक व्यावसायिक भाग आहे आणि या व्यवसायात येणाऱ्या प्रत्येक तरुणीला ही नग्नता मान्य आहे. सर्व काही त्या स्वखुशीने करायला तयार असतात आणि हे सर्व समाजाने स्वीकारलेले आहे मग इतरणा त्याबद्दल आक्षेप का? राहता राहिला सवाल हिंदू संस्कृती आणि परंपरांचा तर आज भारतीय जनमानसावर पाश्चात्य संस्कृतीचा पगडा आहे. त्यामुळे आजच्या पिढीने हे सगळ स्वखुशीने स्वीकारलेले आहे. व्यभिचार, नग्नता या सगळ्या गोष्टी चुकीच्या आहेत आणि आपल्या संस्कृतीत त्या बसत नाहीत. त्यामुळे अशा गोष्टींना विरोध व्हायला हवा हे खर असले तरी विरोध हा पक्षपाती नसावा. एकीकडे उर्फिच्या तोकड्या कपड्यांना विरोध करायचा आणि दुसरीकडे विवाहबाह्य संबंधांकडे दुर्लक्ष करायचे ही कसली नैतिकता. चित्रा वाघ सारख्या महिलांना सामाजिक स्वास्थ्याची किंवा संस्कृतीची जर एवढी काळजी असेल तर त्यांनी प्रथम लिव्ह इन रिलेशनशिप सारख्या अनैतिक प्रकरणाच्या विरोधात आवाज उठवावा. कारण लिव्ह इन मुळे कुणीही कुठल्याही तरुणीशी किंवा विवाहित महिलेशी सुद्धा अनैतिक संबंध ठेवू शकतो आणि काही दिवस मौजमजा करून त्याचे किंवा तिचे मन भरले की दोघेही वेगळे होऊन आपापल्या मार्गाने जातात. दुसऱ्या किंवा दुसरीच्या शोधात! हा व्यभिचार नाही का? ही अनैतिकता उर्फिला विरोध करणाऱ्यांना मान्य आहे का? आणि मान्य नसेल तर मग या अनैतिक प्रकरणाच्या विरोधात कधी आवाज उठवणार? सध्या सोशल मीडियावर सेक्सचा बाजार भरला आहे. फेसबुक, व्हॉट्सॲप, इंस्टाग्राम यावर अश्लीलतेचा नंगा नाच सुरू आहे. नैतिकतेच्या गप्पा मारणाऱ्या लोकांनी अगोदर तो थांबवावा. कारण या देशाचे उद्याचे भवितव्य असलेली शाळा-कॉलेजातील कोवळी मुले या अश्लीलतेचा चक्रव्यूहात अडकून आपले आयुष्य बरबाद करीत आहेत. केंद्रात, राज्यात तुमचे सरकार आहे का नाही हे प्रकार थांबवण्यासाठी कठोर कायदे करीत? उर्फीला विरोध करून समाजातील अश्लीलता थांबणार आहे का? याचे उत्तर अगोदर द्या आणि मगच ऊर्फिबद्दल बोला. आज समाज समूह ही एक मोठी नदी आहे आणि या नदीचे पाणी कधी नव्हे इतके गढूळ झाले आहे. अशावेळी माणसाला प्रवाहासोबत राहणे ही माणसाची मजबूरी बनलेली आहे, जो कुणी प्रव्हाच्या विरोधात पोहण्याचा प्रयत्न करतो त्याच्या नाकातोंडात पाणी जाऊन तो गुदमरून मरतो. पण याचा अर्थ असा नाही की कुणी प्रयत्नच करू नयेत. समाजाचे आरोग्य सुधारेल यासाठी सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत. पण त्यात पक्षपात नको. एकट्या ऊर्फिला दोष द्यायचा आणि बाकीच्या गोष्टींकडे दुर्लक्ष करायचा हे चुकीचे आहे आणि असे झाले तर लोक कुणावरही विश्वास ठेवणार नाहीत!



# बाल गुन्हेगारीची प्रकरणे का वाढताहेत?

दिशायन

मुलांच्या निरागसतेवर अनेक लेखकांनी अनेक गोष्टी लिहून ठेवल्या आहेत. सध्याच्या काळात मुलांचे बालपण कमी होत चालले आहे. मुलांमध्ये कधीही न पाहिलेले बदल, समंजसपणा दिसून येत आहे. आताच्या मुलांशी डील करण्यासाठी विविध मार्ग अवलंबावे लागतात. त्यातच एकीकडे बालके मोठमोठ्या गोष्टी कमी वयात मिळवत आहेत, नवे विक्रम रचत आहेत तर दुसरीकडे बातम्यांमध्ये बाल गुन्हेगारी वाढताना दिसत आहे. गुन्ह्यांमध्ये अल्पवयीन बालकांचा समावेश मोठ्या प्रमाणात होत आहे. यामागील वस्तुस्थिती या लेखातून जाणून घेऊयात.

संपूर्ण देशभरात अल्पवयीन मुलांचे गंभीर गुन्ह्यांमधील सहभाग वाढत आहे. दिल्ली निर्भया प्रकरणापासून ते नुकतेच मुंबईत झालेले बलात्कार आणि खुनाच्या गुन्ह्यांमध्ये बालकांचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे सातत्याने अल्पनवयीन वय कमी करण्यात यावे, मात्र अशा घटना समाजाला चिंतेत पाडणाऱ्या आहेत. समाजव्यवस्थेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्या आहेत.

**घातक मैत्रीचा ट्रेंड!**

नुकतेच, लोअर परळ येथील सन मिल गल्लीत एका १५ वर्षाच्या मैत्रिणीवर तिच्या मित्रांसह सहा जणांनी सामूहिक बलात्कार केला. यापैकी तीन मुले अल्पवयीन (बाल गुन्हेगार) होती. त्याआधी डिसेंबरच्या पहिल्या आठवड्यात माटुंगा येथील शाळेत १३ वर्षाच्या मुलीला तिच्याच वयाच्या दोन मुलांनी वर्गात कुणी नसताना दाराला कडी लावून बलात्कार केला. त्याआधी पालघर येथे अल्पवयीन मैत्रिणीला मोटरसायकलवरून फिरवणाऱ्या मुलाने समुद्रकिनारी नेऊन स्वत: बलात्कार केला तसेच तिला इतर सहा मित्रांच्या हवाली केले. अशा घटना अधूनमधून घडत असून विश्वासाने मैत्रिणीने मित्रासोबत यायचे आणि तिचा गैरफायदा आपल्या अन्य मित्रांना घ्यायला द्यायचा, अशा घातक मैत्रीचा ट्रेंड' होऊ घातला आहे. अर्थात त्यामुळे या सर्व अल्पवयीन मुलांना अल्पवयीन मुलांवरील लैंगिक अत्याचारांपासून बालकाचे संरक्षण कायद्यानुसार (पॉस्को) कारवाईला सामोरे जावे लागले आहे. त्यांची कारकीर्दच गुन्हेगारीच्या विळख्यात गुरफटली गेली आहे.

**अल्पवयीन म्हणजे कोण?**

भारतात १४ ते १७ वर्षे वयोगटातील मुलांना अल्पवयीन म्हटले जाते. बाल न्याय कायदा (सुरक्षा व संरक्षण) २०१५ मधील कलम २ (१३) नुसार, १८ वर्षे पूर्ण न केलेला अल्पवयीन मुलांना बाल गुन्हेगार मानले जाते. तुरुंगात न पाठवता त्यांची रवानगी सुधारगृहात केली जाते. त्यांच्यावर बाल न्याय मंडळात खटला चालतो. गुन्ह्याचे गांभीर्य पाहून शिक्षा ठोठावली जाते.

**कायदे आणि आकडेवारी**

राष्ट्रीय गुन्हे नोंद विभागाची २०२१ पर्यतची आकडेवारी उपलब्ध आहे. त्यानुसार २०२१ पर्यत अल्पवयीन मुलांवरील गुन्ह्यांची एक लाख ४९ हजार ४०४ प्रकरणे नोंदली गेली. हे प्रमाण २०२० पेक्षा १६ टक्क्यांनी अधिक आहे. यापैकी अल्पवयीन मुलांवर दाखल असलेल्या गुन्ह्यांची संख्या ३१ हजार १७० असून २०२० च्या तुलनेत त्यात ४.७ टक्के वाढ आहे. यामध्ये प्रामुख्याने १६ ते १८ वर्षे वयोगटातील गुन्हेगारांचा सहभाग ७६.२ टक्के आहे. ही आकडेवारी चिंता वाढविणारी आहे.

नवी दिल्ली येथे २०१२ साली निर्भया बलात्कार प्रकरणात अल्पवयीन मुलगा गुन्हेगार असल्याचे आढळल्यानंतर, बाल न्याय कायदा (सुरक्षा व संरक्षण) २००० मध्ये ७ मे २०१५ रोजी सुधारणा करण्यात आली. १८ वर्षे पूर्ण न झालेला याचा या कायद्यात अल्पवयीन किंवा बाल असा अंतर्भाव करण्यात आला. २०२१ मध्येही या कायद्यात २९ सुधारणा करण्यात आल्या. यामध्ये अल्पवयीन'ऐवजी बाल' असा कायद्यात नामबदल करण्यात आला. अनाथ, बहिष्कृत मुले तसेच बाल गुन्हेगारांनी केलेले किरकोळ, गंभीर आणि निर्घृण गुन्हे आदींची व्याख्या या कायद्यात देण्यात आली आहे.

**अल्पवयीन मुलांना होणारी शिक्षा**

एखाद्या गुन्ह्याप्रकरणी अल्पवयीन मुलाला पोलीस अधिकारी किंवा पोलिसांच्या अल्पवयीन मुलांबाबतच्या विशेष विभागाकडून (पूर्वीचे जापू) अटक झाली किंवा ताब्यात घेतले गेले, तर २४ तासांत बाल न्याय मंडळांपुढे सादर करणे बंधनकारक आहे. त्यानंतर संबंधित मुलाला जामिनावर सोडायचे किंवा त्याची सुधारगृहामध्ये रवानगी करायची याबाबतचे आदेश न्याय मंडळाकडून दिले जाते. संबंधित अल्पवयीन मुलाला त्याच्या गुन्हेगारी कारवायांसाठी दोषी धरले जाते. परंतु त्याला शिक्षा ठोठावली जात नाही, तर त्याला सुधारण्यासाठी संधी दिली जाते. एखाद्या गंभीर गुन्ह्यात जरी अल्पवयीन मुलाला अटक केली आणि त्याला शिक्षा ठोठावली तरी त्याला सुधारगृहात ठेवता येते. निर्भया प्रकरणातील अल्पवयीन मुलाला तीन वर्षे सुधारगृहात राहण्याची शिक्षा ठोठावण्यात आली होती.

**कारागृहे कमी पडण्याची भीती!**

माहिती महाजालात अश्लील ध्वनिचित्रफिती सहजगत्या उपलब्ध होत आहेत. अगदी शाळेतल्या मुलांकडेही मोबाईल आणि इंटरनेट जोडणी असल्यामुळे, मुले नेमके काय पाहतात यावर कोणाचेच नियंत्रण नसते. वेबसिरीज, युट्यूबवर खुलेआम अश्लीलतेचे प्रदर्शन आणि सहजगत्या उपलब्ध असणारे अमली पदार्थ यामुळे ही अल्पवयीन मुले आपल्याच मैत्रिणीवर बलात्कार करायलाही मागेपुढे पाहत नाहीत. मुक्त वातावरणात वाढलेल्या अल्पवयीन मुली विश्वास ठेवून मित्रांसोबत पार्टीसाठी जातात, परंतु त्यांना लैंगिक अत्याचाराला सामोरे जावे लागत आहे. काही घटना पुढे येतात, तर काही घटना समाजातील बदनामीपोटी दाबल्याही जातात. हे थांबायला हवे असे वाटत असेल शाळांशाळांतून समुपदेशनावर भर देण्याची गरज आहे. अन्यथा, भविष्यात बाल गुन्हेगारांसाठी सुधारगृहेही अपुरे पडतील, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

# मांजरा नदी अमृतवाहिनी बनविण्यासाठी शैक्षणिक संस्थांनी सक्रिय सहभागी व्हावे-जलपुरुष डॉ.राजेंद्र सिंग



**लातूर/प्रतिनिधी**

आज औद्योगीकरण, शहरीकरण, प्रदूषण आणि मानवी वर्तन आदि विविध कारणांमुळे नद्या आजारी पडत आहे. नदीचे आरोग्य धोक्यात आले आहे. पूर्वीची नैसर्गिक नदी आज आपणास दिसत नाही त्यामध्ये आपण सर्वांनी नदीला मोठ्या प्रमाणात दुःख पोहोचविले आहे. तेव्हा मांजरा नदीला अमृतवाहिनी बनविण्यासाठी शैक्षणिक संस्थेतील संस्था पदाधिकारी, प्राचार्य, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचा सक्रीय सहभाग अत्यंत महत्त्वाचा आहे. त्यामुळेच आपली मांजरा नदी आपल्याला स्वच्छ, सुंदर आणि निर्मळ बनविता येईल असे प्रतिपादन जलपुरुष तथा वैश्विक पुर आणि अवर्षण आयोगाचे अध्यक्ष डॉ.राजेंद्र सिंग यांनी बोलताना व्यक्त केले.

जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर, महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर, मानवलोक संस्था, अंबाजोगाई आणि मांजरा नदी जनसंवाद यात्रा समन्वय समिती, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सांस्कृतिक सभागृहामध्ये मांजरा नदी समाज प्रबोधनपर कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये ते प्रमुख अतिथी म्हणून बोलत होते यावेळी विचारमंचावर श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष शिवशंकरप्पा बिडवे, ज्येष्ठ संचालक ॲड.श्रीकांतप्पा उटगे, माजी प्राचार्य प्रा.गिरजाप्पा मुचाटे, प्राचार्य डॉ.दिनेश मौने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, उपप्राचार्य प्रा.संजय पवार, उपप्राचार्य प्रा.बालाजी जाधव, महाराष्ट्र राज्य समिती शासकीय सदस्य डॉ.सुमंत पांडे, रमाकांत कुलकर्णी, महाजन मनोज साठे, मांजरा नदी जलसंवाद यात्रेचे मराठवाडा संयोजक अनिकेत लोहिया, जिल्हा समन्वयक डॉ.संजय गवई, सहसमन्वयक कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले आणि जिल्हा माहिती अधिकारी युवराज पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी जगतज्योती महात्मा बसवेश्वर आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मान्यवरांनी विनम्र अभिवादन केले. त्यानंतर संगीत विभागातील प्रा.विजयकुमार धायगुडे, प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.गोविंद पवार आणि विद्यार्थ्यांनी स्वागत गीत सादर करून शाहीर देशमुख यांनीही नदी आणि जीवन यावर समाज प्रबोधन केले.

पुढे बोलताना डॉ.राजेंद्र सिंग म्हणाले की, सन २०१५-१६ साली मी जेव्हा लातूरमध्ये आलो होतो तेव्हा मांजरा नदी काही काळाने मृत्यू पावेल अशी भावना त्यावेळी माझी झाली होती. मात्र आज लातूरकरांच्या अथक परिश्रमातून मांजरा सह तेरणा, लेंडी, तावरजा या नद्यांमध्ये दुथडी पाणी बघून मला खूप अत्यानंद होत आहे. लातूरमध्ये अत्यंत दुर्दैवाची बाब म्हणजे आपण रेल्वेने पाणी आणले होते मात्र हा कलंक आपण पुसून काढला आहे. आज आपल्या सर्वांच्या सक्रिय सहभागामुळे लातूर जलयुक्त झाले आहे याचा मला मनस्वी आनंद आहे असेही ते म्हणाले. या कार्यक्रमात पद्मभूषण डॉ.अशोक कुकडे (काका) मार्गदर्शन करताना म्हणाले की, मांजरा नदी जनसंवाद यात्रा आपल्या लातूर जिल्ह्यामध्ये ०५ तालुक्यातील २६ गावांमध्ये जलजागरण करीत आहे याविषयी मी कृतज्ञ आहे. नदी सोबत सहानुभूतीपूर्वक संबंध प्रस्थापित करून तिला अमृतवाहिनी बनविण्यासाठी महाविद्यालयीन युवकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी झाले पाहिजे असे ते म्हणाले. अध्यक्षीय समारोप करताना शिवशंकरप्पा बिदावे म्हणाले की, श्री महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्था, लातूरद्वारे संस्थेच्या विविध शाळा आणि महाविद्यालयामार्फत समाजपयोगी सामाजिक उपक्रम राबविले जातात यामध्ये मांजरा नदी अमृत्वाहिनी बनविण्यासाठी आमची संस्था, आमचे सर्व युनिटमधील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांना सहभागी करून नदीचा एक नवा पॅटर्न निर्माण करण्यासाठी आपण सर्वांनी आपले योगदान देणे अत्यंत गरजेचे असल्याचे ते म्हणाले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे यांनी केले तर अनिकेत लोहिया यांनी मराठवाडा विभागातील मांजरा नदी जलसंवाद यात्रेची सविस्तर माहिति सर्वांना दिली. यावेळी जिल्हा समन्वयक डॉ.संजय गवई आणि डॉ.बाळासाहेब गोडबोले यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा समन्वय डॉ.संजय गवई यांनी केले तर आभार सहसमन्वयक कॅप्टन डॉ.बाळासाहेब गोडबोले यांनी मानले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.आनंद शेवाळे, डॉ.रत्नाकर बेडगे, डॉ.शिवप्रसाद डोंगरे, महाविद्यालयातील बैठक व्यवस्था समिती व स्टेज व डेकोरेशन समिती सदस्य डॉ.यशवंत वळवी, प्रा. माधव नायणे, प्रा.व्यंकट दुडिले, प्रा.देविदास वसावे, डॉ.अभयकुमार धारशीवे, डॉ.राहुल डोंबे, प्रा.आशीष स्वामी, प्रा.नागेश जाधव, दयानंद टेंकाळे, प्रा.एस.बी.माळी, प्रा.के.आर.बिरादार, एम.ए.वैरागकर, शिक्षकेतर कर्मचारी नामदेव बेंदरगे, एम.बी.निकुम्बे, बालाजी होणराव, बालाजी डावकरे, के.आर.कोळी, शुभम बिरादार, आनंद खोपे, शिवशंकर खुब्बा, भीमाशंकर सुगरे, वैभव दत्तानगिरे आणि खंडू देडे यांनी परिश्रम घेतले.

# विशेष गोवर रुबेला लसीकरण मोहिम

राज्यामध्येल मुंबई, ठाणे, वसई विरार या शहरामध्येम मोठ्याप्रमाणात गोवर उद्रेक झाल्याने शासनाच्या प्राप्त मार्गदर्शन सुचनानुसार गोवर उद्रेक टाळण्याच्या अनुषंगाने लातूर शहरामध्ये दि.१५ डिसेंबर २२ ते दि.२५ डिसेंबर २२ या कालावधीत पहिला टप्पा पुर्ण झाला असून त्यारमध्ये गोवर रुबेला पहिला डोसचे कामकाज ६८.४३ टक्के२ व गोवर रुबेला दुसऱ्या डोसचे कामकाज ५५.७० टक्केप झालेले आहे. 'तसेच दुसरा टप्पा दि.१५/जानेवारी २०२३ ते दि.२५ जानेवारी २०२३ विशेष गोवर रुबेला लसीकरण मोहिम आयोजीत करण्यात आली आहे'. या विशेष मोहिमेचा उद्देश गोवर रुबेला आजाराचे निर्मुलन करणे व बाल मृत्युल दर कमी करणे हा आहे, हे ध्येय ठेवून लातूर शहर महानगरपालिका आरोग्य विभागामार्फत या मोहिमेच्या कालावधीमध्ये पाहिला डोस न घेतलेले २३३ बालके व दुसरा डोस न घेतलेले ४४० तसेच तळीं-- जीवनसत्वध न घेतलेली ६७३ तळीं- जीवनसत्वे मात्रा, बालकांना नियमित लसीकरण सत्रामध्ये व तसेच विशेष लसीकरण सत्रामध्ये यांना लस देण्यात येणार आहे. हि मोहिम यशस्वीच करण्यासाठी मनपा हद्दीमध्ये एकुण ८ प्राथमिक नागरी आरोग्य केंद्र कार्यक्षेत्रामध्ये २२ लसीकरण केंद्र कार्यरत करण्यात आली आहेत.गोवर रुबेला सद्रुष लक्षणे असलेल्या संशयीत रुग्णाची एकुण ६२ रक्त नमुने मुंबई येथे पाठविण्यालत आले असून त्यांपैकी ५८ संशयीत रूग्णाचा अहवाल निगेटीव्ह आहे व ४ रुग्णाचा अहवाल पॉझिटीव्हु आहे.तरी वर्षभरामध्ये (९ महिने ते ५ वर्ष वयोगटातील) एकुण ८३२३ वार्षीक उद्दीष्टापैकी नोव्हेंबर अखेर पर्यंत ५८१२ लाभार्थी यांना गोवर रुबेला लस देण्यात आली आहे. या विशेष मोहिमे अंतर्गत शहरातील ९ महिने ते ५ वर्ष वयोगटातील बालकांचे प्राधान्याने लसीकरण करण्यात येणार आहे. लातूर शहर मनपा आरोग्य विभागाअंतर्गत आशा व आरोग्य कर्मचारी यांच्यानमार्फत गृहभेटी सर्व्हेक्षणाद्वारे ९ महिने ते ५ वर्ष वयोगटातील लसीकरणापासून वंचित लाभार्थी यांच्या याद्या तयार करण्यात आल्या आहेत. याबाबत सुक्ष्माकृती नियोजनाचा आराखडा तयार करण्यात आला आहे. कांही कुटूंब व्यवसायासाठी बाहेर गावी गेल्या असल्याकारणाने कांही बालकांचे व आजारी असल्याने लसीकरणापासून वंचित राहिलेले आहेत. बालकांचे या मोहिमेअंतर्गत लसीकरण पुर्ण करण्यात येवून १०० टक्के उद्दीष्ट पुर्ण करण्यात येणार आहे. व शहरातील स्वयंसेवी IMA, IPA, NIMA, रोटरी क्लूब यांचा सहभाग घेऊन जास्तीपत जास्ता लाभार्थी यांचे लसीकरण करून घेण्यात येणार आहे. याअंतर्गत २५ जानेवारी पर्यंत गोवर लसीकरण पुर्ण करण्याचे उद्दीष्ट आहे. शहरातील सर्व नागरीकांना त्यांच्या बालकांना गोवर रुबेला लस द्यावी कारण या आजाराची लस हाच चांगला उपाय आहे बालकांस ताप, सर्दी, खोकला, पुरळ येणे, डोळे लाल होणे हे लक्षणे आढळून आल्यास नजीकच्याल मनपा दवाखान्यामध्ये गोवर रुबेला लसीकरण करून घ्यावे, जेणेकरून लस न घेतल्यायमुळे होणारे दुष्परीनाम टाळता येतील. व गोवर रुबेला आजार होवू नये याकरीता लसीकरण हाच खरा उपाय असलेबाबत व त्यावसाठी लसीरकण करून घ्यावे व लसीकरणासाठी आपल्या भागातील आशा, ए.एन.एम यांच्याशी संर्पक साधावा असे आवाहन लातूर शहर महानगरपालिकेचे मा.आयुक्त बाबासाहेब मनोहरे, मा. उपायुक्त वीणा पवार, आरोग्य अधिकारी डॉ. प्रशांत माले, यांचेकडून करण्यात येत आहे.

हे साप्ताहिक वृत्तपत्र मालक, मुद्रक व संपादक **धनराज (लक्ष्मणराव) शंकरराव पाटोळे** यांनी एस.आर. पब्लिकेशन, मोहन अर्जुन कंम्पाऊंड, शॉप नंबर ८,९,१० घरटनपाडा, वैशालीनगर बस स्टॉप, दहिसर पुर्व, मुंबई-६८ महाराष्ट्र येथे छापून नव निशीगंधा अपार्टमेंट, मनवेलपाडा रोड, विरार (पूर्व), ता.वसई, जि.पालघर येथून प्रकाशित केले. आरएनआय नं. एमएएचएमएआर २०१२/४५५५२. न्यायकक्षा (वसई), वसई कार्यालय, साईद्वारा अपार्टमेंट, शॉप नं.४, विशालनगर, अंबाडी रोड, माणिकपूर पोलिस स्टेशन जवळ, ता.वसई (पश्चिम), जि. पालघर. फोन नंबर ०२५०-२३४५९५९, मोब.: ९८९०७१८८७३, **कार्यकारी संपादक : गणेश मार्तंड चव्हाण,** सहसंपादक (मराठवाडा): राम पाटोळे, कायदेशीर सल्लागार : ॲड.अनिल सांडभोर. न्यायकक्षा-वसई. E-mail : crimesandhyavasai@gmail.com, whatsapp No. 9890718873 Website: www.crimesandhya.com

# सोलापूरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांनाही झोप आवरेना? महसूलमंत्र्यांची भर सभेत डुलकी!

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**



महसूल मंत्री आणि सोलापूर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील सोलापूर दौऱ्यावर आले होते.सोलापूर अक्कलकोट मार्गावरील रे नगर हौसिंग सोसायटीच्या एका कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून त्यांची उपस्थित होती. रे नगर सोसायटीचे प्रमुख आणि माजी आमदार नरसय्या आडम यांचे भाषण सुरू असताना महसूल मंत्री राधाकृष्ण विखेपाटील यांना झोप आवरत नव्हती. दिवसभर जिल्हा नियोजन बैठकीत, लोकप्रतिनिधीना व अधिकाऱ्यांना मार्गदर्शन करून, विखे पाटील कुंभारी येथील रे नगर च्या कार्यक्रमाला उपस्थित राहिले होते. शुक्रवारी सायंकाळची वेळ होती, भाषण सुरू होते आणि भरसभेत, राधाकृष्ण विखे पाटील यांना झोप येत असल्याचं दिसून येत होतं. रे नगर मधील कार्यक्रम तब्बल एक तास उशिरा कुंभारी परिसरात साकारत असलेल्या रे नगर घरकुल येथे नरसय्या आडम यांनी उदघाटन कार्यक्रम ठेवले होते. या कार्यक्रमात महिला वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होते. सायंकाळी ४ वाजता हा कार्यक्रम सुरू होणार होता. मात्र तब्बल एक तास कार्यक्रम उशिरा सुरू झाला त्यामुळं उपस्थित असलेल्या महिला पार वैतागून गेल्या होत्या. शुक्रवारी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास महसूल मंत्री व सोलापूरचे पालकमंत्री विखे पाटील कार्यक्रमात आले. त्यांसोबत आमदार सुभाष देशमुख, आमदार राजेंद्र राऊत, आमदार सचिन कल्याणशेट्टी, भाजपचे माजी जिल्हाध्यक्ष शहाजी पवार आदी उपस्थित होते. कार्यक्रमात व्यासपीठावर महसूलमंत्र्यांची डुलकी माजी आमदार नरसय्या आडम यांनी घाईगडबडीत आपले भाषण सुरू केले. आडम यांनी यावेळी काँग्रेसवर टीका करत,रे नगर घरकुल योजना यशस्वी करताना किती अडचणी आल्या याबाबत माहिती दिली. नरसय्या आडम यांचं भाषण सुरु असताना महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना झोप आवरत नसल्याचं दिसून आलं. चंद्रशेखर बावनकुळेंच्या सभेची चर्चा भारतीय जनता पक्षाकडून मराठवाडा शिक्षक मतदार संघाची उमेदवारी किरण पाटील यांना देण्यात आली आहे. गुरुवारी पाटील यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी औरंगाबादच्या पैठण गेट येथून भव्य अशी रॅली काढण्यात आली होती. उमेदवारी अर्ज भरण्यासाठी भाजपचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, केंद्रीय मंत्री रावसाहेब दानवे, केंद्रीय मंत्री भागवत भाषण, पालकमंत्री संदीपान भुमरे, मंत्री अतुल सावे सह पक्षातील प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती. रॅलीचे रूपांतर सभेत सर्व उपस्थित नेत्यांची भाषणे झाली, त्यानंतर प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांच्या अध्यक्षीय भाषणाची सुरुवात झाली. बावनकुळे भाषणात रामलेले असताना मात्र मंचावरील चित्र काही वेगळेच होते. मंचावरील अनेक नेते हे झोप घेत होते.यामुळे बावनकुळे यांच्या सभेची जोरदार चर्चा सुरु होती. राष्ट्रवादीचे आमदार अमोल मिटकरी यांनी बावनकुळे यांच्या सभेचा व्हिडिओ ट्विट केला आहे.

## १९ जानेवारीपर्यंत ग्रामपंचायत निवडणूक लढविलेल्या उमेदवारांनी निवडणूक खर्च सादर करावा!

**लातूर/प्रतिनिधी**

राज्य निवडणूक आयोगाच्या आदेशानुसार जिल्ह्यातील ३५१ ग्रामपंच्यातींची सार्वत्रिक निवडणूक डिसेंबर २०२२ महिन्यात झाली. त्यानुसार १८ डिसेंबर २०२२ रोजी मतदान आणि २० डिसेंबर २०२२ रोजी मतमोजणी झाली. ही निवडणूक लढविलेले, तसेच बिनविरोध निवडणूक आलेल्या उमेदवारांनी निवडणुकीच्या संपूर्ण खर्चाचा हिशोब १९ जानेवारी २०२३ पर्यंत संबंधित तहसील कार्यालयातील खर्च पथक प्रमुखाकडे विहित रीतीने जमा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी पृथ्वीराज बी. पी. यांनी केले आहे. राज्य निवडणूक आयोगाने दिलेल्या निर्देशानुसार निवडणुकीचा निकाल लागल्यानंतर उमेदवाराने एकूण खर्चाचा तपशील ३० दिवसांत तालुकास्तरावरील संबंधित प्राधिकृत खर्च पथकास विहित रितीने सादर करणे आवश्यक आहे. राज्य निवडणूक आयोगाने विहित 'वेळ व रित' प्रमाणे खर्चाचा तपशील सादर न केल्यास किंवा उमेदवाराचा एकूण खर्च मर्यादेपेक्षा जास्त असेल किंवा 'वेळ व रित' यांचे पालन झाले नसेल, तर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियमाचे कलम १४ ब नुसार संबंधित उमेदवारास पाच वर्षांसाठी अनर्ह करण्याबाबतची तरतूद आहे. त्यामुळे डिसेंबर २०२२ मध्ये झालेल्या ग्रामपंचायत सार्वत्रिक निवडणूक लढविणारे, तसेच बिनविरोध निवडून आलेल्या उमेदवारांनी त्यांच्या निवडणुकीच्या एकूण खर्चाचा हिशेब संबंधित तालुक्यातील तहसिल कार्यालयाने प्राधिकृत केलेल्या खर्च पथकाकडे १९ जानेवारी २०२३ पर्यंत विहित रितीने सादर करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत करण्यात आले आहे.

## गांधी रिसर्च फाऊंडेशनची ग्राम संवाद सायकल यात्रा

**जळगाव/प्रतिनिधी**

गांधी रिसर्च फाऊंडेशनच्यावतीने महात्मा गांधी पुण्यतिथी अर्थात हुतात्मा दिनी (दि. ३० जानेवारी) भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्ताने गांधी विचार प्रचार-प्रसारासाठी भव्य अशा ग्राम संवाद सायकल यात्रेचे आयोजन करण्यात आले आहे. १३ दिवस चालणारी हि यात्रा जळगाव जिल्ह्याच्या दक्षिण-पश्चिम भागातील जळगाव, एरंडोल, पारोळा, भडगाव, चाळीसगाव, पाचोरा, जामनेर तालुक्यातून सुमारे ३५० किमीचा प्रवास करणार आहे. या यात्रेच्या माध्यमातून एक लाख विद्यार्थी व नागरिकांशी संवाद साधण्यात येणार आहे. समाजातील सहभागाने हि सायकल यात्रा यशस्वी करण्याचे नियोजन सुरु आहे. सायकल यात्रेत विविध राज्यातून येणारे व स्थानिक स्वयंसेवकांचा सहभाग असणार आहे. या सहभागी स्वयंसेवकांसाठी संबंधित कालावधीत वापरासाठी सायकलींची आवश्यकता आहे. आपणास विनंती आहे कि, आपल्याकडील चालू स्थितीतील व प्रवासासाठी योग्य सायकल उपलब्ध करून द्यावी. सायकल यात्रेनंतर आपणास आपली सायकल योग्य स्थितीत परत करण्यात येईल. सायकलसह यात्रेच्या मार्गावरील गावातील शाळा/महाविद्यालयात कार्यक्रम, स्थानिक पातळीवर रात्री गावकऱ्यांसाठी कार्यक्रमांचे आयोजन, सकाळी गावात प्रभात फेरीचे आयोजन आदी माध्यमातून स्थानिक नागरिक आपला सहभाग नोंदवू शकणार आहेत. तसेच सहभागी स्वयंसेवकांचा नाश्ता, दुपारचे व संध्याकाळचे जेवण आदी विषयातही आपला सहभाग नोंदवू शकणार आहे. अधिक माहितीसाठी सुधीर पाटील (९८२३३६२३३०) यांचेशी संपर्क साधावा.

# चित्रकार विजय जैन यांच्या प्लास्टिक प्रदूषण विषयावरील पोस्टरला राज्य शासनाचा पुरस्कार!

**मुंबई/प्रतिनिधी**



जैन इरिगेशनच्या कला विभागातील चित्रकार विजय जैन यांच्या प्लास्टिक प्रदूषण विषयाचे गांभीर्य अधोरेखित करत, घराबाहेर पडताना आपली कापडी पिशवी सोबत बाळगण्याची आठवण करून देणाऱ्या लक्षवेधी पोस्टर रचनेला महाराष्ट्र राज्य कला संचालनालयाच्या ६२व्या वार्षिक प्रदर्शनात ५० ००० (रुपये पन्नास हजार)चे पारितोषिक प्राप्त झाले आहे. प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, प्रा. प्रमोद रामटेके, अमूर्त चित्रकार, नागपूर, राजीव मिश्रा, कला संचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत जहांगीर आर्ट गॅलरी मुंबई येथे दि १० जानेवारी २०२३ रोजी सायं ५.३० वा. प्रसिध्द छायाचित्रकार पद्मश्री सुधारक ओलवे यांच्या हस्ते जैन यांना गौरविण्यात आले. उपयोजित कलेच्या सदर पोस्टरसह विजय जैन यांच्या रेखा व रंगकला विभागात रंगलीपी ही जलरंग चित्र मालिका देखील या वार्षिक कला प्रदर्शनाचा भाग आहे. सदर प्रदर्शन जहांगीर आर्ट गॅलरीत ११ ते १६ दरम्यान सर्वासाठी खुले असणार आहे. जैन इरिगेशनचे अध्यक्ष अशोक जैन यांनी प्लास्टिक कचऱ्यासारख्या ज्वलंत सामाजिक विषयाला साध्या सोप्या रुपात मांडल्याचे सांगत विजय जैन उपयोजित कलेबरोबर रेखा व रंगकलेमध्ये देखील आपले योगदान सातत्याने देत असल्याबद्दल यांचे कौतुक केले आहे. नुकताच पुरुषी अहंकार या विषयावरच्या त्यांच्या पोस्टरला मुंबईच्या डूडल सोशल ॲण्ड फेस्ट या राष्ट्रीय स्पर्धत नामांकन मिळाले आहे. सदर स्पर्धेचे ते २०१७ चे विजेते आहेत. विजय जैन यांच्या स्त्री शिक्षणाच्या पोस्टर ला उत्तर प्रदेश ललित कला अकादमी चा पुरस्कार मिळाला आहे. स्वच्छ भारत, प्रौढ शिक्षण, झाडं वाचवा, बाल कामगार, सकस आहार-विद्यार्थी, सोशल मीडिया वापर: एक जबाबदारी आणि कोरोना काळातील मास्क वापरासाठी उद्युक्त करणारी सोशल मीडिया मालिका अशा सामाजिक विषयाला धरून त्यांनी अतिशय कल्पक आणि प्रबोधनात्मक पोस्टर रचना साकारल्या आहेत. त्यांच्या या कामाचे राज्य व राष्ट्रीय स्तरावर सर्वत्र कौतुक होत आहे.

## भिवंडीतील शेलार ग्रामपंचायतीच्या हंडा मोर्चाला यश; पाणीपुरवठा सुरळीत व मुबलक करण्याचे स्टेमचे लेखी आश्वासन

**भिवंडी/अभिजित हिरे**



भिवंडी शहरालगत असलेल्या शेलार ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना स्ट्रेम वॉटर डिस्ट्रीब्यूटर कंपनीकडून होणारा पाणीपुरवठा कमी दाबाने व अत्यल्प होत असल्याने शेलार ग्रामपंचायतीवर पाणी संकट ओढवले आहे.याबाबत स्टेम प्राधिकरणाला शेलार ग्रामपंचायतच्या वतीने वारंवार लेखी निवेदने व तक्रारी अर्ज करूनही स्टेम प्राधिकरण शेलार ग्रामपंचायतच्या अपुऱ्या पाणीपुरवठ्याकडे सतत दुर्लक्ष करीत होते.स्टेमचमुके या दुर्लक्षित कारभारामुळे शेलार ग्रामपंचायत हद्दीत पिण्याच्या पाण्याची समस्या बिकट झाली आहे.स्टेम प्राधिकरणाच्या या नियोजनशून्य कारभाराविरोधात शेलार ग्रामपंचायतचे सरपंच एड. किरण चन्ने यांनी शेकडो ग्रामस्थांना सोबत घेऊन गुरुवारी भिवंडी पंचायत समिती कार्यालयावर हंडा मोर्चाचे आयोजन केले होते.शेलार ग्राम पंचायत कार्यालयापासून निघालेल्या या हंडा मोर्चात शेलार गावातील शेकडो नागरिक व महिला सहभागी झाल्या होत्या. या मोर्चा दरम्यान पंचायत समिती सभागृहात पंचायत समिती पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी व स्टेम प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी संयुक्तिकरित्या आंदोलकर्त्यांशी पाणी प्रश्नावर चर्चा केली.यावेळी आंदोलनकर्त्यांनी स्टेम प्राधिकरणाचे अभियंता प्रथमेश पाटील यांना धारेवर धरत नागरिकांच्या पाणी प्रश्नात स्टेमने राजकारण करू नये असा इशारा आंदोलनकर्ते सरपंच किरण चन्ने यांनी या बैठकीत उपस्थित करत जोपर्यंत स्टेम प्राधिकरण पाणी पुरवठा सुरळीत करण्याचे लेखी आश्वासन देत नाही तोपर्यंत आंदोलन सुरूच राहणार अशी भूमिका घेतली होती. अखेर आंदोलनकर्त्यांची मागणी मान्य करत स्टेमने शेलार ग्राम पंचतीचा पाणी पुरवठा गुरुवारपासून सुरळीत करण्यात येईल व येत्या पंधरा दिवसात शेलार ग्राम पंचयातीस अतिरिक्त पाणी पुरवठा करण्यात येईल असे लेखी आश्वासन स्टेम प्राधिकरणाच्या अभियंत्यांनी दिले.त्यांनतर आंदोलनकर्त्यांनी हे आंदोलन स्थगित केले. काटई व कांबा गावातील पाणी समस्या सोडविण्यासाठी मिल्लत नगर येथून नवी पाईपलाईन प्रकल्प प्रस्थापित होता मात्र स्टेम प्राधिकरणाने मिल्लत नगर येथून पाईपलाईन न टाकता मागील तीन पाहिन्यांपासून शेलरच्या पाईपलाईनवर काटई कांबा गावची पाईपलाईन जोडली होती त्यामुळे मागील तीन चार महिने शेलार गावाला अत्यल्प पाणीपुरवठा होत होता त्यामुळे गावावर पाणी संकट आले असून अधिकाऱ्यांनी पाणी पुरवठा सुरळीत करण्याबाबत लेखी आश्वासन दिले आहे त्यामुळे येत्या १५ दिवसांमध्ये ज्यादा व सुरळीत पाणीपुरवठा केला नाही तर स्टेम विरोधात शेलार ग्रामपंचायतीच्या वतीने आणखी तीव्र आंदोलन केले जाईल अशी प्रतिक्रिया सरपंच किरण चन्ने यांनी दिली आहे.

## एकाच रात्री विद्युत मोटारीचे व सोलारच्या वायरची चोरी

देवणी : दवणहिप्परगा व अचवला शिवारातील विहिरीवरील मोटारीच्या इलेक्ट्रिक वायरची व सोलार वायरची चोरी प्रकरणात देवणी पोलीस ठाण्यात अज्ञात आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशी माहिती मंगळवार रोजी देवणी पोलीसांच्या वतीने देण्यात आले. याबाबत देवणी पोलीसांच्या वतीने मिळालेली अधिक माहिती अशी की, दि.२९ डिसेंबर रोजी मध्यरात्री दवणहिप्परगा येथील जमीन सर्वे नंबर ३१ व ३१/१ या जमीनीवर विहिरीवर स्टार्टर बॉक्स पासून मोटारीचे १५ हजार रुपयांचे इलेक्ट्रिक वायरची चोरी केली आहे. तर त्याच मध्यरात्री दवणहिप्परगा शिवारातील गंगाप्रसाद संग्राम चिल्लरगे, सुर्यकांत शंकरअप्पा चिल्लर्गे, विश्वनाथ मारुती सुर्यवंशी, ज्ञानोबा व्यंकट संपत्ते, वैजिनाथ मारोती सुर्यवंशी, व अचवला शिवारातील विजयकुमार गोविंदराव चिल्लरगे यांच्या शेतातील मोटरीचे इलेक्ट्रीक वायर व सोलार वायर अज्ञात चोरट्यांनी पळविले आहे. या प्रकरणी माधव गुरुनाथ पाटील राहणार दवणहिप्परगा यांच्या फिर्यादीवरून देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर नंबर ९/२०२३ कलम ३७९ भादवी प्रमाणे अज्ञात आरोपी विरोधात गुन्हा नोंद करण्यात आला आहे. अधिक तपास पोलीस निरीक्षक गणेश सोंडारे हे करीत आहेत.

# राजमाता जिजाऊ ग्रुपच्या वतीने शैक्षणिक साहित्य वाटप

**वाडा/प्रतिनिधी**



वाडा तालुक्यातील आब्जे येथील प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांनी केंद्र कबड्डी क्रीडा स्पर्धेत उत्तम कामगीरी करत प्रथम क्रमांक मिळविल्या बद्दल संघातील सर्व खेळाडूंना प्रोत्साहन मिळावे या उद्देशाने राजमाता जिजाऊ ग्रुपतर्फे शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले. राजमाता जिजाऊ करणयातगरुपचे सदस्य राकेश हरल यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून या खेळाडूंचा गौरव करण्यात आला. मनोज गवाले विनोद मस्कर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते तर गणेश मोरे व रोहित म्हस्कर यांनी नियोजन करून कार्यक्रम यशस्वी केला. या कार्यक्रमात शाळेचे मुख्यध्यापक प्रमोद पाटील यांनी ग्रुप सदस्यांचे स्वागत केले. दशरथ डबके यांनी कार्यक्रम सूत्रसंचालन केले, प्रमिला थाळेकर व योगिनी मढवी या शिक्षकांनी शैक्षणिक साहित्य वाटपासाठी सहभाग घेतला तसेच विष्णु ठाकरे यांनी विद्यार्थ्यांना कबड्डी प्रशिक्षण देऊन प्रथम क्रमांक मिळविण्यासाठी मेहनत घेतली. कबड्डी पटूंनी जिद्दीने खेळी करून प्रथम क्रमांक मिळवून शाळेचे नाव व गावाचे नाव पटलावर झलकवले आहे.

# थोडक्यात वृत्तांत

## सीए परिक्षेत देशभरातून अनुभूती स्कूलची सौम्या जाजू २८व्या क्रमांकाने उत्तीर्ण!



जळगाव : दि इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाऊंटंट ऑफ इंडियाच्या वतीने नोव्हेंबर २०२२ मध्ये घेण्यात आलेल्या सीए परीक्षेचा अंतिम व इंटरमीडिएट परीक्षांचा निकाल जाहीर झाला. यामध्ये देशभरातून अनुभूती स्कूलची माजी विद्यार्थीनी सौम्या गिरिराज जाजू २८व्या रँकने उत्तीर्ण झाले. अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या या परीक्षेत जळगाव येथील अनुभूति स्कूलच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ठ कामगिरीची परंपरा कायम राखत नेत्रदीपक यश संपादन केले आहे. सीए अंतीम नवीन कोर्स दोन्ही ग्रुपमधून सौम्या जाजू ही जळगाव शहरातून प्रथम तर भारतात २८ व्या क्रमांकाने सौम्या जाजू उत्तीर्ण झाली आहे. तसेच फायनलमध्ये अंशुमा लुंकड, अनिकेत अग्रवाल, जय मारू हे विद्यार्थीही उत्तीर्ण झाले तर विनित ठोले, सुरज चौधरी यांनी इंटरमीडिएट परीक्षेत यश संपादन केले. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल अनुभूतीस्कूलचे चेअरमन अतुल जैन व संचालिका सौ. निशा जैन यांनी सर्व विद्यार्थ्यांचे आणि पालकांचे कौतूक करत पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

## सौरभ यालकर सीए परिक्षा उत्तीर्ण



जळगाव : जैन उद्योग समूहातील व्यवस्थापक पदावरील वरिष्ठ सहकारी राजेंद्र यालकर यांचा मुलगा चि. सौरभ राजेंद्र यालकर याने नोव्हेंबर-२०२२ मध्ये सि.ए.(उ) परिक्षा दिली होती. या परिक्षेचा अंतिम निकाल लागला. यात सौरभने चांगल्या गुणांसह सीए ची परिक्षा उत्तीर्ण केली आहे. सौरभच्या यशाबद्दल त्याचा परिवार, दिगंबर जैन समाजातील मान्यवर यांच्यासह सर्वस्तरातून त्याचे कौतूक होत आहे. तसेच जैन इरिगेशनच्या व्यवस्थापनाकडूनही त्याचे कौतूक झाले. त्याने यापूर्वी बी. कॉमला ७९ टक्के प्राप्त केले होते. दिगंबर जैन समाजातील साधारण कुटुंबात वाढलेला एक आदर्श विद्यार्थी सीए अंतिम परिक्षा उत्कृष्टरित्या उत्तीर्ण झाला याचा आनंद वडील राजेंद्र यालकर यांनी व्यक्त केला.

## निवडणूक निरीक्षक शेखर चन्ने यांची नियुक्ती

लातूर : भारत निवडणूक आयोगाच्या आदेशान्वये ०५-औरंगाबाद विभाग शिक्षक मतदारसंघ निवडणूक-२०२३ च्या अनुषंगाने निवडणूक निरीक्षक म्हणून शेखर चन्ने (भा.प्र.से.), महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांची नियुक्ती करण्यात आलेली आहे. निवडणूक निरीक्षक शेखर चन्ने यांचे निवास व संपर्क कार्यालय औरंगाबादच्या शासकीय सुभेदारी विश्रामगृहातील 'मांजरा' हे असणार आहे. त्यांचा भ्रमणध्वनी क्रमांक ८९५६७१०४९७ तर दूरध्वनी क्रमांक ०२४०-२९९८०१ असल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांनी कळविले आहे.

## दोन खेळाडू महाराष्ट्र ऑलिम्पिकसाठी रवाना

लातूर : महाराष्ट्र स्विमिंग असोसिएशनतर्फे घेण्यात आलेल्या टाइम ट्रायलमध्ये लातूर ऑफिसर्स क्लबचे खेळाडू अभय रवीकुमार देवकते आणि औदुंबर मेठाले हे पात्र ठरले आहेत. पुणे येथे होणाऱ्या महाराष्ट्र ऑलिम्पिक क्रीडा स्पर्धेसाठी त्याची निवड झाली आहे. या दोन्ही खेळाडूंना क्रीडा प्रशिक्षक डॉ. महेश जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. लातूर ऑफिसर्स क्लबचे संस्थापक अध्यक्ष जी. श्रीकांत, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष पृथ्वीराज बी.पी. उपजिल्हाधिकारी तथा सचिव जीवन देसाई, कोषाध्यक्ष डॉ. विश्र्वास कुलकर्णी, सहसचिव डॉ. अजय जाधव, क्रीडा समिती प्रमुख अजित भुतडा, सांस्कृतिक समिती प्रमुख अजय अग्रोया, ॲड. सुरज साळुंके, पालक रवीकुमार देवकते, ॲड. औदुंबर मंठाळे आदींनी या खेळाडूंचे अभिनंदन केले.

## वाले इंग्लिश स्कूल शिष्यवृत्तीधारकांचा सत्कार

लातूर : शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होऊन शिष्यवृत्तीधारक झालेल्या हिरण्मयी पोतदार या विद्यार्थिनीचा बसवन्नाप्पा वाले इंग्लिश स्कूलमध्ये सत्कार करण्यात आला. महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद, पुणेच्या वतीने घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत बसवण्णाप्पा वाले इंग्लिश स्कूलची विद्यार्थिनी हिरण्मयी पोतदार ही शिष्यवृत्तीधारक झाली. शाळेत आयोजित कार्यक्रमात शिक्षक आळंदकर यांच्या हस्ते पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन तिचा सत्कार करण्यात आला.या यशाबद्दल शाळेचे मुख्याध्यापक भोगडे, वर्गशिक्षिका सौ.जाधव तसेच शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी हिरण्मयी पोतदारचे अभिनंदन केले आहे.

## कोकण शिक्षक मतदारसंघ निवडणूकी संदर्भात तक्रारींसाठी तक्रार निवारण कक्षाची स्थापना!

नवी मुंबई : कोकण शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२२-२३ या निवडणुकीच्या कामासंदर्भात तक्रारींकरिता २४ तास चालू असणाऱ्या तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगामार्फत कोकण शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची घोषणा करण्यात आली असून, कोकण विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये तत्काळ प्रभावाने आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. आचारसंहिता काळात आचारसंहितेच्या नियमांचा भंग अशा इतर अनुषंगिक तक्रारींकरिता तक्रार निवारण कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. कोकण शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२२-२३ या निवडणुकीच्या कामांसंदर्भात तक्रारींकरिता ०२२-२७५७१५१६ या क्रमांकावर संपर्क साधावा. या तक्रार निवारण कक्षाची सेवा २४ तास चालू राहणार आहे. कोकण शिक्षक मतदार संघ निवडणूक २०२२-२३ या निवडणुकीच्या कामां संदर्भात जनतेच्या काही तक्रारी असल्यास त्यांनी वरील क्रमांकावर संपर्क साधून तक्रारी नोंदवाव्या, असे आवाहन सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी तथा कोकण विभागाचे उपायुक्त (सामान्य) मनोज रानडे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

साप्ताहिक क्राईम संध्या ऑनलाईनही वाचता येईल....
www.crimesandhya.com

16 To 22 JANUARY 2023 - Page 6 (CRIME SANDHYA):Layout 1  1/14/2023  8:36 PM  Page 1



पान १ वरून...

## रुबिनाच्या आत्महत्येने कुटुंब ...

लव्ह जिहाद म्हणतात.सध्या महाराष्टात याबाबत कायदा करण्याच्या हालचाली सुरू आहे. मुंबईच्या धारावीत अशाच प्रकारची घटना घडल्याची माहिती पुढे येत आहे. मध्यप्रदेशातील कटणी येथील एका गरीब हिंदू कुटुंबातील यशोधरा ही २४ वर्षाची तरुणी. ती आपल्या आई-वडील आणि भावंडा सह राहत होती. यशोधरा सरळ आणि साधी भोळी तरुणी. ती दिसायला सूंदर असल्याने गावातीलच रेहान खान या मुस्लिम तरुणाची तिच्यावर नजर पडली. काही दिवसात त्याने तिला आपल्या प्रेमाच्या जाळ्यात ओढून तिच्याशी जवळीक वाढवली. तीही त्याच्या प्रेमाच्या भूलथापांना बळी पडली. पुढे २०१९मध्ये रेहान खान हा तीला लग्नाचे आमिष दाखवून मुंबईत पळवून घेऊन आला. यशोधराच्या घरच्यांना या गोष्टीची काहीच खबर नव्हती. मुलगी अचानकपणे बेपत्ता झाल्याने कुटूंबियांनी स्थनिक पोलीस ठाण्यात मिसिंगची तक्रात दिली.परंतु बरेच दिवस झाले तरी मुलीचा शोध लागला नाही. यशोधरा हिचा शोध सुरू असताना, रेहान खान यशोधरा हिला मुंबईत घेऊन आला. तिच्यासोबत लग्न करून धारावीतील राजीव गांधी नगर मध्ये राहू लागला. रेहान याने यशोधरा हिचे नाव बदलून रुबीना असे ठेवले होते. याच दरम्यान रुबिनाला दोन मुले झाली . एक मुलगा अडीच तर दुसरा केवळ चार महिन्यांचा आहे. मध्यन तरी यशोघरा हिने घरच्यांना फोन केला आणि तिने सर्व हकीगत आई-वडिलांना सांगितली. आई-वडिलांनी मनावर दगड ठेवून तिच्या विवाहाला संमती दिली. यशोधरा उर्फ रुबीना आणि तिचा पती रेहान हे दोघे पतिपत्नी धारावीत राहून मोलमजुरी करू लागले. दिवसामागून दिवस जात होते. तोच अचानक ५ जानेवारी २०२३ रोजी रुबीना उर्फ यशोधरा हिचा मृतदेह घरातील छताला गळफास लावलेल्या अवस्थेत सापडला. घटनेची माहिती मिळताच धारावी पोलीस घटनास्थळी दाखल झाले. तेव्हा यशोधरा ही छताला गळफास लावलेल्या अवस्थेत पोलिसांना आढळली. पोलिसांनी अपमृत्यूची नोंद करून मृतदेह शवविच्छेदनासाठी सायन रुग्णालय येथे पाठला. पोलिसांनी रुबीना उर्फ यशोधरा हिच्या कुटुंबाचा शोध घेऊन या घटनेची माहिती दिली. मध्यप्रदेशातील कटनी येथे राहत असलेले यशोधरा हिचे वडील चंद्रभान खाटीक मुलीच्या मुत्युची खबर एकूण तातडीने कुटूंबासह मुंबईत पोहचले. चंद्रभान खाटीक यांनी धारावी पोलीस ठाणे गाठून आपल्या मुलीची आत्महत्या नसून तिचा पती रेहान खान याने  माझ्या मुलीला मारहाण करून तिला फासावर लटकावले. अशा प्रकारची तक्रार दिल्याने वडिलांच्या फिर्यादी वरून धारावी पोलीस ठाण्यात रेहान खान (वय २९) याच्या विरोधात हत्येचा गुन्हा नोंद करण्यात आला. धारावी पोलिसांनी ३०२ चा गुन्हा दाखल केल्यावर त्याच दिवशी रेहान खान याला अटक केली. रेहान खान याने यशोधरा हिला पळवून मुंबईत आणून तिच्यासोबत मुस्लिम धर्माप्रमाणे विवाह केला. त्यानंतर तो धारावीत राहत होता. लग्नानंतर रेहान याने यशोधराचे बळजबरीने धर्मांतर करून तिचे नाव बदलून रुबीना असे ठेवले होते, असा आरोप यशोधरा उर्फ रुबीना हिच्या माहेरच्या कुटुंबाने केला आहे. माझ्या मुलीची हत्या करून तिला फासावर लटकविण्यात आल्याचा आरोप पीडित विवाहितेच्या कुटुंबांने केला असून हा 'लव्ह जिहाद' चा प्रकार असल्याच्या आरोप तिच्या कुटुंबाने केला आहे. हिंदू असलेल्या  माझ्या मुलीचे धर्मांतर करून तिला बळजबरीने गोमांस खाण्यासाठी दिले जात होते. असा आरोप ही तिच्या कुटूंबानी केला आहे. धारावी पोलिसांनी पीडित विवाहितेच्या कुटूंबाच्या तक्रारीवरून तिच्या पतीविरुद्ध हत्येचा गुन्हा दाखल करून पतीला अटक केली आहे. पुढील तपास सुरू असल्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विजय कांदळगावकर यांनी सांगितले.

## अनैतिक संबंधात त्याचा अडथळा ...

रखवालदारीच्या उत्पन्नातून एकुण सहा जणांचा चरितार्थ चालत होता. बंडू डाखोरे आणि गजानन बामने हे दोघे मित्र होते. बाबुळगाव येथील रहिवासी असलेला गजानन बामणे हा अवघा विस वर्षाचा तरुण होता. गजानन याचे लग्न झाले असले तरी त्याची पत्नी त्याला सोडून माहेरी निघून गेली होती. गेल्या पाच वर्षापासून बंडू आणि गजानन या दोघांची मैत्री जमली होती. त्यामुळे गजानन बामने याचे बंडूच्या घरी नेहमी येणे जाणे होते. बंडूच्या गैर हजेरीत देखील गजाननचे त्याच्या घरी येणे जाणे सुरु होते. त्यामुळे साहजीकच गजानन आणि बंडूची पत्नी मीरा यांच्यात नजरानजर होत असे. दोघांच्या नजरेचा खेळ प्रेमात परिवर्तीत होण्यास वेळ लागला नाही. अवघा विस वर्षाचा गजानन विवाहीत असून देखील एकटाच होता. गजाननचा मित्र असलेल्या बंडूची पत्नी मिरा हिने वयाची पस्तीशी पार केली होती. विस वर्षाचा गजानन याच्या तुलनेत बंडूची पत्नी त्याच्यापेक्षा वयाने दुप्पट होती. शिवाय ती चार मुलांची आई देखील होती. तरी देखील गजानन तिला बघून आपले भान  विसरुन जात असे. गजानन याच्या नजरेचा खेळ बंडूची पत्नी मीराच्या लक्षात आला होता. तिच्या पारखी नजरेने गजाननच्या मनातील विचार ओळखला होता. घरात पती आणी चार मुले असतांना देखील बंडूची पत्नी मीरा हिने गजाननला प्रतिसाद देण्यास सुरुवात केली. बंडूच्या गैरहजेरीत गजानन आणि मिरा यांचे प्रेम बहरत होते. चार मुलांची आई असलेल्या मीराला पती बंडूपेक्षा त्याचा मित्र गजानन जवळचा वाटत होता. दोघांच्या प्रेमसंबंधाला बहार आला होता. गजानन आणि मीरा यांच्यातील प्रेमसंबंधाची कुणकुण बंडूला समजली. आपल्या पत्नीचे आपल्याच मित्रासोबत विवाहबाह्य संबंध असल्याचे लक्षात आल्यानंतर बंडू हैरान झाला. तरीदेखील आपल्या परिवाराचे हित लक्षात घेत बंडूने पत्नी मीराला समजावले. आमच्यात तसे काही नाही अशी सारवासारव करत तिने वेळ मारुन नेली. मात्र पत्नी मीरा आणि मित्र गजानन यांच्यातील सशयास्पद हालचाली त्याच्या लक्षात आल्या होत्या. त्यामुळे बंडू आणि मीरा या  पती पत्नीत मतभेद सुरु झाले. दोघातील धुमसत जाणारा वाद कधीकधी मोठ्या प्रमाणात वाढत होता. त्यामुळे मीरा आणि गजानन यांच्या भेटीवर आता  निर्बंध आले होते. आपले प्रेमसंबंध पुर्ववत सुरु राहण्यासाठी आपल्या वाटेतून बंडूला कायमचे दूर सारण्याचा विचार मीरा आणि गजानन या दोघांनी केला. गजानन बामणे व मीरा डाखोरे या दोघांनी बंडूच्या हत्येचा कट आखला. गजानन याने मीराच्या मदतीने बंडूला संपवण्याची तयारी सुरु केली. दि. ६ डिसेंबर २०२२ हा बंडूच्या जीवनातील अखेरचा दिवस उजाडला. या दिवशी गोड बोलून गजानन याने शेतात मद्य पार्टीचे नियोजन केले. दोघांनी मिळून सोबत मद्यप्राशन केले. दारुचा अंमल सुरु झाल्यानंतर बंडूने त्याची पत्नी मीरासोबत वाद घालण्यास सुरुवात केली. दारुच्या नशेत भान हरपलेला बेसावध बंडू पत्नी मीराला शिवीगाळ करु लागला. नेमकी हिच संधी साधून मीरा आणि गजानन या दोघांनी बंडूला ठार करण्याचा कट अमलात आणला. गजानन याने मीराच्या मदतीने बंडूचा दुपट्ट्याने गळा आवळण्यास सुरुवात केली. दुपट्ट्याचा फास आवळला गेल्यामुळे बंडू जीवानिशी ठार झाला. बंडू ठार झाल्याची खात्री पटल्यानंतर दोघे भानावर आले. बंडूच्या मृतदेहाची विल्हेवाट लावण्यासाठी दोघे सरसावले. जवळच असलेल्या एका विहीरीत बंडूचा मृतदेह फेकून देण्यात आला. दिला. त्यानंतर जणू काही झालेच नाही अशा पद्धतीने दोघेही पुढील कामाला लागले. दुसऱ्या दिवशी ७ डिसेंबर रोजी बंडूची पत्नी मीरा हिने पातुर पोलीस स्टेशनला जाऊन आपला पती बंडू डाखोरे हा आदल्या दिवसापासून बेपत्ता असल्याची तक्रार दिली. तिने दिलेल्या तक्रारीनुसार पातूर पोलिस स्टेशनला मिसींग दाखल करण्यात आली. त्यानंतर तिन दिवसांनी ९ डिसेंबर रोजी परिसरातील एका विहीरीत एका अनोळखी इसमाचा मृतदेह असल्याची माहिती पोलिसांना समजली. माहिती मिळताच पातूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक हरिष गवळी यांनी आपल्या पथकासह घटनास्थळी धाव घेतली. गेल्या तिन दिवसांपासून विहीरीत पडलेला मृतदेह कुजण्यास आणि फुगण्यास सुरुवात झाली होती. मृतदेहाची ओळख पटण्यास वेळ लागला नाही. हा मृतदेह बेपत्ता बंडू डाखोरे याचा असल्याचे निष्पन्न झाले. हा घातपाताचा प्रकार असल्याची चर्चा या निमीत्ताने परिसरात सुरु झाली होती. दरम्यान घटनास्थळ आणि मृतदेहाचा पंचनामा केल्यानंतर मृतदेह उत्तरीय तपासणीकामी रवाना करण्यात आला. बंडूची हत्या झाल्याचा प्रकार उत्तरीय तपासणीत उघड झाला. त्यामुळे या घटनेप्रकरणी खूनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आणि पुढील तपासाला सुरुवात करण्यात आली. बंडूची पत्नी मीराचे गजानन बामणे नावाच्या तरुणासोबत प्रेमप्रकरण सुरु असल्याची माहिती पोलिसांना समजली होती. या प्रेमप्रकरणामुळे मयत बंडू डाखोरे आणि त्याची पत्नी मीरा डाखोरे यांच्यात वाद सुरु होते अशी देखील माहिती पोलिस पथकाला समजली. त्या माहितीच्या आधारे मीरा आणि गजानन या दोघांना सुरुवातीला चौकशीकामी ताब्यात घेण्यात आले. पातूर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक हरिष गवळी यांनी दोघांची आपल्या खास पद्धतीने चौकशी केली. मयत बंडूने आत्महत्या केली असावी नाहीतर तो दारुच्या नशेत विहीरीत पडला असावा अशी बतावणी दोघांनी सुरु केली. मात्र पोलिस निरीक्षक हरिष गवळी यांच्यापुढे दोघांनी सर्व घटनाक्रम लवकरच उघड केला. दोघांविरुद्ध खूनाचा गुन्हा दाखल करुन त्यांना अटक करण्यात आली. अनैतीक संबंधाचा शेवट हा वाईट असतो हे अनेक घटनांमधून उघडकीस आले आहे. या घटनेत देखील अनैतिक संबंधाचा शेवट वाईट असल्याचे दिसून आले. पोलिसांच्या अटकेतील मीरा डाखोरे न्यायालयीन कोठडीत गेल्यामुळे तिची चारही मुले बापाच्या आणि आईच्या कृपाछत्राला पारखी झाली. आपला संसार भला हा विचार वयाची पस्तीशी उलटलेल्या आणि चार मुलांची आई असलेल्या मीरा डाखोरे या महिलेने करणे आवश्यक होते. मात्र अनैतिक संबंधातून पतीच्या हत्येचा कुविचार तिच्यासह तिचा विस वर्षाचा प्रियकर गजानन या दोघांच्या मनात आला आणि त्यातून अनर्थ घडला.

## दारुड्या मजुरांनी प्राणघातक हल्ला...

असल्याने त्याचे एसीचे काम कमीत कमी चार पाच महिने तरी चालणार होते. त्या दोघांना ही दारू पिण्याची सवय होती पण ते कधी आपले काम चुकवून दारू पित नव्हते.तसे ते दोघे कधी ही कोणाच्या अध्यात आणि मध्यात राहत नव्हते. आपण भले आपले काम भले असे होते. गोव्यात अनेक परराज्यातून कामगार काम करणेसाठी येत असतात.काही माहिने वर्ष काम केले की ते इथून जात असतात. बरेच जण येथेच पोटा पाण्याची सोय होते राहत ही असतात.बिहार राज्यातून दीपक पासवान, रोशन पासवान, दिशकांत पासवान, कृष्णा पासवान आणि सुमीत कुमार शहा हे पाचजण येथे मजुरीसाठी आले होते. ते सर्वजण कामधंदा ही एकत्र करून एकत्रच राहत होते. त्यांना दारू पिण्याची सवय होती. काम संपल्यानंतर ते रोज दारू पित होते. गोव्यात दारूला काही कमी नाही. प्याल तेवढी थोडीच असते तसेच इथे दारु ही स्वस्त मिळत असल्याने दारू पिणाऱ्यांची इथे चंगळच असते. हे पाचही जण मुळचे बिहार राज्यातील बेगसुराई येथील होते. पोटापाण्यासाठी म्हणून मजुरी करण्यासाठी म्हणून ते गोव्यात आले होते. आसगाव जवळच एका ठिकाणी ते भाडयाने रुम करून राहत होते. दिवसभर मोलमजुरी करायची आणि रात्री दारू पिऊन झोपयचे त्यांना ना आगे ना पिछे असे होते. या पाचही जणांत दारू पिल्यानंतर वाद विवाद आणि भांडण तंटा ही होत होता.यातील दीपक पासवान आणि रोशन पासवान यांना जास्त दारू पचत नव्हती. तरी ही ते आव्हरलोड होत होते.एकाद्याला जास्त दारू झाली की उलटी होत असते तसे त्याचे होत होते. दारूच्या नशेत ते कधी कोणाबरोबर ही भांडण काढून मारामारी करत असल्याने त्याच्या नादाला कुणी लागत नव्हते. परराज्यातील कामगाराचे एक ठरलेले असते कोणताही गुन्हा करायचा आणि गुपचुपपणे आपल्या राज्यात पळून जायचे. म्हणून ते गुन्हा करायला ही मागे पुढे पाहत नाहीत. दारूची नशा झाली की माणुस शेळीचा वाघ बनतो आणि विनाकारण कोणाबरोबर ही वाद घालून भांडण करून मारामारी करीत असतो तसे त्या पाचजणांचे ही होते. त्यांना नेहमी दुसऱ्याबरोबर भांडण काढायाची सवय होती. सोमवार दि.९ जानेवारी रोजी ते काम संपवून घरी येत असताना त्या पाचही जणांनी फुल्ल दारू प्यालेली होती. दारूच्या नशेत ते पाचही जण एकमेकाशी वाद घालत आसगाव येथील एका बांधकाम साईटवरून चालले होते. दीपक पासवान आणि रोशन पासवान यांना नीट उभे ही राहता येत नव्हते. त्यांना दारू जास्त झाली होती. ते पाचही जण आपसात बडबडत एकमेकाला शिव्या घालत चालले होते. रात्रीचे ९ वाजले असतील ते ज्या बांधकाम साइटवरून चालले होते. त्या ठिकाणी सोहेल शेख आणि वासीम शेख याचे एसी टेक्निशयनचे काम चालू होते. दोघे ही काम संपवून खाली येवून बोलत थांबले असताना त्याचेसमोर दीपक पासवान रोशन पासवान, कृष्णा पासवान दिशकांत पासवान आणि सुमीतकुमार शहा हे दारूच्या नशेत चालले होते. त्याचवेळी तेथे आल्यावर वाशिम आणि सोहेल थांबलेल्या ठिकाणी दीपक पासवान याने दारूची भडाभडा उलटी केली. त्याची दुर्गंधी वास येत होते. हे बघून वाशिम शेख याने त्यांना उद्देशून म्हणाला की तु येथे रस्त्यावर का उलटी केलीस. तुला काही समजते का नाही? उलटी करण्याइतपत दारू कशाला पिता. त्याने एवढे म्हटल्यावर दीपक याला त्याचा राग आला. तु कौन बे, हमे शिकाने वाला म्हणत तो त्याला शिव्या देवू लागला.हे बघून वाशिम हा त्याला मारायला त्याचे अंगावर गेला. हे बघून दीपक पासवान याचे मित्र रोशन पासवान कृष्णा पासवान, दिशीकांत पासवान आणि सुमीत कुमार शहा यांनी वाशिम शेख याला जवळच पडलेल्या दगड वीटांनी मारहाण करायला सुरूवात केली. त्याला मारहाण होत असताना सोहेल शेख हा त्याला सोडवायला गेला असता त्या पाचही जणांनी वाशिम याला सोडून त्याला मारहाण करायला सुरूवात केल्यावर तो कसा बसा त्याच्या तावडीतून निसटून पळून गेला. आता त्याच्या तावडीत एकटा  वाशिम शेख हा सापडला होता. ते त्याला लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत असताना त्याचेतील एकाने वाशिम याच्या डोक्यात फरशीचा तुकडा घातला. त्या सरशी त्याच्या डोक्यातून मोठया प्रमाणात रक्तस्त्राव सुरू झाला. हे बघून त्या पाचही जणांनी तेथून पळ काढला. इकडे पळून गेलेला सोहेल शेख हा परत त्या ठिकाणी आपल्या चार लोकांना घेऊन आला होता. त्यावेळी मारहाण करणाऱ्यापैकी एक ही जण तेथे नव्हता. जखमी अवस्थेत वाशिम शेख तळमळत पडला होता.त्याच्या डोक्यातून रक्तस्त्राव सुरू होता. त्याच्या डोक्याला मोठी जखम आणि भोक पडले होते.सोहेल शेख आणि त्याच्या मित्रांनी तातडीने त्याला उपचारासाठी गोमॅको इस्पितळात दाखल केले. तेथे त्याचेवर उपचार सुरू केल्यावर त्याला थोडे बरे वाटत होते. पण त्याची प्रकृती ही चितांजनक आणि गंभीर अशी होती. गोमॅको इस्पितळाच्या अधिकाऱ्यांनी याघटनेची माहिती तातडीने हाणजूण पोलीसांना दिली. या घटनेची माहिती मिळताच पोलीस ही तातडीने घटनास्थळी आणि गोमॅको इस्पितळात दाखल झाले. त्यांनी या घटनेचा प्रत्यक्ष साक्षीदार असलेला सोहेल शेख याच्या कडून या घटनेची माहिती घेतली. त्याने पोलीसांना ही घटना कोणत्या कारणातून घडली याची माहिती देवून आरोपीची थोडक्यात माहिती दिली. पोलीसांनी घटनास्थळा शेजारचे सीसीटीव्ही फुटेज तपासले असता त्या फुटेज मध्ये वाशिम शेख याला मारहाण करणारे संशयीत आरोपी स्पष्ट दिसत होते. पोलीस त्यांचा शोध घेत असताना ते गोव्यातून पळून जाणार असल्याची माहिती पोलीसांना मिळाल्यावर पोलीसांनी तातडीने हालचाल करीत आसगाव येथे ते राहत असलेल्या ठिकाणाहून सुमीतकुमार शहा आणि कृष्णा पासवान यांना ताब्यात घेतले. तर दीपक पासवान, रोशन पासवान आणि दिशीकांत पासवान हे रेल्वे स्टेशनकडे गेल्याची माहिती मिळताच पोलीसांनी तातडीने हालचाल करीत त्याना रेल्वे स्टेशनवरून ताब्यात घेऊन हाणजुण पोलीस स्टेशनला आणले. तेथे त्याच्याकडे या घटनेची चौकशी केली असता त्यांनी दारूच्या नशेत एकाला मारहाण केल्याचे सांगितले. या घटनेची फिर्याद सोहेल शेख याने दिली असल्याने सुरूवातीला पोलीसांनी त्याचे विरूध्द मारहाणीची केस दाखल केली होती. तर दुसऱ्या दिवशी या घटनेतील गंभीर जखमी वाशिम शेख याचे उपचारा दरम्यान मृत्यू झाल्याने पोलीसांनी या गुन्हयात वाढ करून या पाच ही जणांच्या विरोधात वाशिम शेख (वय ३८) याला दगड वीटांनी मारहाण करून त्याचा खून केल्या प्रकरणी हाणजूण पोलीस स्टेशनला भा.द.वी.कलम ३०२ प्रमाणे गुन्हा दाखल करून त्यांना मा.कोर्टासमोर उभे केले असता मा.कोर्टाने त्यांना पाच दिवसाची पोलीस कोठडी सुनावली. या घटनेचा पुढील तपास हाणजुण पोलीस करीत आहेत. दारूची नशा करी जीवनाची दुर्दशा असे म्हटले जाते. दारूच्या नशेत कोणाच्या हातून कोणती घटना घडेल हे काही सांगता येत नाही. त्यातच जर दारू ओव्हर लोड झाली तर तो दारूडा समोरच्याला मारून टाकण्याची भाषा करतो आणि साध्या किरकोळ कारणावरून देखील भांडण उकरून काढले जाते तसे तर सार्वजनीक ठिकाणी दारू पिऊन उलटी केली तर कोणाला ही राग हा येणारच परंतु हा रागच वाशिम शेख याच्या अंगलट आला हेच या घटनेवरून दिसून येते.

## दर्पण दिनानिमित्त श्री श्री रविशंकर इंग्लिश स्कूल येथे पत्रकारांचा सत्कार

लातूर : प्रत्येक मुलाने आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये करीअर करण्यासाठी शिक्षणाची पहिली पायरी कष्टाने पूर्ण करणे गरजेचे आहे. पत्रकारिता हे क्षेत्र मुलांसाठी ग्लॅमर म्हणून खुनावणारे क्षेत्र असले तरीही यामध्ये सजगता, चिंतन आणि संवेदनशिलता यासोबतच अभ्यासाची अत्यंत आवशयकता आहे. या क्षेत्रात येऊ पाहणार्या मुलांनी आपले पदवी शिक्षण पूर्ण करून आवड असेल तरच आव्हान म्हणून या क्षेत्रात यावे, असे प्रतिपादन पत्रकार दिपरत्न निलंगेकर यांनी केले. श्री श्री रविशंकर इंग्लिश स्कूल च्या वतीने दर्पण दिनानिमित्त लातूर जिल्ह्यातील पत्रकारांच्या सत्कारासोबतच विद्यार्थ्यांसोबत संवाद कार्यक्रमाचे आयोजन संस्थेच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी पत्रकार दिपरत्न निलंगेकर बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र कोळगे हे होते. यावेळी पत्रकार अभय मिरजकर, एजाज शेख, शशिकांत पाटील, प्रा.डॉ. सितम सोनवणे, वामन पाठक यांचा संस्थेच्या वतीने चित्रकला शिक्षक दिपक कांबळे यांनी रेखाटलेली बाळशास्त्री जांभेकर यांची प्रतिमा देऊन सत्कार करण्यात आला. शालेय जिवनामध्ये विद्यार्थ्यांना विविध क्षेत्र खुनावत असतात. अनेकवेळा मुलांनी डॉक्टर, इंजिनिअर व्हावे असा पालकांचा आग्रह असतो त्यामुळे मुलांना आवडीच्या क्षेत्रात जाण्यासाठी अडचणी निर्माण होतात. तेव्हा शालेय जीवनापासून मुलांनी आपल्याला ज्या क्षेत्रात जायचे आहे त्याविषयी सजगता बाळगावी. प्रशासकीय सेवेसोबतच पत्रकारिता क्षेत्रामध्ये देखील करिअर करण्याच्या मोठ्या संधी आहेत.

पान ८ वरून...

## कोरोना काळात मृत्यू पावलेल्या पोलीस...

निधी प्राप्त होऊन तो निधी महाराष्ट्र पोलीस मुख्यालय यांच्याकडे वर्ग केला.तो निधी पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर यांच्याकडे २ जानेवारी २०२३ रोजी प्राप्त झाला आहे. दरम्यान अक्कलकोट तालुक्यातील राज्य सरचिटणीस सिद्धार्थ भाऊ कोळी, तालुकाध्यक्ष रहिमान अत्तार, प्रसिद्धीप्रमुख श्रीशैल पाटील, उपाध्यक्ष महादेव पाटील, लक्ष्मीपुत्रं आंदेवाडी व इतर पदाधिकारी व पोलीस पाटील यासाठी सहकार्य केले आहेत व करमाळा तालुक्यातील तालुकाध्यक्ष प्रताप पाटील व त्यांचे सहकारी यांनी सुद्धा यासाठी सहकार्य केले आहेत, असे राज्याध्यक्ष दिलीप पाटील यांनी सांगितले. तसेच पोलीस पाटील संघटनेच्या रेट्यामुळे महिला पोलीस पाटील सुवर्णा मदन पाटील (पिंपळवाडी, ता.करमाळा) व शिवलिंग रामकृष्ण लिंबाळ (मिरजगाव, ता.अक्कलकोट) यांच्या वारसांना प्रत्येकी पन्नास लाख रुपये सानुग्रह अनुदान चालू आठवड्यामध्ये संबंधित वारसांच्या खात्यावरती जमा होतील असेही दिलीप पाटील म्हणाले. पोलीस पाटील त्यांच्या मागणीबाबत शासनाने मानवी भूमिकेतून घेतलेल्या निर्णयाचे स्वागत आहे.तसेच मयत पोलीस पाटील विजयकुमार भांगे व हनुमंत कांबळे यांच्या प्रस्तावावर काम सुरू आहे.लवकरच हे प्रस्ताव सुध्दा मंजूर होतील.

## केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध...

सौ चित्राताई वाघ म्हणाल्या की देशातीलच नव्हे तर जगातील सर्वात मोठ्या पक्षाचे  विश्र्वगौरव नरेंद्रजी मोदी साहेब आणि राज्यात आन-बान शान असणारे देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात काम करणारे कार्यकर्ते आहोत. लुंगे सुंगे नाहीत त्यामुळे भिण्याचे काही कारण नाही. राजकारणा बरोबरच जिव्हाळ्याच्या विषयावर महिलांना प्रबोधन करणे मार्गदर्शन करणे ही महिला मोर्चाची जबाबदारी असल्याचे बोलून दाखविले.लातूरला महिला शक्ती सक्षम आहे. ज्यावेळी महिला राजकारणात नव्हत्या, घराबाहेर पडणे मुश्किल होते, राजकारण तर खूपच पुढचे होते, त्यावेळी लातूर जिल्ह्याने रूपाताई पाटील निलंगेकर यांच्या माध्यमातून सक्षम आणि कार्यक्षम महिला खासदार दिला. महिलांना सक्षम करण्याचे काम भारतीय जनता पार्टीच्या महिला मोर्चाच्या वतीने करण्यात येते.

पक्षाची खूप मोठी ताकद आहे. सर्वांना सोबत घेऊन महिलांनी सख्या आणि पक्क्या मैत्रिणी होऊन भाजपा मजबूत करण्यासाठी काम करावे आणि येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत भाजपाच्या विजयात महिला मोर्चाने मोठे योगदान द्यावे असेही आवाहन सौ. चित्राताई वाघ यांनी महिलांना केले. या महिला मेळाव्यात मीनाक्षीताई पाटील, भारतबाई साळुंखे, सविताताई कुलकर्णी, रेखाताई तरडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रारंभी शहर जिल्हाध्यक्ष मीनाताई भोसले यांनी प्रास्ताविकातून मेळाव्याची भूमिका विषद केली. मेळाव्याचे सूत्रसंचालन सौ. स्वातीताई घोरपडे आणि उमाताई व्यास यांनी केले. तर शेवटी ललिता कांबळे यांनी आभार मानले.

## रस्ता सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे ...

करून प्रबोधनाबरोबरच कार्यवाही व अंमलबजावणी करण्यात येणार असल्याची माहिती उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. भोये यांनी दिली. तसेच यावर्षी अपघाताचे प्रमाण ३० टक्क्यांनी कमी करण्याचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी उपस्थितांना रस्ता सुरक्षाविषयक प्रतिज्ञा देण्यात आली. तसेच रस्ता सुरक्षा विषयक जनजागृती साहित्याचे प्रकाशन करण्यात आले. विना अपघात सेवा केलेल्या वाहन चालकांना यावेळी गौरविण्यात आले आहे. सूत्रसंचालन मोटार वाहन निरीक्षक श्रीमती सविता पवार यांनी केले, वाहतूक पोलीस उपनिरीक्षक आवेज काझी यांनी आभार मानले.

## उदगीर जिल्हा निर्मितीसाठी जन ...

भविष्यात या भागाचा आमदार म्हणून मी स्वतः विधानसभेत आवाज उठवणार असुन येणाऱ्या अर्थसंकलीप अधिवेशनात प्रामुख्याने मी उदगीर जिल्हा करा म्हणून विषय मांडणार असल्याचे आ.बनसोडे यांनी सांगितले. यावेळी विविध पक्षातील पदाधिकाऱ्यांनी व सामाजिक कार्यकर्त्यांनी आपले मनोगत व्यक्त केले. याप्रसंगी विविध पक्षाचे पदाधिकारी, महिला, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंदांचे ...

आवाहन केले. यावेळी रुपाली देवकर, सारिका वाघमारे, श्रीदेवी काळे, नेहा सय्यद या विद्यार्थिनींनी मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रीती जाधव यांनी केले तर आभार प्रियंका डोंगरे यांनी आभार मानले. यावेळी शिवकुमार चिकले, पवन नवगिरे आदी उपस्थित होते.

## पत्रकार दिनानिमित्त वाड्यात ...

अल्पवयीन मुलींवर होणारे अत्याचार कसे रोखता येतील, प्रेम, लग्न योग्य वेळी होतीलच मात्र शिक्षण हे महत्वाचे हत्यार आहे याचे महत्त्व सांगुन स्पर्धा परीक्षेत भरारी घेण्याचे मार्ग व सोबत मोबाईलचे दुष्परिणाम या बाबत पल्लवी बाणे यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करतांना पटवून दिले. कायद्याचे ज्ञान मुलींना व्हावे या उद्देशाने पत्रकार दिनाचे औचित्य साधून वाडा तालुका पत्रकार संघाच्या वतीने जनसंवाद अभियान अंतर्गत विद्यार्थीनींसाठी मार्गदर्शन शिबिराचे आयोजन स्वामी विवेकानंद विद्या मंदिर वाडा येथे आयोजित करण्यात आले होते. यावेळी पत्रकार शशिकांत कासार, संजय लांडगे, रुपेश मोकाशी, सचिन भोईर, नीहेश गायकवाड, मच्छिंद्र आगिवले, प्रितेश पटेल, सिद्धार्थ सांबरे, मनोज बुंधे, शेखर पवार, सत्यवान तरे व पोलीस कर्मचारी यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते. शाळेचे उपप्राचार्य पाडवी सर, जी.जू पाटील, अर्चना सुर्यवंशी आदी उपस्थित असून यावेळी शाळकरी मुलांच्या ढोलताशा पथकाने कार्यक्रमाची शोभा द्विगुणित केली.

## आदर्श आचारसंहितेचा भंग होणार...

शिक्षक मतदारसंघाची प्रारुप मतदार यादी बुधवार दि. २३ नोव्हेंबर २०२२ रोजी प्रसिध्द करण्यात आली होती. या यादीनूसार कोकण विभगात एकूण ३० हजार १६२ मतदार असून त्यापैकी १६ हजार ८२ स्त्री मतदार असून १४ हजार ८० पुरुष मतदार होते.  या मतदार याद्यांवर दि. २३ नोव्हेंबर ते ०९ डिसेंबर २०२२ या कालावधीत प्राप्त झालेले दावे व हरकती निर्णीत करुन कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या मतदार यादीची अंतिम प्रसिध्दी शुक्रवार दि. ३० डिसेंबर २०२२ रोजी करण्यात आली. या अंतिम यादीनूसार कोकण विभागात एकूण ३७ हजार ७१९ मतदार असून त्यापैकी १८ हजार ९७ स्त्री मतदार आहेत तर १९ हजार ६२२ पुरुष मतदार आहेत. अंतिम यादी जाहीर झाल्या नंतर भारत निवडणूक आयोगाने दि.२९ डिसेंबर २०२२ च्या परिपत्रकान्वये कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाच्या व्दिवार्षिक निवडणूकीचा कार्यक्रम जाहीर केला असून त्याच दिवसापासून आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाच्या जाहीर करण्यात आलेल्या कार्यमक्रमानूसार दि. ५ जानेवारी २०२३ रोजी निवडणूकीची अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल. दि. १२ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रे सादर करण्याचा अखेरचा दिनांक असेल. दि. १३ जानेवारी रोजी नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात येईल. दि. १६ जानेवारी रोजी उमेदवारी अर्ज मागे घेण्याचा अंतिम दिनांक असेल. दि. ३० जानेवारी रोजी मतदान होईल. मतदानाची वेळ सकाळी ८.०० ते दुपारी ४.०० अशी असेल. दि. २ फेब्रूवारी रोजी मतमोजणी केली जाईल आणि दि. ४ फेब्रूवारी रोजी निवडणूक प्रक्रिया पूर्ण झालेली असेल. आचारसहिंतेबाबत माहिती देताना आयुक्त डॉ. कल्याणकर म्हणाले की, कोकण विभागात जिल्हास्तरावर आचारसंहिता स्थायी समितीची स्थापना करण्यात आली असून,  या समितीत जिल्हाधिकारी व राजकीय पक्षांचे प्रतिनिधी यांचा समावेश असेल. जिल्हास्तरावर  तक्रार निवारण कक्ष, माध्यम प्रमाणीकरण व देखरेख समिती  व भरारी पथक स्थापन करण्यात येत आहेत. तालुकास्तरावर व्हिडीओग्राफी पथक तयार करण्यात येत असून, या पथकांमार्फत राजकीय पक्ष/लोक प्रतिनिधी यांच्या दौऱ्यादरम्यान आचारसंहितेचा भंग होणार नाही याबाबत पर्यवेक्षण करण्यात येईल. विभागीयस्तरावर चोवीस तास चालू असलेला तक्रार निवारण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. प्रसार माध्यमांनी निवडणूकीबाबत जनसामान्यांमध्ये जनजागृती करावी. असे आवाहन यावेळी नवनियुक्त आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी या पत्रकार परिषदेत केले.

क्राईम संध्या | सोमवार दि. १६ जानेवारी २०२३ ते रविवार दि. २२ जानेवारी २०२३ | लातूर/पालघर/सोलापूर | www.crimesandhya.com | ७

# रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत उल्लेखनीय कार्याबद्दल माझं लातूर परिवार सन्मानित




**लातूर/प्रतिनिधी**

रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत २०२२ या वर्षात शहरात विविध उपक्रम यशस्वीरित्या राबवून जनजागृती केल्याबद्दल माझं लातूर परिवाराचा उप जिल्हाधिकारी आणि अतिरिक्त पोलीस अधीक्षक यांच्या हस्ते सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. जिल्हा सुरक्षा समिती, परिवहन विभाग आणि पोलिस विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने राज्य रस्ता सुरक्षा अभियान-२०२३चे उद्घाटन उप जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांच्या अध्यक्षतेखाली डी पी डी सी हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय येथे संपन्न झाले. याप्रसंगी अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ अजय देवरे, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय भोये, डॉ आनंद कलमे यांची प्रमुख उपस्थिती होती. ११ जानेवारी ते १७ जानेवारी या कालावधीत राज्यभर सुरक्षा सप्ताह पाळण्यात येतो या निमित्त रस्ते सुरक्षा विषयक मार्गदर्शन, प्रबोधन आणि जनजागृती करण्याच्या हेतूने अनेक उपक्रम राबविण्यात येत असल्याची माहिती प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार यांनी आपल्या प्रास्ताविकात दिली. जनजागृती सोबतच वाहतूक नियमांची कठोर अंमलबजावणी करून रस्ता सुरक्षा अभियान राबविण्यात येणार असल्याचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय भोये यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले. वाढती वाहन संख्या, रस्त्यांची दुरावस्था यामुळे होणाऱ्या अपघातांवर प्रकाश टाकत रस्ता सुरक्षा नियमांचे नागरिकांनी काटेकोरपणे पालन करावे असे आवाहन उप जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांनी अध्यक्षपर भाषणात मार्गदर्शन करताना केले. याप्रसंगी मंचावरील सर्व मान्यवर आणि सभागृहात उपस्थित नागरिकांनी रस्ता सुरक्षा विषयक नियम पाळण्याची शपथ घेतली. या कार्यक्रमात विना अपघात सेवा देणाऱ्या १३ खाजगी बस वाहतूक चालकांचा सन्मान चिन्ह देऊन मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तर २०२२ साली रस्ता सुरक्षा अभियानात पत्रकार आणि वर्तमान पत्र वितरित करणाऱ्या १०२ व्यक्तींना मोफत हेल्मेट वितरण, जनजागृती शिबिर, प्रबोधनपर मार्गदर्शन शिबीर या माध्यमातून उल्लेखनीय योगदान देत उपक्रमाला चालना दिल्याबद्दल माझं लातूर परिवाराचा विशेष सन्मान चिन्ह देऊन सत्कार करण्यात आला. माझं लातूर परिवाराचे प्रमुख सतीश तांदळे यांच्यासह अभय मिरजकर, संजय स्वामी, प्रमोद गुडे, काशिनाथ बळवंते, डॉ सितम सोनवणे, जुगलकिशोर तोष्णीवाल, सोमनाथ मेदगे यांनी हा पुरस्कार स्वीकारला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मोटार वाहन निरीक्षक सविता पवार यांनी केले तर आभार शहर वाहतूक पोलीस उप निरीक्षक आवेझ काझी यांनी मानले. रस्ता सुरक्षा अभियान उद्घाटन सोहळ्यास महाविद्यालयीन विद्यार्थी, विविध वाहतूक संघ, जिल्हा ट्रॅव्हल्स असोसिएशनचे पदाधिकारी, शहर पोलिस वाहतूक, परिवहन विभागाचे अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कर्नाटक जोडो आंदोलन करणारा शाळेतील शिपाई निलंबित का?

**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

महाराष्ट्र राज्यातील सीमा भागातील गावांना आणि नागरिकांना सोयी सुविधांना तोंड द्यावे लागत असल्याचा संताप व्यक्त करत अक्कलकोट तालुक्यातील हैद्रा येथे असलेल्या, श्री काशीविश्वेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ जेऊर संचलित हैद्रा प्रशाला, प्रशालेतील एका शिपायाने नागरिकांना सोबत घेऊन आंदोलन केले महाराष्ट्र विरोधी भूमिका घेतल्याचा ठपका ठेवत त्यांना सेवेतून निलंबित करण्याची कारवाई जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभागाच्या आदेशानुसार प्रशालेने कारवाई केली आहे. मल्लिनाथ शरणप्पा करपे असे त्या निलंबित (शिपाई) कर्मचाऱ्यांचे नाव आहे. हैद्रा प्रशालेचा (शिपाई) कर्मचारी व कर्नाटक रक्षणा वेदिकेचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष मल्लिनाथ करपे व कन्नड साहित्य परिषद महाराष्ट्र घटक चे शाखा अध्यक्ष सोमशेखर जमशेट्टी यांनी जनतेला आवाहन करून सेवा सुविधा मिळण्यासाठी कर्नाटकात गेल्याशिवाय पर्याय नाही यामुळे आंदोलनच पर्याय आहे असे आवाहन करून एल्गार करण्यासाठी पुढाकार घेतला होता त्यामुळे उडगी व परिसरातील गावातील (ता.अक्कलकोट) नागरिकांनी आंदोलन करून कर्नाटक जाण्याबाबत भूमिका मांडली होती या घटनेला जबाबदार धरून अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्याच्या पोलीस



निरीक्षकांनी आठ डिसेंबर रोजी जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यांना मल्लिनाथ करपे यांच्या भूमिकेबाबत पत्राद्वारे कळविले होते. त्यानुसार शिक्षण विभागाने २६ डिसेंबर २०२२च्या पत्रांमुळे महाराष्ट्र खाजगी शाळा संहिता तसेच महाराष्ट्र खाजगी शाळातील कर्मचारी सेवेच्या शर्ती नियमावली १९८१ अन्वये नियुक्ती प्राधिकारी म्हणून संस्था असल्याने मल्लिनाथ करपे यांना आपल्या संस्थेच्या अधिनस्त कार्यरत असून त्यांच्यावर महाराष्ट्र शासनाच्या विरोधात लोकांना चुकीचे मार्गदर्शन करून कर्नाटक राज्यात उडगी व परिसरातील गावे विलीनीकरण होण्याबाबत प्रोत्साहित केल्याने त्यांना सर्वस्वी जबाबदार धरून त्यांच्यावर कारवाई करण्याची सूचना देण्यात आली होती. संस्थेने ३१ डिसेंबर २०२२ रोजी ठराव करून मल्लिनाथ करपे यांना २ जानेवारी २०२३ रोजी सेवेतून निलंबित केले आहे. याबाबत जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षण विभागालाही कळविले आहे.

# रिक्षात विसरलेला लाखोंचा ऐवज अवघ्या चार तासात दिला परत

**सोलापूर/प्रतिनिधी**



रात्री अकराची वेळ होती सोलापुरात उतरलेले मुंबईतील जोडपे फौजदार चावडी पोलीस ठाण्यात आले व ठाणे अंमलदाराकडे त्यांनी लाखोंच्या ऐवजाची पर्स रिक्षात विसरल्याचे सांगितले. घटनेचे गांभीर्य ओळखून नवीवेस आणि तरटी नाका बीट मार्शल यांना पोलीस ठाण्यातून सूचना दिल्या गेल्या. त्यानंतर अवघ्या चार तासात फौजदार चावडी पोलिसांनी अडीच लाखांचा ऐवज त्या जोडप्याला परत मिळवून दिला. विराज रतन मोरे व त्यांच्या पत्नी करुणा मोरे हे शनिवारी सकाळी मुंबई चेंबूरहून येथून सोलापूर कडे आले होते , सायंकाळी सातच्या सुमारास ते सोलापूर एसटी स्थानकात उतरले विजापूर रोडवरील महात्मा फुले शाळेजवळील नातेवाईकाकडे जाण्यासाठी त्यांनी स्टॅन्ड बाहेरून रिक्षा घेतली. नातेवाईकांच्या घरी पोहोचल्यानंतर मोरे दाम्पत्य गप्पांमध्ये रंगले. दरम्यान रात्री साडेदहाच्या सुमारास बॅगा चाळताना त्यांना दागिने, कागदपत्रे व मोबाईल व रोकड ठेवलेली पर्स आढळली नाही त्यांनी सर्वत्र शोध घेतला तेव्हा पर्स रिक्षातच राहिल्याचे त्यांच्या लक्षात आले. मोरे दांपत्याने रात्री अकरा वाजता फौजदार चावडी पोलीस ठाणे गाठत घडलेली हकीकत ठाणे अंमलदार यांना सांगितले. अंमलदार जगन्नाथ रुपनर यांनी नवीवेस पोलीस चौकीचे बीट मार्शल सुधाकर माने व तरटी नाका पोलीस चौकीचे कुमार चव्हाण यांना शोध घेण्याच्या सूचना केल्या. बीट मार्शल माने आणि चव्हाण यांनीच लागली च स्टॅन्ड गाठले सात नंतर येथून प्रवासी घेऊन गेलेल्या रिक्षा चालकांची माहिती घेतली तसेच परिसरातील सीसीटीव्ही तपासले परंतु उपयुक्त अशी माहिती त्यांच्या हाती लागली नाही, परंतु सुतावरून स्वर्ग गाठण्याची कला अवगत असलेले बीट मार्शल सुधाकर माने व कुमार चव्हाण यांनी काही तासात रिक्षा चालकाचा शोध घेतला आदित्य नगरात राहणारे रिक्षा चालक दीपक डोंबाळे यांचे घर त्यांनी गाठले पोलिसांनी डोंबाळे यांना मध्यरात्री झोपेतून उठवत घडल्या घटनेची माहिती दिली. डोंबाळे यांनी पोलिसा समक्ष रिक्षाचे तपासणी केली त्यामध्ये मोरे दांपत्याचे दागिने असलेली पर्स आढळून आले. दरम्यान पहाटे चार पर्यंत या सर्व घडामोडी सुरू होत्या. फौजदार चावडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उदयसिंह पाटील यांच्या उपस्थितीत ठाणे अंमलदार जगन्नाथ रुपनर यांच्या हस्ते मोरे यांना दागिन्यांची बॅग परत करण्यात आली.

# मराठवाडा स्तरीय वादविवाद स्पर्धेत केशवराज विद्यालयाचे यश

**उदगीर/प्रतिनिधी**



उदगीर येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या वतीने आयोजित मराठवाडा स्तरीय लालबहादूर शास्त्री आंतरशालेय वादविवाद स्पर्धेत लातुरच्या श्री केशवराज माध्यमिक विद्यालयाने यश मिळवले. शैक्षणिक स्पर्धा बालपण हिरावून घेत आहे की नाही या विषयावर ही स्पर्धा घेण्यात आली.यात केशवराजचा विद्यार्थी अपूर्व कुलकर्णी याने विषयाच्या अनुकूल बाजूने आणि संकेत केंद्रे याने विषयाच्या प्रतिकूल बाजूने विषय मांडणी केली. या स्पर्धेत अपूर्व कुलकर्णी याने शहरी मुलांच्या गटातून तृतीय क्रमांकाचे ३ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे पारितोषिक प्राप्त केले. संकेत केंद्रे याने शहरी मुलांच्या गटातून पाचव्या क्रमांकाचे १ हजार रुपये रोख, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र मिळवले. या यशस्वी विद्यार्थ्यांना वादविवाद स्पर्धा विभाग प्रमुख श्रीमती वनमाला कलुरे, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख श्रीमती क्षमा कुलकर्णी, श्रीमती स्मिता मेहकरकर, नरेश इरलापल्ले, मन्मथ कासनाळे आदी शिक्षकांनी मार्गदर्शन केले. या यशाबद्दल भारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष डॉ.सुरेंद्र आलूरकर, उपाध्यक्ष जितेश चापसी, कार्यवाह डॉ.हेमंत वैद्य, केंद्रीय कार्यकारिणी सदस्य प्रवीण सरदेशमुख, संजय गुरव, पूर्व कार्यवाह नितीन शेटे, स्थानिक समन्वय समिती अध्यक्ष धनंजय तुंगीकर, शालेय समिती अध्यक्ष शैलेश कुलकर्णी, मुख्याध्यापक प्रदीप कुलकर्णी, उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक संदीप देशमुख, दिलीप चव्हाण, बबन गायकवाड, श्रीमती अंजली निर्मळे, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख श्रीमती क्षमा कुलकर्णी, वादविवाद स्पर्धा विभाग प्रमुख श्रीमती वनमाला कलुरे, श्रीमती मेहकरकर, मन्मथ कासनाळे विद्यालयातील सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

### शाक्यमुनी बौद्ध विहार सुभेदार रामजी नगर लातूर येथे आयोजित

# महात्मा बसवेश्वरचा आंबेडकरी जलसा पहिल्या बौद्ध धम्म परिषदेत सर्वद्वितीय

**लातूर/प्रतिनिधी**

लातूर येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील सांस्कृतिक व संगीत विभागाच्या चमूने शाक्यमुनी बौद्ध विहार सुभेदार रामजी नगर, लातूर येथे आयोजित पहिल्या बौध्द परिषदेत (२०२३) आंबेडकरी जलसा या स्पर्धेत सर्व द्वितीय क्रमांक प्राप्त केला. शैक्षणिक, सामाजिक, सांस्कृतिक, पत्रकारिता व साहित्य या क्षेत्रात भरीव कामगिरी करणाऱ्या या बौद्ध विहाराच्या वतीने बौद्ध धम्म मेळावा शनिवार दिनांक ७ जानेवारी २०२३ रोजी आयोजित करण्यात आला होता .या मेळाव्यात महाविद्यालयीन स्तरावरील विद्यार्थ्यांकरिता आंबेडकरी जलसा या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. विजेत्या संघाचा सत्कार महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ संचालक श्रीकांत उटगे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दिनेश मोने, उपप्राचार्य डॉ.राजकुमार लखादिवे, पर्यवेक्षक प्रा.एस.आर. हावळे यांच्या शुभहस्ते करण्यात आला. यावेळी सांस्कृतीक विभाग प्रमुख डॉ. रत्नाकर बेडगे, डॉ. यशवंत वळवी, डॉ.जितेंद्र देशमुख, संगीत विभाग प्रमुख प्रा. विजयकुमार धायगुडे, प्रा.विश्वनाथ स्वामी, प्रा.अश्विनी रोडे, प्रा. गोविंद पवार आदी मान्यवर उपस्थित होते. विजेत्या संघात नम्रता वाघमारे, राहुल गडेराव, माळी ज्ञानेश्वरी, मेहेक मुजावर, मुखडे शिवाली, मानसी बनशेट्टी, स्वाती स्वामी, अनघा मुळे या विद्यार्थी विद्यार्थिनींचा समावेश होता. प्रबोधनात्मक सादर केलेल्या आंबेडकरी जलसाने रसिक श्रोत्यांची मने जिंकली. त्यांच्या या यशाबद्दल महात्मा बसवेश्वर शिक्षण संस्थेचे सर्व सन्माननीय पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दिनेश मोने, उपप्राचार्य डॉ. राजकुमार लखादिवे तसेच महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# देवणी नगरपंचायतच्या वतीने डॉ.विनायकराव पाटील मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टरांचा सत्कार

**देवणी/शकील मनियार**



देवणी तालुक्यात नवीन उभारण्यात आलेल्या डॉ.विनायकराव पाटील हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेल्या सज्ज डॉक्टरांचा सत्कार देवणी नगरपंचायत च्या वतीने करण्यात आला.गेल्या आठवड्यात डॉ.अमित पाटील, डॉ.देवश्री पाटील, डॉ.श्वेता पाटील व डॉ.आशिष पाटील यांच्या अथक प्रयत्नाने कर्करोगाचे चार शस्त्रक्रिया यशस्वीपणे केले असून सतत बारा तास चालेल्या शस्त्रक्रियेसाठी डॉ. अमित पाटील व डॉ.देवश्री पाटील यांनी लातूर जिल्ह्यातील पहिली कर्करोगाची शस्त्रक्रिया जे की मोठ्या शहारासारख्या ठिकाणी होते ती शस्त्रक्रिया देवणीत करून कर्करोगाच्या रुग्णांना जीवनदान दिले आहेत. व तसेच रुग्णांना मुख्यमंत्री सहायता निधीतून निधी मिळवून दिले आहेत. व तसेच हॉस्पिटलमध्ये शस्त्रक्रियेसाठी आमदार निधी, मुख्यमंत्री निधी, सिद्धिविनायक ट्रस्ट. एस.बी.आय जनरल एनशोरन्स आदी योजनेतून शस्त्रक्रिया करून रुग्णाकडून पैसे न घेता या योजनेचा लाभ करुन देत आहेत. तसेच अनेक ट्रस्टस व मंदिर चॅरीटी निधी मिळण्यास या हॉस्पिटलला पात्र घोषित करण्यात आली आहेत. त्यामुळे कॅन्सर व इतर गंभीर आजारा साठी या पुढे पेशंटच्या ऑपरेशन्स व खर्चिक उपचारासाठी खर्चाचा मोठा वाटा शासन व ट्रस्ट उचलणार आहेत. त्यात कॅन्सर ग्रस्त जीभ काढून त्या ठिकाणी त्याच रुग्णाच्या शरीराचे भाग वापरून नवीन जीभ तयार करून जुन्या जीभेच्या ठिकाणी रोपन यशस्वी रित्या करण्यात आले. अशा दोन सर्जरीज झाल्या आहेत.तसेच दुसऱ्या ऐका रुग्णाच्या तोंडातील दोन कॅन्सरचे जबडे काढून त्या ठिकाणी त्याच व्यक्तिचे कमी महत्वाचे हाड वापरून नवीन जबडे तयार करून त्याचेही यशस्वी रित्या रोपन करण्यात आले आहे. अशा प्रकारच्या सर्जरीज मुंबई, पुणे सारख्या मोठ्या शहरात होतात. परंतु प्रथमच देवणी येथील डॉ विनायकराव पाटील मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटल मध्ये आता होऊ लागल्या आहेत. तसेच सोनोग्राफीची तपासणी जी रु ९७५ देऊन केली जाते ती या हॉस्पिटल मध्ये गर्भवती महिला साठी देवणीच्या शासकीय हॉस्पिटल मध्ये नोंदणी करून आल्यास ती या हॉस्पिटल मध्ये मोफत केली जाते. सदर तपासणी फी शासन या हॉस्पिटला देते. अश्या या त्यांच्या उत्कृष्ट कार्याबद्दल नगरपंचायत चे उपनगाराध्यक्ष अमित मानकरी यांच्या हस्ते डॉ.अमित पाटील यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी भगवानराव पाटील, डॉ.आशिष पाटील,डॉ.सौ श्वेता पाटील, डॉ.देवश्री पाटील, रुग्णालयातील कर्मचारी आदी व नगरपंचायत येथील नगरसेवक महादेव मळभगे, बंटी सूर्यवंशी, देविदास पतंगे, पत्रकार रमेश कोतवाल, रेवन मळभगे आदींची उपस्थिती होती.

# संत ज्ञानेश्वर विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

**अहमदपूर/फिरोज शेख**



संत ज्ञानेश्वर विद्यालयात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती निमित्त शाळेत वेशभूषा ,वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी आपल्या भाषणातून राजमाता जिजाऊ व युगपुरुष स्वामी विवेकानंद यांच्या कार्याचे वर्णन केले. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पूजन करून भाषण स्पर्धेला प्रारंभ करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक आशा रोडगे, प्रमुख पाहुणे म्हणून मीना तोवर, अर्चना सुर्यवंशी उपस्थित होते. यावेळी पहिली ते आठवीच्या विद्यार्थ्यांनी भाषणामध्ये सहभागी होत आपले विचार मांडले. या भाषाण स्पर्धेत व वेशभूषा स्पर्धेत प्रथम यशस्वी सूर्यवंशी, आदिती महाजन, सानवी पांचाळ द्वितीय रिशिता क्षेत्रफळे, श्रावस्ती ससाने, आफिफा शेख तृतीय परिणीती तिडके, मुस्कान शेख, वैभवी फुलमंटे,सानवी माचवे तर स्वामी विवेकानंदाच्या वेशभूषेत सार्थक नाईकवाडे, सिद्धांत कांबळे, सूर्यकर्ण नागरगोजे या विद्यार्थ्यास मुख्याध्यापिका आशा रोडगे व वर्ग शिक्षक यांच्या हस्ते बक्षीस देऊन कौतुक करण्यात आले. या स्पर्धेचे निरीक्षक म्हणून सुजाता बुर्गे व संजीवनी गुरमे यांनी काम पाहिले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मीना होनराव यांनी केले तर सूत्रसंचालन सतीश साबणे यांनी व आभार शबाना शेख यांनी मानले.

# बालिवली शाळेच्या विद्यार्थ्यांचा अनोखा उपक्रम; विद्यार्थ्यांनी बनवले तीळगुळ

**वाडा/प्रतिनिधी**



विद्यार्थ्यांना जीवन शिक्षण मिळावे म्हणून बालिवली शाळेत वर्षभर विविध प्रकारचे उपक्रम राबविले जातात. असाच एक जीवनानुभव विद्यार्थ्यांना मिळावा म्हणून शनिवारी (दि.१४ जानेवारी) बालिवली येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षकांनी साहित्य उपलब्ध करून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष तीळगुळ बनवण्याचे प्रात्यक्षिक देऊन विद्यार्थ्यांना शिकण्याचा आनंद दिला. महागाई आणि हालाखीची परिस्थिती यामुळे पाड्यावरून शाळेत येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या सर्वच कुटुंबात तीळगुळ बनवले जातीलच याची शाश्वती नव्हती, ही पार्श्वभूमी शिक्षकांना ठाऊक असल्याने नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच सदरचा उपक्रम राबवून नवीन वर्षाची सुरुवात आनंददायी व गोड केली. सदरची कृती (रेसिपी) कशी बनवली हे लिहायला आणि पालकांना सांगायला विद्यार्थी नक्कीच विसरणार नाहीत असे मुख्याध्यापक संजय फराड यांनी आवर्जून सांगितले.

# कोरोना काळात मृत्यू पावलेल्या पोलीस पाटीलांच्या वारसांना ५० लाखांचे अनुदान मिळणार-दिलीप पाटील





**सोलापूर/इरप्पा बोरीकरजगी**

कोरोना काळात सोलापूर जिल्ह्यातील मृत्युमुखी पडलेल्या चार पोलीस पाटलांपैकी दोन पोलीस पाटलांच्या वारसांना प्रत्येकी पन्नास लाख रुपये प्रमाणे एक कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले असल्याची माहिती पोलीस पाटील संघटनेचे राज्याध्यक्ष दिलीप पाटील यांनी दिली आहे. कोरोना महामारीच्या काळात प्रशासनाचा सर्वात शेवटचा व महत्त्वाचा घटक म्हणून ग्रामीण भागात पोलीस पाटील यांनी जोखमीची व महत्त्वाची भूमिका पार पाडली होती. या महामारीच्या काळात विविध पातळ्यावर काम करणाऱ्या महिला पोलीस पाटील सुवर्णा मदन पाटील, शिवलिंग रामकृष्ण लिंबाळ, विजयकुमार भांगे तसेच हनुमंत कांबळे या चार पोलीस पाटलांचे कोरोनामुळे निधन झाले होते. अक्कलकोट तालुक्यातील शिवलिंग निंबाळ यांचे प्रस्ताव १० जून २०२१ रोजी दाखल करण्यात आले होते. त्या अनुषंगाने ७ डिसेंबर २०२२ रोजी गृह विभागाची मान्यता मिळाली व २ जानेवारी २०२३ रोजी पोलीस अधीक्षक कार्यालय सोलापूर येथे सोलापूर जिल्ह्यातील दोन पोलीस पाटलांच्या वारसदारांना सानुग्रह अनुदानासाठी एक कोटी रुपये निधी प्राप्त झालेला आहे. शासन निर्णयाप्रमाणे एक मार्च २०२० ते ३० जून २०२१ या काळात मयत झालेल्या पोलीस पाटलांच्या वारसांना प्रत्येकी पन्नास लाख रुपये देण्यात येणार आहेत. हे सानुग्रह अनुदान मिळावे यासाठी पोलीस पाटील संघटनेने सातत्याने प्रयत्न केले होते.शिवाय संघटनेच्या वतीने वेळोवेळी जिल्हा व राज्य स्तरावर केलेल्या आंदोलनामध्ये ही मागणी लावून धरली होती. त्यानुसार महाराष्ट्र शासन गृहविभाग पोल आठ यांनी प्रस्ताव तयार केला होता.राज्याचे गृहमंत्री तथा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी ७ डिसेंबर २०२२ रोजी या प्रस्तावास अंतिम मंजुरी दिली.त्यासनुसार वित्त विभागातून ...पान ६ वर

# केंद्र आणि राज्य शासनाच्या विविध योजना भाजपा महिला मोर्चाने गरजूपर्यंत पोहचवाव्यात-चित्राताई वाघ

**लातूर/प्रतिनिधी**



पाच सहा महिन्यापूर्वी विरोधी पक्षात होतो त्यावेळी महिलांच्या विविध प्रश्नी मोर्चे काढले आंदोलने केली आता आपण सत्तेत आहोत हजार पटीने आपली जबाबदारी वाढल्याने केंद्र आणि राज्य शासनाच्या सर्व योजना गावागावात आणि खेड्यापाड्यात राहणाऱ्या गोरगरीब गरजू शेवटच्या महिलेपर्यंत पोहोचण्याची जबाबदारी महिला मोर्चाची आहे याची जाणीव करून देऊन येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीत भाजपाच्या विजयासाठी जिद्दीने जोमाने काम करून महिला मोर्चाने मोठे योगदान द्यावे असे आवाहन भारतीय जनता पार्टी महिला मोर्चाच्या प्रदेशध्यक्षा सौ. चित्राताई वाघ यांनी केले.

भारतीय जनता पार्टी महिला मोर्चा शहर आणि ग्रामीण जिल्ह्याच्या वतीने लातूर येथील स्वानंद मंगल कार्यालयात भाजप महिला मोर्चाच्या प्रदेशाध्यक्षा सौ. चित्राताई वाघ यांच्या प्रमुख उपस्थितीत महिला मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी त्या बोलत होत्या. याप्रसंगी महिला मोर्चाच्या प्रदेश सरचिटणीस संध्याताई कुलकर्णी, उपाध्यक्ष माधुरी अदावंत, सचिव मिनाक्षी पाटील, ॲड. जयश्री पाटील, जिल्हा प्रभारी सविताताई कुलकर्णी, जिपच्या माजी उपाध्यक्ष भारतबाई साळुंखे, कल्पनाताई डांगे, उत्तराताई कलबुर्गे, सरोज वारकरी, महिला मोर्चाच्या ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्रीमती रेखाताई तरडे, शहर जिल्हाध्यक्ष मीनाताई भोसले, प्रेरणा होनराव, ज्योती हलकुडे, लता भोसले, सुरेखा पुरी आदींची प्रमुख उपस्थिती होती. या मेळाव्यास लातूर शहरासह जिल्हाभरातील भाजपाच्या महिला पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, कार्यकर्त्या सह महिला भगिनीचा मोठा जनसमुदाय उपस्थित होता. यावेळी अनेक मुस्लीम भगिनींसह महिलांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला.स्वातंत्र्यानंतर पहिल्यांदाच देशाचे पंतप्रधान नरेंद्रजी मोदी साहेब यांनी घराघरात शौचालय, उज्वला गॅस, पक्की घरे देऊन मातृशक्तीचा सन्मान केला आणि कायद्याची अंमलबजावणी करून बळ देण्याचे काम केले. कोरोनाच्या काळात देश ठप्प असताना कोणीही काम धंद्यावर नसताना प्रत्येक कुटुंबाला मोफत अन्नधान्य देऊन कोरोना प्रतिबंधक लस देऊन आपल्याला जिवंत ठेवण्याचे काम केले असल्याचे सांगून सौ. चित्राताई वाघ म्हणाल्या की, राज्यातील एकनाथजी शिंदे आणि देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वातील सरकार प्रत्येक घटकासाठी काम करीत आहे. महिला सुरक्षा आणि अत्याचार हा विषय महिला मोर्चाचा महत्त्वाचा असून सरकारचा तो अजिंडा आहे अशा घटना सहन करणार नाही. त्यामुळे महिलाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कोणी हिम्मत करणार नाही असे बोलून दाखविले. पुढे बोलताना ...पान ६ वर

# रस्ता सुरक्षेसाठी वाहतूक नियमांचे पालन करावे-अपर जिल्हाधिकारी




**लातूर/प्रतिनिधी**

दिवसेंदिवस रस्ते अपघातांची वाढणारी संख्या ही चिंतेची बाब असून रस्ता सुरक्षेसाठी प्रत्येकाने वाहतूक नियमांचे पालन करण्याची आवश्यकता असल्याचे अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांनी सांगितले. केंद्र शासनाच्यावतीने ११ जानेवारी ते १७ जानेवारी २०२३ या कालावधीत आयोजित राज्य रस्ता सुरक्षा सप्ताहाच्या उद्घाटनानिमित्तजिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात बुधवारी आयोजित कार्यक्रमात श्री. लोखंडे बोलत होते. परिवहन विभाग, पोलीस विभाग, सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. अतिरिक्त पोलीस अधीक्षक अजय देवरे, प्रादेशिक परिवहन अधिकारी गजानन नेरपगार, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी विजय भोये, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता देवेंद्र निळकंठ, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाचे यंत्र अभियानात हेडाऊ, जिल्हा शल्य चिकित्सक कार्यालयाचे डॉ. कलमे, वाहतूक पोलीस निरीक्षक सुनील बिर्ला, पोलीस उपनिरीक्षक आवेज काजी यांच्यासह रिक्षा-टॅक्सी संघटना, विद्यार्थी वाहतूक संघटना, स्कुल बस, ट्रॅव्हल्स असोसिएशनचे पदाधिकारी, माझं लातूर परिवार तसेच मोटार ड्रायव्हिंग स्कुलचे संचालक व मालक, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचे विद्यार्थी, नागरिक उपस्थित होते. रस्ते अपघाताविषयी आपण रोज वाचतो, ऐकतो. हे अपघात रोखण्यासाठी सर्वांनी नियमांचे पालन करण्याची गरज आहे. रस्ते अपघातांना कारणीभूत ठरणाऱ्या गोष्टी टाळणे आवश्यक असून यासाठी सर्वांनी वाहतूक नियम जाणून घ्यावेत, असे आवाहन श्री. लोखंडे यांनी यावेळी केले. सद्यस्थितीत होणारे अपघात हे खुणाचा गुन्हाच्या प्रमाणापेक्षा कित्येक पटीने जास्त आहेत. हे अपघात रोखण्यासाठी रस्ता सुरक्षा सप्ताहमध्ये जनजागृती करण्यात येणार आहे. त्याचबरोबर वाहतूक नियमांची कडक अंमलबजावणी करण्यात येणार असल्याचे अतिरिक्त पोलीस अधीक्षक डॉ. देवरे यांनी सांगितले. प्रस्ताविकामध्ये प्रादेशिक परिवहन अधिकारी नेरपगार यांनी लातूर जिल्ह्यातील अपघातांची विश्लेषणात्मक माहिती दिली. तसेच रस्ता सुरक्षा सप्ताहाचा उद्देश स्पष्ट केला. रस्ता सुरक्षा सप्ताह कालावधीत संपूर्ण जिल्हाभर विविध कार्यक्रमांचे आयोजन ...पान ६ वर

## उदगीर जिल्हा निर्मितीसाठी जन आंदोलन उभारणार-आ.संजय बनसोडे

# उदगीर जिल्हा झाला पाहिजे ही सर्वपक्षीय पदाधिकाऱ्यांची भुमिका




**देवणी/शकील मनियार**

राज्य सरकारच्या ध्येयधोरणाप्रमाणे महाराष्ट्रामध्ये जेव्हा केव्हा छोट्या छोट्या जिल्ह्यांची निर्मिती होईल त्यामध्ये आपल्या उदगीरचा नंबर घेण्यासाठी मी सरकारला भाग पाडणार असल्याची भूमिका घेणार असून यासाठी मी आपला लोकप्रतिनिधी म्हणून कडक भूमिका घेऊन भविष्यात उदगीर जिल्हा निर्मितीसाठी जन आंदोलन उभारणार असल्याचे मत माजी गृहराज्यमंत्री आ.संजय बनसोडे यांनी व्यक्त केले. ते उदगीर जिल्हा निर्मिती कृती समितीच्या पुढील दिशा ठरवण्यासंदर्भात शहरातील साने गुरुजी विद्यालयात आयोजित केलेल्या बैठकीत बोलत होते. या बैठकीस रा.कॉं.चे नेते बसवराज पाटील नागराळकर, माजी जि.प. अध्यक्ष राहुल केंद्रे, माजी नगराध्यक्ष बस्वराज बागबंदे, माजी सभापती प्रा.शिवाजी मुळे, माजी नगराध्यक्षा उषा कांबळे, उपनगराध्यक्ष सुधीर भोसले, वीरशैव लिंगायत समाजाचे अध्यक्ष चंद्रकांत वैजापुरे, अँड.प्रभाकर काळे, शिवसेनेचे कैलास पाटील, भाजपाच्या महिला जिल्हाध्यक्षा उत्तरा कलबुर्गे, रमेश अंबरखाने, मंजूरखाँ पठाण, समीर शेख, गजानन सताळकर, बापूराव राठोड, दिपाली औटे, प्रशांत देवशेट्टे, चारुशिला पाटील, दत्ता पाटील, महेबूब शेख, अजीम दायमी, सय्यद जानी, मदन पाटील, श्रीकांत पाटील, गुरुनाथ बिरादार, ज्योती स्वामी, सुरेश पाटील नेत्रगावकर, मोतीलाल डोईजोडे आदी उपस्थित होते. पुढे बोलताना आमदार संजय बनसोडे म्हणाले की, उदगीर सारख्या ग्रामीण भागात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन घेतल्याने उदगीरचे नाव देशाच्या कानाकोपऱ्यात गेले. संमेलना मागचा एकच हेतु होता तो म्हणजे आपला उदगीर तालुका हा जिल्हा व्हावा. ...पान ६ वर

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंदांचे विचार आत्मसात करावेत -डॉ. गंदगे

**लातूर/प्रतिनिधी**




राष्ट्रमाता जिजाऊंनी बाल शिवबांवर चांगले संस्कार केले. या संस्कारामुळे शिवाजी महाराजांची स्वराज्यासह सुराज्याची स्थापना केली. आजच्या मातांनीही आपल्या मुलांवर चांगले संस्कार करावेत. राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकांनद यांचे विचार प्रेरणादायी आहेत, असे प्रतिपादन येथील राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. व्ही. आर. गंदगे यांनी केले. शिवनगरातील राजमाता जिजामाता अध्यापक महाविद्यालयात गुरुवारी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे होते. यावेळी प्राचार्य संगमेश्र्वर केंद्रे, प्रा. अश्विनी केंद्रे, प्रा. कविता केंद्रे, प्रा. आर. व्ही. जायेभाये, प्रा. अरुण करदुरे, प्रा. डॉ. एन. के. सय्यद यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी डॉ. गंदगे म्हणाले की, मॉ जिजाऊंच्या पोटी शूर - वीर छत्रपती शिवाजी महाराजांचा जन्म झाला. बाल शिवबांवर मॉ साहेबांनी चांगले संस्कार केले. त्यामुळे शिवाजी महाराज हे रयतेच्या मनातील राजे बनले. त्यामुळे आदर्श माता म्हणून मॉ जिजाऊ आजही आजरामर झाल्या. आजच्या मातांनीही जिजाऊंप्रमाणे आपल्या मुलांवर संस्कार करावेत, असे आवाहन डॉ. गंदगे यांनी केले. स्वामी विवेकानंद यांचे नाव नरेंद्र होते. ते लहानपणापासूनच हुशार, विवेक चातुर्य व कुशाग्र बुद्धीचे होते. त्यांच्यावर गुरु रामकृष्ण परमहंस यांचा प्रभाव पडला. त्यांना मूतीरपूजा मान्य नव्हती. त्यांनी हिंदु धर्माचा प्रचार व प्रसार केला. त्यांनी शिकागो येथे जगाला विश्व बंधुत्वाची शिकवण दिली, ‘उठा जागे व्हा, आपल्या धेयापर्यंत जाईपर्यंत प्रयत्न करा’ असा जगाला उपदेश दिला, असे डॉ. गंदगे यांनी सांगितले. यावेळी बोलताना प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी, आजच्या विद्यार्थिनी व विद्यार्थ्यांनी मॉ राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांचे विचार आचरणात आणून क्रमिक अभ्यासासोबत स्पर्धा परीक्षेची तयारी करावी, असे ...पान ६ वर

## पत्रकार दिनानिमित्त वाड्यात कायदे विषयक मार्गदर्शन




**वाडा/प्रतिनिधी**

पोलीसात येणाऱ्या तक्रारीत ६० टक्के तक्रारी महिलांच्या असून पीडित महिला कुणाच्यातरी मदतीने पोलिसांत येणे दुर्दैवी आहे, पोलीस व जनता यांमधील दरी कमी होऊन लोकांनी निर्भिडपणे तक्रारी घेऊन यावे यासाठी जनसंवाद अभियानाची सुरुवात झाल्याचे पोलीस उपनिरिक्षक पल्लवी बाणे यांनी प्रतिपादन केले. वाडा तालुका पत्रकार संघ, शिक्षक संचालित शिक्षण संस्था व वाडा पोलीस ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित मार्गदर्शन शिबिरात त्या व्याख्याता म्हणुन बोलत होत्या. पत्रकार व पोलीस यांमध्ये लेखणी हा समान धागा असतो ज्याद्वारे समाजहिताचे कार्य केले जात असून जनसंवाद अभियानाला घरोघरी पोहोचविण्याचे काम पत्रकार करतात. शिक्षण सोडून मुलींनी कामाला जाणे निव्वळ अज्ञानीपणाचे लक्षण असून शिक्षण जीवनाकडे सुंदर दृष्टिकोन आणते असे बाणे यांनी विद्यार्थिनींना सांगितले. ...पान ६ वर

# वाड्यातील गिर्यारोहकांनी सर केला कळकराईचा सुळका



**वाडा** : पुण्यातील मावळ तालुक्यातील नाणे मावळ भागातील सह्याद्रीच्या रांगेत असलेला ढाक किल्ला जो ढाकबैरीची गुहा साहसी ट्रेकसाठी प्रसिद्ध आहे. त्याला लागून असलेला २८० फुटाचा कळकराई सुळका वाड्यातील पाच गिर्यारोहकांनी यशस्वीरित्या सर केला. गिरीश डेंगाणे, संगम गवारी, सँडी सोनवणे, विशाल वारघडे व शुभम देशमाने अशी या धडशी गिर्यारोहकांची नावे असून हा सुळका आरोहणाची जबाबदारी अशितोष गुंजाळ व दीप नाचणकर यांनी पार पाडली. या इव्हेंटसाठी त्यांच्यासोबत गिरीश डेंगाणे व अमोल डुंबरे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली तसेच या मोहिमेमध्ये नंदकुमार कारभारी व सुनील होरंबे व इतर अकरा जणांनी या सुळक्यावर चढण्यासाठी पूर्णपणे सेफ्टीचा वापर करून काळजीपूर्वक हा सुळका सर केला.

## कोकण विभाग मतदार संघाच्या नवीन मतदार यादीत ३७ हजार ७१९ मतदार

# आदर्श आचारसंहितेचा भंग होणार नाही यासाठी विशेष नियोजन - आयुक्त डॉ. महेंद्र कल्याणकर



**नवी मुंबई/प्रतिनिधी**

कोकण विभाग शिक्षक मतदारसंघाची अंतिम मतदार यादी प्रसिध्द झाली असून, कोकण विभागातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदूर्ग या जिल्ह्यांमध्ये एकूण ३७ हजार ७१९ मतदार आहेत. तसेच या निवडणूकीच्या अनुषंगाने आदर्श आचारसंहिता लागू झाली असून, याचा भंग होणार नाही याबाबत विशेष नियोजन करण्यात आले असल्याची माहिती कोकण विभागीय आयुक्त तथा निवडणूक निर्णय अधिकारी डॉ. महेंद्र कल्याणकर यांनी दिली. आज कोकण भवनातील समितीसभागृहात आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारत निवडणूक आयोगाकडून दि. १ नोव्हेंबर २०२२ या अर्हता दिनांकावर आधारीत कोकण शिक्षक मतदारसंघासाठी नव्याने याद्या तयार करण्याचा कार्यक्रम घोषित करण्यात आला होता. या घोषित कार्यक्रमानूसार कोकण विभाग ...पान ६ वर

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना मदतीचा हात



**देवणी** : देवणी तालुक्यातील आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या वारसांना शासनाच्या वतीने धनादेश देऊन मदतीचा हात दिला जात आहे यावेळी तहसीलदार सुरेश घोळवे, नायब तहसीलदार विलास तरंगे, अव्वल कारकून सांळूके, तलाठी अनीता निगुळे, हांदेश्वर इ.कर्मचारी यावेळी उपस्थित होते. तालुक्यातील महादेव प्रभूआप्पा बेलुरे, शोभाजी रावण कांबळे या आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी एक लाखाचा धनादेश देऊन मदत देण्यात आली. तहसील कार्यालयाच्या वतीने सातत्याने शेतकऱ्यांना मदत केली जात आहे. तसेच समाजातील दानशूरांनीदेखील मदतीसाठी सामोरे यावे, असे आवाहन तहसीलदार सुरेश घोळवे यांनी केले.